






यशोगाथा

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक
बुधवार, १४ मार्च २०२३

# जमीन, मंगळसूत्र विकून २०५ शौचालये बांधून देणाऱ्या डोमेगावच्या आधुनिक स्वच्छतादूत सौ. सविता बाबासाहेब शेळके

आधुनिक केसरी

**संत गाडगे महाराज चालते फिरते सामाजिक शिक्षक होते. लोकजीवन तेजांनी उजळण्यासाठी हातातील खराट्याने गावाचे रस्ते झाडीत ते महाराष्ट्रात सर्वत्र फिरले. विवेकाच्या झाडूने गावोगावी फिरून त्यांनी लोकांची मने स्वच्छ केली. अज्ञान, अंधश्रद्धा आणि अस्वच्छता याचे त्यांनी उच्चाटन करण्यासाठी अलौकिक कार्य केले. संत गाडगे महाराजांच्या स्वच्छता विचारांची कास धरीत केवळ गावासाठी आपली स्वतःची जमीन व मंगळसूत्र विकून 205 शौचालये बांधून संपूर्ण गाव हागणदारीमुक्त करून देणाऱ्या डोमेगाव (ता. अंबड जि. जालना) येथील श्रीमती सविता बाबासाहेब शेळके यांची कहाणी समाजासाठी निश्चितच आदर्शवत ठरत आहे. श्रीमती सविता बाबासाहेब शेळके यांनी केलेल्या या आगळ्यावेगळ्या कार्याची, पुढाकाराची आणि संघर्षाची यशोगाथा महाराष्ट्रासाठी एक आधुनिक स्वच्छतादूत म्हणून लक्षात घ्यावीच लागेल.**

आज ग्रामीण व शहरी भागातील नागरिकांना स्वच्छतेचे महत्त्व पटत चालले आहे. संतांनीही अस्वच्छतेवर कित्येकदा प्रहार केले. 1000 लोकवस्तीचे गाव असलेल्या डोमेगाव येथे सर्वजण उघड्यावर शौचास जात असत. सौ. सविता शेळके या निरक्षर असतानाही त्यांना शौचास उघड्यावर जाण्याची संकल्पना पटत नव्हती. उघड्यावर शौचास गेल्याने त्याचे परिणाम काय होतात ते त्यांच्या मनात सलत राहायचे. रात्रंदिवस सतत असा विचार करून त्यांनी प्रथम आपल्या घरी शौचालय बांधून घेतले आणि मग पुढे गावात घरोघरी शौचालय बांधून देण्याची संकल्पना त्यांना सुचली. त्यांचे पती बाबासाहेब शेळके गावातीलच ग्रामपंचायतमध्ये शिपाई म्हणून कार्य करीत असताना त्यांनाही या प्रश्नांचे गांभीर्य कळले. पती-पत्नी आणि त्यांचे कुटुंब यांच्यात दररोज चर्चा व्हायची. हे सारे कशाप्रकारे उभे करायचे हा प्रश्न त्यांना सतावत असे. म्हणून एके दिवशी सौ. सविताताईंनी आपली दीड एकर जमीन विकून स्वखर्चाने गावासाठी शौचालय बांधून देण्याचा निर्णय घेतला आणि त्यासाठी त्यांनी झपाटल्यासारखे कार्य केले. याविषयी बोलताना सौ. सविता शेळके सांगतात की, माझ्या गावातील महिला उघड्यावर शौचास जातानाचे चित्र मला नेहमी अस्वस्थ करायचे. मनात विचार करायचे की हा प्रश्न कसा सोडवायचा ? यासाठी मी ठामपणे माझे पती बाबासाहेब शेळके यांना आपली दीड एकर जमीन विक्री करण्यास सांगितले. त्यांनी यास लगेच होकार देत विक्रीची प्रक्रिया लागलीच करून घेतली आणि यातून मिळालेले संपूर्ण पैसे व माझ्या गळ्यातील मंगळसूत्र व इतर दागदागिने विकून आलेले पैसे हे सारे मिळून गावातील शौचालय बांधण्यासाठी टप्प्याटप्प्याने खर्च केले. सुरुवातीला 2010 मध्ये 180 शौचालये पूर्णपणे तयार करून त्या त्या कुटुंबांना हस्तांतरित केली. पुढे 2017-18 मध्ये 25 नागरिकांना खासगी वित्तीय कंपनी, महिला बचत गटाचे कर्ज काढून सौ. सविताताईंनी शौचालय बांधून दिले. परंतु 205 शौचालये बांधून देत असताना गावकऱ्यांनी आम्हाला कसलेच सहकार्य केले नसल्याची खंत वाटते. गावाचे सहकार्य जरी मिळत नसले तर आम्ही स्वच्छतेचा जागर मागे पडू देणार नाही. निःस्वार्थ भावनेने यापुढेही सतत कार्य करत राहू अशी भावना सविता शेळके यांनी आधुनिक केसरीच्या यशोगाथेत मांडली. आधुनिक स्वच्छतादूत सौ. सविताताई बाबासाहेब शेळके यांच्या या गौरवास्पद कामगिरीस आधुनिक केसरी परिवारातर्फे हार्दिक शुभेच्छा व अभिनंदन!




सौ. सविता बाबासाहेब शेळके, मो : 9322045812




### सौ . सविता शेळके यांच्या कार्यास आधुनिक केसरीचा सलाम

सौ . सविता शेळके यांनी गाव हागणदारीमुक्त करण्यासाठी स्वत :ची जमीन आणि मंगळसूत्र विकून 205 शौचालये स्वखर्चातून बांधून दिली . या कार्याचा आम्हास अभिमान वाटतो . तुमच्या अलौकिक धाडसी आणि सामाजिक कार्याची पुढील काळात उत्तरोत्तर प्रगती व्हावी आणि समाजानेही तुम्हाला भरभरून सहकार्य करावे हीच सदिच्छा . तुमच्या आधुनिक विचारांना आणि अद्भुत कार्याला आधुनिक केसरीचा त्रिवार सलाम .

### हागणदारीमुक्तीसह पर्यावरण चळवळ रुजवतेय शेळके दांपत्य

डोमेगाव हागणदारीमुक्त करण्याबरोबरच गावातील रिकाम्या जागी, घरोघरी, शाळा परिसरात आजपर्यंत शेळके दाम्पत्याने जवळपास आठ हजार झाडे लावून पर्यावरण चळवळ उभी केली आहे . प्रत्येक झाड जगावे म्हणून स्वखर्चातून बोरवेल घेऊन झाडांना पाणी त्यांच्याकडून दिले जात आहे . विविध प्रकारची झाडे निसर्ग सौंदर्याबरोबरच आत्मिक समाधान आम्हाला देत आहेत . आमच्या कार्याची शासनाने दखल घेऊन आमच्या कार्याला मदत केली पाहिजे अशी भावना शेळके दांपत्याने याप्रसंगी व्यक्त केली .

शब्दांकन : बाळासाहेब जोगदंड, छत्रपती संभाजीनगर, मो :9423051246





विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932




आधुनिक केसरी

मी तुला शब्द दिले, भाषा दिली. शेतामध्ये धान्य पेरतो. नंतर ते अनेक पटींनी परत मिळतं. तशी लहानपणापासून तुझ्या अंतरात मी शब्दांची पेरणी केली. ती भाषेच्या रूपाने तुझ्या लेखणीतून, वाणीतून प्रकट झाली. आता तरी लक्षात आलं ना की मी कोण आहे ते ! होय माते, तू तर माझी माय. माय मराठी. मला लक्षातच आलं नाही आधी. मला क्षमा कर. ' ' असू दे लेकरा. चालायचंच. तुझा काही दोष नाही त्यात.' पण माते मला सांग, तू आता इथे कशी काय ?
अरे तुझ्या लक्षात नाही आलं का ? दोन तीन दिवस इथे साहित्य संमेलन होतं ना...! म्हणून आले होते खूप आशेने !
' पण माते मला सांग तुझी ही अशी अवस्था कशानं झालं ? तुझ्या अंगावरचा हा भरजरी शालू कशानं फाटला ? माये, तू तर श्रीमंत, धनवान. तुला कशाचीच कमी नव्हती. माझ्या ज्ञानोबा माउलींना तर तुझा केवढा अभिमान ! संस्कृतमधील गीता त्यांनी तुझ्यारूपाने सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवली. ज्ञानोबा माऊली म्हणाली, ' माझा मऱ्हाटीचा बोलू कौतुके, परी अमृतातेही पैजा जिंके. ' खरंच माऊलींच्या शब्दाशब्दातून अमृताचे थेंब ठिबकत होते. म्हणूनच माऊलींनी तो वर्णन करण्यासाठी ज्ञानेश्वरी नंतर ' अमृतानुभव ' लिहिला. माऊलींनी सांगितलेल्या गीतेवरील टीका ' ज्ञानेश्वरी ' ऐकताना श्रोत्यांनी जे श्रवणसुख अनुभवलं त्याला तोड नाही. उपमा नाही. सर्वांगाचे जणू कान झाले. पुढे तुकोबांनी अभंग लिहिले. त्याची गाथा झाली. तुकोबांच्या मनाला भिडणाऱ्या तरल अभंगांनी इंद्रायणीसारखंच मराठी मनाला भिजवून चिंब केलं. समर्थ रामदासांनी दासबोध सांगितला. मनाचे श्लोक सांगून मनाला बोध केला. शिवरायांना ' जाणता राजा, श्रीमंत योगी, सामर्थ्यवंत, वरदवंत, कीर्तिवंत....' अशी विविध सार्थ विशेषणे लावून तुझ्या श्रीमंतीचा प्रत्यय आणून दिला.



## आनंदी पहाट

### कलेमुळे जीवनाची समृद्धी शक्य

आधुनिक केसरी



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

अगदी अलीकडच्या काळापर्यंत कला ह्या शब्दाला काही एक अर्थ, मान होता. गायन, वादन, नृत्य, चित्रकला, शिल्पकला यांना राजघराण्यात, सरकारदरबारी आश्रय होता. मात्र आधुनिकीकरण झाल्यामुळे कालांतरानं परिस्थिती बदलली. अभिजात कलांना कोणी विचारेनासं झालं. अर्थात ह्याची जाणीव सर्वांना झाली असं नाही. एखाद्या कलेची साधना करणं म्हणजे आयुष्य वाया घालवणं, असा नवीन पिढीकडून विचार केला जाऊ लागल्याचं समजतं, त्याचाच खेद वाटतो. त्यातच शिक्षणपद्धती देखील बदलली. गुरु शिष्य परंपरेनं मैत्रीच्या नात्याची जागा घेतली. मरगळलेल्या वाटेवरून जाणं श्रेयस्कर ठरून योग्य वाटू लागलं. कलेमुळे जीवन समृद्ध होतं, ही कल्पनाच मागे पडत गेल्याचं आपण प्रत्येकजण अनुभवत आहोत. त्यासाठी भारतीय कलेची सर्वांगीण चर्चा करताना इतिहासातील महत्वाच्या स्थित्यंतरांचा मागोवा घेणं आवश्यक असतं. प्राचीन भारतीय संस्कृती आजच्या इतकी प्रादेशिक आणि राजकीय सीमांनी बांधली गेलेली नव्हती. आजच्या भारतीय उपखंडाबरोबर पूर्व-पश्चिम आणि उत्तर-दक्षिण परिसरात फार दूरवर तिचा प्रभाव कालपरत्वे कमी-अधिक प्रमाणात अस्तित्वात असल्याची इतिहासात नोंद असल्याची सापडते. वंशविविधता आणि विविध धर्मश्रद्धा यांनी ती समृद्ध असल्याचं आपण विसरून चालणार नाही. संघर्ष पोटात सामावून घेत अभिसरण साधण्याची तिची ताकद विलक्षण आहे. जगण्यापलीकडील जीवनाच्या आदिम अवस्थेपासून आजवर तिची कित्येक संस्करणे होत प्रस्थापित संस्कृती म्हणून तिने विविध रूपे घेतली असल्याची साक्ष आपल्याला इतिहासात सापडते. प्रत्येक नव्या अवस्थेत आदिमतेशी नवे नातेसंबंध जुळविले असल्याचं आपण अनुभवतो. आजही हे आदिम जीवन आदिवासी पातळीवर चालू आहे. लोकशाही जीवनपद्धतीमुळे त्याचे आजच्या प्रस्थापितांशी अंतिम अभिसरण होत आहे.



आधुनिक केसरी

**तपोबल वाहे | अंतरर्बाह्य ||**
आभ्यासे वाढते | बळ ज्ञानियांचे ||
आत्मबल त्याचे | श्रेष्ठ जाण ||१||
असावे सातत्य | वाचनी चिंतनी ||
असु नये मनी | अहंकार ||२||
सकार भावना | उन्नतीचे मुळ ||
ज्ञानवंत कुळ | ग्रंथ करी ||३||
अमूर्ताचे रूप | मूर्तात दाखवी ||
शुध्दता असावी | अध्ययनी ||४||
अशक्य ते शक्य | साधनेत आहे ||
तपोबल वाहे | अंतर्बाह्य ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## निरुपण


आधुनिक केसरी



डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

**अथवा ये न जायन्ते**
**खविषयाः कदाचन।**
**तानेवाध्यात्मिकान् सुहृद्**
**गणयन्ति बुधा जनाः॥**
**अथवा जे अनुभव कधी इंद्रियांचा विषय होत नाहीत, मित्रा, त्यांनाच बुद्धिमंत लोक आध्यात्मिक मानतात.**

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !



स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

**विषय विकार विलास में, चढ़त विकृत पसार। अबल हीन नीचे चले, बाढ़ कुबुद्धि कुचाल ।।१८।।(स्वर्वेद चतुर्थ मण्डल षष्ठ अध्याय) ०४/०६/१८**

**मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :**
इंद्रिय-विषय उपभोग सुखात विकृती अधिकाधिक वाढत जाते आणि त्यामुळे विषय-सुख-प्रलोभीचं अधःपतन व्हायला लागतं. मोहासक्त झाल्यामुळे त्याच्या बुद्धीमधे अंधःकार व्हायला लागतो. कुविचार आणि कुप्रवृत्तीमुळे जीवनाचे अधिकाधिक पतन होऊन त्याला महान अधोगती प्राप्त होते.

**संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सॲप करा ८५५४८८३१६६.**

## श्रवणनिरूपण

आधुनिक केसरी




सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

ज्याच्या नुसत्या वाचनाने अभिमान गळून पडतो,भगवंत भक्तिची ओढ लागते. कुठल्याही बाबतीत अभिलाषा ऊत्पन्न होत नाही. ज्याचा अभ्यास केला असता माणसाच्या अंगी धैर्य ऊत्पन्न होते,परोपकार करायची सद्बुद्धी मनापासून तयार होते. सर्व सुखाचा त्याग करून मन परमार्थ मार्गात चिंब भिजते असे खरे ग्रंथ होय. परमार्थ साधना समजते ती कशी करायची याचे ज्ञानमार्ग सापडतात हे खरे ग्रंथ होत. समर्थांच्या मते मानवी जीवनातील सर्वश्रेष्ठ मुल्य कोणते आणि ते साधण्याचा किंवा अनुभवण्याचा मार्ग कोणता या दोन गोष्टी पध्दतशीरपणे सांगणे हे खरे वाङ्मयाचे खरे कार्य होय. वाङ्मय असे असावे की ज्याच्या मध्ये माणसाला आत्मज्ञानापर्यन्त पोहचण्याची शक्ति असायला हवी.जे ग्रंथ वाचले असता मोक्षाचा मार्ग न सापडता अनेक फलाचे वर्णन आढळते,अशुभ वासना निर्माण होतात, प्रपंचाचा लोभ वाढतचं जातो आणि यासर्वाचे फलीत काय तर या जन्मात जे जे सुख मिळाले नाही ते ते पुढच्या जन्मात मिळूदे अशी ईच्छा होणे म्हणजे परत परत जन्ममरणच्या फेरीत सापडणे होय. चकोर पक्षी फक्त अम्रुत मिळवण्यासाठी हट्ट धरून बसतो पण नाना प्रकारचे पक्षी मात्र झाडावर असलेली सगळी फळे खाऊन आकाशात विहंग करतात. याचा अर्थ असा होतो की तुम्ही एका भगवंता खेरीज कशाचीही अपेक्षा करू नका.

## गुरुसेवा करणे म्हणजे काय ?

आधुनिक केसरी

साधनाची आटाआटी कुठपर्यंत करायची ? जप, तप, नेम, याग, वगैरे आपण कशाकरिता करतो ? तर देवाची प्राप्ति व्हावी म्हणून. तोच देव जर आपल्या घरी आला, तर साधनाची आटाआटी कशाला करायची ? म्हणून, साधनाची आटाआटी करण्याचे कारण नाही; नाहीतर त्याचाच अभिमान होतो, आणि मिळवावयाचे ते बाजूलाच राहून उलट तोटा होतो. जे जे घडत असते ते माझ्या इच्छेने झाले असे समजत जा आणि त्यात आनंद माना. तुम्ही जी जी गोष्ट कराल त्यात मला आठवा. गुरुभक्ति करायची म्हणजे काय ? त्याच्या देहाची सेवा करणे हीच गुरूची सेवा असे तुम्हाला वाटते का ? त्याच्या देहाची सेवा करणे ही गुरूची खरी सेवाच होत नसते. गुरू सांगेल तसे वागणे, हीच त्याची खरी सेवा होय. माझ्याजवळ जे येतात, ते कुणी मुलगा मागतो, कुणी संपत्ती मागतो, कुणी रोग बरा व्हावा म्हणून मागतो; तेव्हां माझी सेवा करायला तुम्ही येता, का मीच तुमची सेवा करावी म्हणून येता ? माझ्याजवळ येऊन,



मनुष्यदेहाचे खरे सार्थक होईल असे करा. तुम्ही मागाल त्याप्रमाणे मी थोडेसे देणार नाही असे नाही; पण ते काढा घेण्याकरिता गुळाचा खडा देण्यासारखे आहे. 'मला सर्व कळते' असे माझ्याबद्दल तुम्ही म्हणता, पण ते मनापासून नव्हेच. कारण ज्याला असे खरोखर वाटत असेल त्याच्या हातून पापकर्म होणारच नाही. ज्याची वृत्ती माझ्याशी एकरूप होईल त्यालाच कळेल की, मला सर्व कळते आहे. गुरूला अनन्य शरण जाणे म्हणजे इतके की, त्याचे मन आणि आपले मन एकच झाले पाहिजे. म्हणजे दैववशात जरी आपण गुरूपासून दूर असलो तरी मनाने त्याच्याशी संलग्न असल्यावर त्याच्यापाशीच असू. आपण आपल्या आईशी जसे बोलतो तसे माझ्यापाशी बोलावे, आपले सर्व दुःख मला सांगत जावे. तुम्ही इतके कष्ट घेऊन मला भेटायला येता, पण तुम्हाला रिकामे परत जाताना पाहून मला फार वाईट वाटते. माझ्याजवळ जे आहे ते व्यावहारिक जगात कुठेही तुम्हांला मिळायचे नाही; ते म्हणजे भगवंताच्या नामाचे प्रेम होय. सगळ्या प्रपंचात खरी विश्रांती असेल तर ती नामस्मरणातच आहे. ज्याला मी भेटावा असे वाटते, जो माझा म्हणवितो, त्याला नामाचे प्रेम असलेच पाहिजे.

**आजचे बोधवचन आहे -**
**नामावर प्रेम करणे म्हणजेच माझ्यावर प्रेम करणे. श्रीराम समर्थ**

## तुकाराम गाथा

आधुनिक केसरी

**तुका म्हणे बाहेरमुदी । आहा च गोविंदीं न सरती ॥३॥**
**उपाधीच्या नांवें घेतला सिंतोडा । नेदूं आतां पीडा आतळों ते ॥१॥**
**काशासाठीं हात भरूनि धुवावे । चालतिया गोवे मारगासि ॥ध्रु.॥**
**काय नाहीं देवें करूनि ठेविलें । असें तें आपुलें ते ते ठायीं ॥२॥**
**तुका म्हणे जेव्हां गेला अहंकार । तेव्हां आपपर बोळविले ॥३॥**
**योगाचें तें भाग्य क्षमा । आधीं दमा इंद्रियें ॥१॥**
**अवघीं भाग्यें येती घरा । देव सोयरा जालिया ॥ध्रु.॥**

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक

बुधवार, १४ मार्च २०२३
⊙ किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
⊙ मराठी ⊙ दैनिक
⊙ वर्ष - ०२ ⊙ अंक -१९६
⊙ आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

●MARATHI ●DAINIK ●CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) ●WEDNESDAY 15 MARCH 2023 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ●YEAR-02 ●ISSUE-196 ●RNI : MAHMAR/2021/82566 ●PAGE-14 ●PRICE-5



# नाथभक्तांचे गोदावरीऐवजी नाथसागरात पवित्र स्नान

## काला न घेताच वारकरी माघारी; पिण्याच्या पाण्याची बोंबाबोंब

आधुनिक केसरी न्यूज

**दादासाहेब घोडके**

**पैठण : नाथषष्ठी उत्सवामध्ये आलेल्या वारकऱ्यांनी गोदावरीत पवित्र स्नान करण्यासाठी पहाटेपासून एकच गर्दी केली होती. मात्र गोदावरी नदीपात्रातील पाणी घाण असल्याने भाविकांनी नाथसागरात पवित्र स्नान करण्याला प्राधान्य दिले. वाळवंटातील व शहरातील फडावर थांबलेल्या वारकरी भाविकांनी नाथसागराच्या अथांग पसरलेल्या पाण्यात पहिल्या दिंडीच्या निमीत्ताने शाही स्नान केल्याचे निदर्शनास आले.**

षष्ठीच्या दिवशी पहील्या दिंडीच्यानिमित्त नाथनगरीत आलेल्या लाखो वारकऱ्यांची नाथसागर जलाशयाकडे पहाटेपासूनच रीघ लागली होती. वाळवंटात विसावलेल्या दिंड्या तसेच पैठण शहरातील ईतर ठिकाणी थांबलेल्या वारकरी भाविकांनी नाथसागर जलाशयात स्नान करून संत एकनाथ महाराज यांच्या राहत्या वाड्यातील विजयी पांडुरंगाचे तसेच नाथांच्या समाधी मंदिरातील पादुकांचे दर्शन घेऊन नगरप्रदक्षणा केली.

पैठणमधे सकाळपासून गर्दीच्या ठिकाणी तसेच नाथसागरावर पोलिसांचा बंदोबस्त होता. शांतीब्रम्ह संत एकनाथ महाराज यांच्या जलसमाधी ( षष्ठी ) सोहळ्याच्या निमित्ताने ताः १३ रोजी षष्ठीच्या दिवशी दुपारी लाखो वारकर्याच्या सहभागाने नाथांच्या प्रतिष्ठान नगरीत संत ज्ञानेश्वर माऊलींच्या पसायदानाची केली प्रार्थना. "हे विश्वची माझे घर" समजून शांतीचा संदेश शिस्त आणि शांतपणे एकाच वेळी, एकाच क्षणी आहे त्या जागेवर उभं राहून संपूर्ण वाळवंटातील व नाथषष्ठीतील वारकऱ्यांनी पाच मिनिटं पसायदानातुन विश्वशांतीची प्रार्थना केली.

हा अदभूत सोहळा पाहण्यासाठी व सहभागी होण्यासाठी पैठणकरांनीही प्रतिसाद नोदंवला सद्यःस्थितीत समाजा-समाजात तंटे, भेदाभेदा मुळे दरी निर्माण होत आहे. विभागणार्या कुटुंब व्यवस्थेमुळे परस्परातील नाते संबंध दुरावत आहेत, अशा परीस्थितीमुळे या विश्वात शांती नांदण्याची गरज आहे.मनःशांती, आत्मशांती ,वारकरी संप्रदायात शिस्त व सातत्याने टिकून आहे. केवळ आपणच सुखी, शांत राहुन चालणार नाही तर संपूर्ण विश्वात हि शांतता नांदली पाहिजे शेतकरी, कष्टकरी सुखी झाला पाहिजे या उद्देशाने माऊली संस्थानचे अध्यक्ष ज्ञानेश्वर महाराज कोल्हापुरकर ( आपेगाव ), ,प्रा.चंद्रकांत भराट छावा संघटनेचे राज्य अध्यक्ष यांच्या संकल्पनेतून पैठण मध्ये माऊलीचा पसायदान म्हणून विश्वशांतीचा प्रार्थना सोहळा यशस्वी झाला.यावेळी आपेगाव संस्थानच्या वतीने शिवशक्तीमंत्र नामावळी या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. मंगळवारी दुपारी पारंपारिक अभंगाला सुरवात करून निर्याण दिंडी गावातील नाथ मंदीरामधुन निघुन कावळे गल्ली, उदासी महाराज मठ, वाळवंट मार्गाने नाथांच्या समाधी मंदीरात पोहचली या दिंडीमधे सर्वांचा चालण्याचा क्रम परंपरेनुसार ठरलेला असल्याने सुरवातीस घोडा या नंतर पटका, भानुदास महाराजाचे निशाण, झेंडेकरी, दिंडी, विणेकरी, अमृतराय संस्थानची छत्री, नाथवंशीयाच्या छत्र्या , अमळनेरकर महाराज दिंडी, भगवानगडची दिंडी, तसेच सर्व वारकरी असा क्रम ठरलेला असलेली निर्याण दिंडी नाथाच्या समाधी मंदीरात पोहचली येथे वारकरी व नारदीय किर्तनात ' अवघे चित्रलौक्य आनंदची आता " हा संत एकनाथ महाराजाचा अभंग घेतात कारण संत एकनाथ महाराजानी शेवटचे किर्तन फाल्गुन वद्य षष्ठीला हा अभंग घेवु केले होते व त्यानंतर जलसमाधी घेतली म्हणुन ४२४ वर्षापासून या अभंगावरच किर्तन षष्ठीच्या दिवशी करण्यात येते. किर्तनानंतर दिंडी गावातील नाथ मंदीरात आली व भानुदास महाराजांचे निशाण महाद्वारला लावून दिंडीच्या सांगतेची आरती झाली. नाथषष्ठीनिमित्त केंद्रीय मंत्री रावसाहेब दानवे, संभाजीनगरचे पालकमंत्री संदिपान भुमरे, अहमदनगर चे खासदार सुजय विखे,आमदार रोहित पवार,विलासबापु भुमरे यांनी घेतले नाथ समाधीचे दर्शन घेवुन पैठण येथिल शांतीब्रम्ह संत एकनाथ महाराज मंदिरात फुगडी खेळुन नाथषष्टीचा आनंद द्वगणित केला. तर बहुतेक वारकरी फडावर भेट देत नाथषष्टी सोहळ्यात उपस्थिती दर्शवली. या वेळी भाजपा तालुकाध्यक्ष सुनिल शिंदे, राष्ट्रवादीचे नेते दत्तात्रय गोर्डे, माजी नगराध्यक्ष सुरज लोळगे, महामंत्री लक्ष्मण औटे, शेखर पाटील, कैलास बरकसे आदींची उपस्थिती होती.

नाथषष्टीचा उत्साह तसा वारकऱ्यांत तीन दिवस राहतो . परंतु पाई आलेल्या दिंड्यातील बहुतांश वारकरी षष्ठीला येतात अन सप्तमीला परत फिरतात तर वारकरी फडावरील भाविक काला दहिहंडी घेवुन नाथ नगरीचा निरोप घेतात .

नाथ षष्ठी यात्रा महोत्सवाच्या दहीहंडी फोडण्याच्या प्रकरणात मुंबई उच्च न्यायालयाच्या छत्रपती संभाजीनगर खंडपीठाने नाथवंशज व नाथसंस्थान या दोन्ही दहिहंडी फुटणार आहे . त्यामुळे यंदाही सांगता दिनी नाथवंशज याच्या हस्ते मंदिरात व नाथसंस्थानच्या वतीने वारकर्यांच्या हस्ते मंदिरा बाहेर वेगवेगळ्या दहिहंडी फोडण्याचा सोहळा स्थानिकांसह बाहेर गावच्या हजारो वारकरी भाविक भक्तांना याचि देही याचि डोळा अनुभवला मिळणार आहे .

गर्दीत चोर, पाकिटमार, सोनसाखळी, मोबाईल चोरावर नियंत्रण ठेवण्यासाठी पोलिसांनी वारकरी तसेच साधा वेश परिधान केल्याने चोराना चाप मिळाला असुन यात्रा काळात काही संशयिताना पोलीसांनी ताब्यात घेतले आहे .

पैठण शहरातील कमानी शेजारील पाटील कॉम्प्लेक्समधील कृषीजगत परिवार एकत्र येत नाथषष्टी यात्रा काळात लाखो वारकर्याना तीन दिवस पुरी भाजीचे भरपेट भोजन देतात . यासाठी कृषीजगतचे संचालक रामेश्वर सुसे यांचासह शेतकरी, दुकानदार व मित्र कंपनीच्या सहकार्याने नाथषष्टी सोहळ्यात पुरी भाजीच्या माध्यमातून आन्नदान केले तर प्रारब्ध फाऊंडेशनच्या वतीने शिवराज पारिक व मित्र परिवाराने व्हेज पुलावचे वाटप केले .

संभाजीनगर आश्रम प्रमुख स्वामी विष्णुपादानंद , विवेकानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष अक्षय पा .शिसोदे यांच्या कल्पनेतून व सहकार्याने या शिबिराचे आयोजन करण्यात येते .तज्ञ डॉक्टरांची टीम या शिबिरात सेवा देत आहे . हजारो वारकऱ्यांनी या शिबिरात लाभ घेतला असल्याची माहिती प्रा .संतोष गव्हाणे यांनी दिली .

# जुन्या पेन्शनसाठी सरकारी कर्मचाऱ्यांचे संपाचे हत्यार

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** राज्यातील शासकीय कर्मचाऱ्यांनी जुनी पेन्शन योजना लागू करावी यासाठी आजपासून आंदोलन पुकारलं आहे. एकच मिशन, जुनी पेन्शन या घोषणेसह राज्यभर आज विविध ठिकाणी शासकीय कर्मचाऱ्यांनी आंदोलन केलं. राज्यात जुनी पेन्शन योजना लागू करण्यासाठी अभ्यास समिती स्थापन केली जाईल अशी घोषणा मुख्यमंत्र्यांनी केली आहे. त्याला विरोध करत शासकीय कर्मचाऱ्यांनी आपलं आंदोलन सुरूच ठेवलं आहे. या आंदोलनाचा फटका राज्यातील नागरिकांना बसल्याचं दिसून येत आहे. अनेक जिल्ह्यांतील आरोग्य कर्मचारी या आंदोलनात सामील झाल्याने त्या ठिकाणी रुग्णाना हाल सोसावं लागल्याचं चित्र आहे.

अधिकाऱ्यांचा पाठिंबा, कोणतीही कारवाई करणार नाही

राज्य सरकारने जर आंदोलकांच्या मागण्या मान्य केल्या नाहीत तर 28 मार्चपासून राज्यातील दीड लाख राज्यातील राजपत्रित अधिकारी संपावर जाणार असल्याचा इशारा देण्यात आला आहे. कर्मचाऱ्यांच्या संपाला राजपत्रित अधिकाऱ्यांचा पूर्णपणे पाठिंबा असून कर्मचारी संपावर गेल्यास अधिकाऱ्यांकडून कुठल्याही प्रकारची कारवाई करणार नसल्याची भूमिका आहे. परिणामी राज्यातील शासकीय कामकाज पूर्णपणे ठप्प होण्याची शक्यता आहे. आरोग्य विभागाच्या कर्मचाऱ्यांनी या संपात सहभाग घेतल्याने राज्यातील आरोग्य व्यवस्था विस्कळीत झाल्याचं चित्र आहे. अनेक ठिकाणी रुग्णांवर उपचार होत नसल्याचं दिसून येत आहे. त्याचा फटका राज्यभरातील नागरिकांना बसत आहे.

महाराष्ट्र गव्हर्मेंट नर्सेस फेडरेशन संघटना सुद्धा आज पुकारलेल्या संपात सक्रिय सहभागी असणार आहे. त्यामुळे सरकारी रुग्णालयातील रुग्णसेवेवर या संपामुळे मोठा ताण पडणार आहे. यामध्ये तृतीय श्रेणी आणि चतुर्थ श्रेणीतील सर्व कर्मचारी हे सकाळी साडेसात वाजल्यापासून संपावर गेले आहेत. सरकारी रुग्णालयातील नर्सेस, क्ष किरण विभाग तंत्रज्ञ प्रयोगशाळा तंत्रज्ञ, लिपिक वर्ग, सफाई कामगार, कक्षसेवक हे सर्व कर्मचारी संपावर गेल्याने सरकारी रुग्णालयात आरोग्य सेवा ढासळण्याची शक्यता आहे. सरकारी रुग्णालयात सर्व सेवा या डॉक्टर्स त्यासोबतच शिकाऊ परिचारिका आणि निवासी डॉक्टर यांच्यामार्फत सुरू राहतील मात्र या सेवा सुरू असताना इतर कर्मचाऱ्यांची साथ त्यांना आज मिळणार नाही.

**वाशिम जिल्ह्यातील कर्मचाऱ्यांनी काढला मोर्चा**

राज्य शासनाच्या अधिकारी, कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू करण्याच्या मागणीसाठी आज वाशिम जिल्ह्यातील शासकीय निमशासकीय कर्मचारी संपात सहभागी झाले आहेत . आरोग्य विभागानेही या संपात सहभाग घेतल्याने आरोग्य यंत्रणा विस्कळित झाली आहे . संप पुकारलेल्या कर्मचाऱ्यांकडून मोर्चा काढण्यात आला .

**सरकार विरोधात घोषणाबाजी**

जुन्या पेन्शनसाठी सर्व कर्मचारी एकजुटीने संपामध्ये सामील झाले आहे . ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयाबाहेर हजारोच्या संख्येने कर्मचारी निदर्शन करत आहेत . सरकार जोपर्यंत जुनी पेन्शन लागू करणार नाही तोपर्यंत असाच संप सुरू राहणार असल्याचा सरकारी कर्मचाऱ्यांनी दिला आहे . यामुळे नागरिकांना मोठा फटका बसत आहे .

**रत्नागिरी जिल्ह्यात 15000 कर्मचारी संपावर**

जुनी पेन्शनसाठी रत्नागिरी जिल्ह्यात देखील मोठ्या प्रमाणात कर्मचारी संपात सहभागी झाले आहेत . परिणामी जिल्ह्यातल्या सर्वच शासकीय कार्यालयांमध्ये सध्या मनुष्यबळाची कमी जाणवत आहे . जिल्ह्यातल्या सर्व तहसील कार्यालयासमोर कर्मचारी एकत्र गोळा झाले असून जोरदार घोषणाबाजी करत आहेत . आमच्या मागण्या पूर्ण होत नाही तोवर माघार नाही अशी भावना हे कर्मचारी बोलून दाखवत आहेत . जिल्ह्यात 15000 कर्मचारी संपात सहभागी झाले असून आपत्कालीन परिस्थितीसाठी पोलीस आणि होमगार्ड यांची देखील मदत घेतली जाणार आहे .

**बीडच्या पोलीस अधीक्षक कार्यालयातील कर्मचाऱ्यांनी पुकारला संप**

जुनी पेन्शन योजना लागू व्हावी यासाठी राज्यभरातील प्रशासकीय सरकारी कर्मचारी हे संपावर गेले आहे . यामध्ये बीडच्या पोलीस अधीक्षक कार्यालयातील प्रशासकीय कर्मचारी देखील या संपामध्ये सहभागी झाले आहेत . कायदा आणि सुव्यवस्थेसाठी ही लोकं काम करत असतात मात्र जुनी पेन्शन योजना लागू व्हावी यासाठी पोलीस अधीक्षक कार्यालयातील या कर्मचाऱ्यांनी देखील संप पुकारला आहे .

## बिहारी राडा

आधुनिक केसरी

बिहार विधानसभेच्या प्रश्नोत्तरावेळी मंगळवारी मोठा गोंधळ पाहायला मिळाला. सत्ताधाऱ्यांकडून शिवीगाळ झाल्याचा आरोप केला जात आहे. तर प्रश्न विचारणाऱ्या भाजपा आमदार लखेंद्र कुमार रोशन यांनी माईक तोडला. त्यानंतर सत्ताधारी आणि विरोधी पक्ष समोरा-समोर आले. माईक तोडल्याच्या घटनेनंतर भाजपा आमदार लखेंद्र कुमार रोशन म्हणाले की, माईक तोडला नव्हता तर तो केवळ उघडला गेला. रोशन यांनी माईक तोडल्यानंतर डाव्या आमदारांनी त्यांना शिवी दिली. त्यानंतर दोन्ही पक्षाच्या आमदारांनी एकमेकांना शिवीगाळ केली असल्याचा आरोप केला जात आहे. हे प्रकरण चांगलेच तापले होते. त्यानंतर सभागृहाचे कामकाज दोन वाजेपर्यंत तहकूब करावे लागले. भारतीय जनता पार्टीने बिहार विधानसभेचा अर्थसंकल्पीय अधिवेशनारम्यान उपमुख्यमंत्री तेजस्वी यादव यांच्याविरोधात भ्रष्टाचाराच्या आरोपांचा मुद्दा उपस्थित केला आणि घोषणाबाजी केली. भाजपा आमदार लखेंद्र कुमार रोशन यांनी विधानसभेच्या बाहेर माध्यमांशी बोलताना सांगितलं की, मी माईक तोडला नाही, तो केवळ उघडला गेला होता. मी तो माईक ठिक करण्याचा प्रयत्न केला. तो मायक्रोफोन खाराब झाला आणि बंद झाला. रोशन म्हणाले की, आम्ही अंगणवाडी कर्मचाऱ्यांच्या मानधनाबद्दल प्रश्न उपस्थित केला होता. यादरम्यान, माझा माईक बंद झाला. मी विचारले की, माइक बंद का झाला. त्यानंतर सत्यदेव राम (डावे विधायक) यांनी मला शिवी दिली. मी जेव्हा माइकला हात लावला तसा माइकचा वरचा भाग उघडला गेला. या माइकचा वरचा भाग आधीपासूनच उघडा होता. दरम्यान, डावे आमदार सत्य देव राम म्हणाले की, “रोशन बोलत असताना मी माझ्या खुर्चीजवळ उभा होतो. अध्यक्षांनी दुसऱ्या एका सदस्याचं नाव पुकारले होते. त्यानंतर रोशन यांनी मायक्रोफोन तोडला.

# भ्रष्टाचारासाठी विरोधकांची 'यारी'?

आधुनिक केसरी



कमलाकर जोशी
ज्येष्ठ पत्रकार, नांदेड
संपर्क क्र. 9422170850

**देशात काँग्रेसची सत्ता असताना सर्व विरोधी पक्ष भ्रष्टाचाराला फाशी द्या' अशी मागणी करत असत.पण आज विरोधी पक्षांचे धोरण व भूमिकेत बदल झालेला आहे.तो भ्रष्टाचाराबाबत राजकीय पुढाऱ्यांवर कारवाई करू नका,अशी मागणी करत आहे,यासाठी ते संघटीत होवून रस्त्यावर उतरत आहेत.मोदी सरकार सूडभावाने विरोधी पक्षावर कारवाई करत असल्याचा कांगावा करत आहेत.याबाबत मोदी सरकार घटनेतील कोणत्या कलमांचे उल्लंघन करत आहेत? हे ते स्पष्ट करत नाहीत. देशात भ्रष्टाचार शासकीय धिकारी, सामान्य कर्मचारी करतो काय? राजकीय पुढारी 'धर्मराजांचे' औलात आहेत काय ? भ्रष्ट पुढाऱ्यांची चौकशी, गुन्हा नोंद,अटक करावयाचेच नाही काय? असा संसदेत कायदा संमत झालेला आहे काय ? हा सामान्य माणसाचा साधा प्रश्न आहे. भ्रष्टाचार हा प्राचीन साथीचा रोग आहे.**

आर्यचाणक्य यांच्या 'कौटिलीय अर्थशास्त्र' ग्रंथात भ्रष्टाचाराबाबत ४० प्रकाराचा उल्लेख आहे.देशात या रोगाची राजकीय मोठ्या प्रमाणात क्षेत्रात लागण झालेली आहे. प्रारंभी राजकारण म्हणजे समाजकारण या भावनाने केले जायचे. तेंव्हा म.गांधी यांचे विचारांचा प्रभाव होता. त्यामुळे काँग्रेस नेते भ्रष्टमार्गाचा अवलंब करत नसत. भारतीय राजकारणात घटनाकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे होते.तसेच गुलजारीलाल नंदा, लालबहाद्दुर शास्त्री, चौधरी चरणसिंह, चंद्रशेखर, अटलबिहारी वाजपेयी हे पंतप्रधान तर महाराष्ट्रात यशवंतराव चव्हाण,मारोतराव कन्नमवार,वसंतराव नाईक,वसंतदादा पाटील,आणि शंकरराव चव्हाण, देवेंद्र फडणवीस हे नेते मुख्यमंत्री झाले.या नेत्यावर भ्रष्टाचाराचा कधी डाग लागलेला नाही.आज काँग्रेस पक्ष महात्मा गांधी विचारावर चालणारा आहे,असे सांगितले जाते. पण प्रत्यक्षात पक्षाच्या विचारात व आचरणात फरक आहे.श्रीमती इंदिरा गांधी १९६७ मध्ये राजकारणात आल्यानंतर सत्तेचा गैरवापर सुरु केला. तर महाराष्ट्रात १९७८ मध्ये शरद पवारांनी सत्तेसाठी पक्षात पहिले बंड ( गद्दारीचे बीज पेरले ) केले.त्यांनीच भ्रष्टाचाराला शिष्टाचाराला दर्जा दिला.श्रीमती गांधी यांना न्यायालयाने सत्तेसाठी शासकीय यंत्रणेचे गैरवापर केल्याचा ठेवत अपात्र ठरविले होते.भारताच्या पंतप्रधानावर भ्रष्टाचाराबाबतचा पहिला निकाल आहे.त्यानंतर श्रीमती गांधी सूडभावनेने पेटल्या. त्यांनी देशात आणीबाणी लादली,विरोधी पक्ष नेत्यांना तुरुंगात टाकले! याला विरोधी पक्षावर सूडाची कारवाई.तरीही त्यांना भारतरत्न पुरकार देण्यात आला. श्रीमती गांधी व राजीव गांधी यांची वेगळ्या कारणाने हत्या झाली. पण काँग्रेस त्यांना शहिदाचा दर्जा देत आहे.देशात भ्रष्टाचाराची कीड मोठ्या प्रमाणात वाढत चालली आहे.राजकारण हा व्यवसाय बनलेला आहे. देशात ८५ टक्के राजकीय नेते भ्रष्टाचारात गुंतले आहेत,हे दिसतेयच! म्हणून तर त्यांचेवर कारवाई कुऱ्हाड चालविली जात आहे. काँग्रेस व इतर पक्षाचे सरकार असताना २००४ -१४ मध्ये ११२ धाडी टाकण्यात गेल्या.त्यात ५३४६ संपत्ती जप्त केली गेली.त्यावेळी २६ राजकीय नेत्यावर कारवाई केली. त्यात १४ विरोधी पक्षाचे होते.भाजपा सरकार च्या काळात २०१४ -२२ पर्यंत ३०१० धाडी टाकून १ लाखाच्यावर संपत्ती जप्त करण्यात आली.यात १२४ राजकीय नेत्यावर कारवाई केली.त्यात ११५ विरोधी पक्षाचे आहेत.हा फरक आहे. काँग्रेस सरकारने पक्षावर कारवाई केली होतीच ना! कायदासमोर सर्वच समान आहेत. तेथे भेदभाव करता येत नाही. जर भ्रष्टाचाराची घाण साफ करण्यासाठी जर राजकीय नेत्यावर कारवाई होत असेल तर त्याचे स्वागत केले पाहिजे.पण काही विव्दानांनी भेदभाव दाखविण्यासाठी विरोधी पक्षावर कारवाईचे प्रमाण काढले व ओरड सुरु केली.आता जेथे 'धूर तेथे आग' लागली,असे समजले जाते! मग भ्रष्टाचार तेथे 'ईडी' जाणारच ना! देश भ्रष्टचार मुक्त झाला पाहिजे ,हे प्रत्येक पक्षाचे नेते भाषण देतात.पण भ्रष्टाचाराची कारवाई मला व माझ्या पक्षातील नेत्यांना सोडून झाली पाहिजे, अशी त्यांची असेच वाटते.काँग्रेस राजवटीत सी.बी.आय.ची स्थापना १ एप्रिल १९६३ ईडी विभागाची १ मे १९५६. इन्कम टॅक्स विभागाची १ जानेवारी १९६४ भारतीय निवडणूक आयोग २५ जानेवारी १९५० न्याय प्रणालीला सर्वोच्च न्यायालयाची २८ जानेवारी १९५० मध्ये स्थापना झाली.यातील काही संस्था तर इंग्रजाच्या काळापासून आहेत. काँग्रेसने स्वातंत्र्यानंतर काँग्रेस सरकारने यात बदल केले. घटनेप्रमाणे संस्थेना दर्जा व अधिकार दिला. तेंव्हा काँग्रेस सरकारचा उद्देश काय होता ? या तपास संस्था मोदी सरकारने स्थापन केलेल्या नाहीत. पण आज याच संस्था काँग्रेस पक्षासह,आम आदमी, राष्ट्रीय जनता दल, समाजवादी पक्ष,शिवसेना उध्दव गट,तृणमूल काँग्रेस पक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस,तेलगणा भारत राष्ट्र समिती पक्षाला अप्रिय वाटू लागल्या आहेत. सपाचे नेते अखिलेश यादव यांनी भाजपा सरकार हे सुध्दा काँग्रेसप्रमाणे वाटचाल करत आहे,असे म्हंटले आहे.कारण काँग्रेस सत्तेत असताना सी.बी आय ने २००७ नेताजी मुलायमसिंग व अखिलेश यादव यांचेवर अधिक संपत्तीबाबतची कारवाई केली होती.ही चौकशी १२ वर्षे चालली होती.आता न्यायालयाने हे चौकशीचे प्रकरण बंद केले.तसेच १९९६ मध्ये लालाप्रसाद यादव यांचेवर चारा घोटाळ्यात कारवाई केली झाली. त्यात त्यांना शिक्षा झाली. तेंव्हा काँग्रेसचे सरकार होते ना ! आता ते रेल्वे मंत्री असताना नोकरीच्या बदल्यात जमीन घेतलेल्या आरोपाची चौकशी होत आहे. काँग्रेस सरकारने गुजरात दंगल व बनावट चकमक प्रकरणी काँग्रेसने केंद्रीय तपास यंत्रणेव्दारे भाजपा नेते मोदी व शहा यांचा छळ केला होता.याचा विसर पडला वाटत! तेंव्हा भाजपा रस्त्यावर 'पथनाट्य' केले नाही.हे नेते तपास यंत्रेणेच्या चौकशीच्या समोरे गेले. न्यायालयाने मोदी व शहा यांचे विरोधात बनावट खटले दाखल केल्याचे निकालात म्हंटले आहे.न्यायालयाने काँग्रेसची सरकार असताना सी.बी.आय.ला पोपट म्हंटले होते.काँग्रेस सरकारला जर तपास यंत्रणेचा गैरवापर होईल हे माहित असतानाही त्या चालू का ठेवल्या ?त्याच संस्थाचा गैरवापर नव्हे.आता योग्य वापर होऊ लागलेला आहे.ज्यांनी 'हा खडा खोदला' तेच यात पडत आहेत.या तपास यंत्रणा राजकीय नेत्यांचा गळ्याचा फास बनत चालल्या आहेत.प्रत्येक पक्षाचा नेता, त्यांचे नातेवाईक घोटाळ्यात आहेत.पण मोदी सरकार विरोधी पक्षाला लक्ष्य करत आहे,असे आरोप करत विरोधी पक्ष संघटीत होवून रस्तावर उतरून आंदोलन करू लागला आहे.आश्चर्य वाटते!भारतीय घटनेत राजकीय पुढाऱ्यांना भ्रष्टाचार करण्याबाबत आरक्षण व संरक्षण,अथवा विशेष सूट दिली आहे काय ? हे नेते भ्रष्ट नेते व पक्ष त्या आरोपाला न्यायालयात आव्हान देण्याऐवजी राजकीय रंग देवून निष्पाप असल्याचे नाटक करत आहेत.त्यात दुसरा आरोप असा की, भाजपा नेत्याविरोधात कारवाई केली का जात नाही ? असा प्रश्न विचारला जातो ? मोदी सरकारने करावयाचे काय ? काँग्रेस सत्तेत असताना भाजपा नेत्यांना संरक्षण का दिले ?यात राष्ट्रवादी नेते शरद पवार हे 'तेल लावले पेहलवान' आहेत! त्यांचेवर भ्रष्टाचार,भूखंड घोटाळ्याचे आरोप झाले! तरीही काँग्रेस पक्ष काय ? मोदी सरकार कारवाई करू शकले नाही.याचे 'इंगीत'समजत नाही.परवा विरोधी विरोधी पक्षातील नऊ नेत्यांनी पंतप्रधान मोदी यांना तपास यंत्रणेचे गैरवापर होत असल्याचे पत्र दिले. यावर पहिली सही पवारांची आहे. भ्रष्टाचारात पक्षाचे छोटे मासे सापडले जात आहेत ?काँग्रेसच्या नेत्या माजी अध्यक्ष सोनिया व पूत्र राहूल गांधी हे भ्रष्टाचाराच्या आरोपावरून जामीनावर आहेत.त्यांना ईडीने नॅशनल हेराल्ड प्रकरणी चौकशीसाठी बोलावले असताना काँग्रेसने रस्त्यावर नाटकबाजी केली होती. आज काँग्रेस पक्षाचे नेतृत्व आम आदमी,तृणमूल काँग्रेस तेलंगणा भारत राष्ट्रीय समितीला मान्य नाही. तेंव्हा काँग्रेस सोडून ते तिसरी आघाडी करण्याच्या तयारीत आहेत. खा. राहूल गांधी यांनी ब्रिटनमध्ये जाऊन भारताची बदनामी करुन त्यांनी राजभंग केला आहे. त्यांना परदेशात जाण्यासाठी प्रतिबंध घातला गेला पाहिजे. देशातील जनता २०१४ व २०१९ ते आताही काँग्रेस पक्षाचा सतत पराभव करत आहे,त्यामुळे काँग्रेस नेते व गांधी नैराश्यात आहेत. त्यामुळेच ते मोदी विरोधातून भारत भूमिका घेऊ लागले आहेत. राहूल गांधी यांचे नाव वआडनाव संशयास्पद आहेच.पण ते हिंदू ही नाहीत,अशी टीका नेते अजय अलोक यांनी प्रसार माध्यमावर चर्चेवेळी केली. तेंव्हा आधुनिक गांधी या 'अर्धवटरावां'कडून देशप्रेमीची अपेक्षा करणे चुकीचे आहे. काँग्रेस आणि केजरीवाल हे परस्परा विरोधात भ्रष्टाचाराचे आरोप करतात.तपास यंत्रेणचे समर्थन करतात.यातून या पक्षांची भ्रष्टाचाराबाबत दुटप्पी नीती आहे. आम आदमीचे मनीष सिसोदीयांना अटक झाली.दिल्लीचे दारू घोटाळ्याचे धागेदारे तेलंगणात के.सी. आर.ची मुलगी के.कविता पर्यंत पोचलले आहेत. तीला आता महिला आरक्षणाची उपरती झाली. केजरीवाल यांनी गांधी राजघाटाऐवजी शक्तीस्थळ येथे जाउन मौन पाळले असते तर अजून भ्रष्टाचार करण्याची नवीन कल्पनेचे ज्ञान प्राप्त झाले असते. केजरीवाल यांनी पूर्वी भ्रष्ट नेत्यांची यादी जाहीर केली होती.आता तो 'लावा रे व्हिडिओ पहा' म्हणजे याचे सरड्याप्रमाणे रंग बदलत आहेत,हे दिसेल. राष्ट्रवादी जनता दलाचे सर्वेसर्वा लालू प्रसाद यांचे परिवारावर धाडी पडल्या. ते रेल्वे मंत्री असताना नोकरी देण्याच्या बदल्यात करोडा रूपायांचे भूखंड घेतलेल्या प्रकरणाची चौकशी चालू आहे.खर तर! लालूचा परिवार सामान्य परिवार राजकारणात येताच करोडपती कसा झाला ? महाराष्ट्रात राष्ट्रवादी काँग्रेस व काँग्रेस पक्ष भ्रष्टाचाराची गंगा आहे.पूर्वी दोन मंत्री जेल मध्ये गेले,आता हसन मुश्रीम यांचे चौकशी चालू आहे. शिवसेनेचे नेते अनिल परब यांचे भागीदार सदानंद कदम यांना अटक झाली.यामुळे राष्ट्रवादी काँग्रेस,आम आदमी, तृणमूल काँग्रेसच्या भ्रष्ट नेत्यावर कारवाई चालू आहे.त्यांचेकडे बेनामी संपत्ती व करोडो रूपये सापडत आहे.तरी त्यांना नेते निर्दोष वाटतात. भारतीय कायद्याप्रमाणे भ्रष्टाचाराच्याआरोपाची चौकशी करण्याचे व निर्णय देण्याचे अधिकार न्याय संस्थेला आहेत.राजकीय पक्षांना निर्दोष याचा निकाल देण्याचा नाही. पूर्वी भ्रष्टाचाराबाबत खालच्यास्थरावरच कारवाई होत असे, आता वरच्या स्थरावरुन होऊ लागली आहे. हा तर फरक आहे. भारतीय निवडणूक आयोगाने ठाकरे गटाचे शिवसेना पक्ष व धनुष्यबाण चिन्ह शिंदे गटाला देण्याचा निर्णय दिला. तेंव्हापासून ठाकरे गट भारतीय निवडणूक आयोगाने शिव्या घालत आहे.पूर्वी विरोधी पक्षांनी" ईव्हीएम' मशीनवरून निवडणूक आयोगावर हल्ला करत होते. आता त्याच विरोधी पक्षांची तोंड बंद झाली आहेत. परवा सर्वोच्च न्यायालयाने लोकशाहीत निवडणूका या निः संशय व निष्पपक्षपाती पणाने व्हाव्यात म्हणून निवडणूक मुख्य आयुक्ताची निवड समिती मार्फत करण्याचा निर्णय दिला आहे. घटनेतील कलम ३२४ नुसार मुख्य निवडणूक आयुक्त व इतर निवडणूक आयुक्तांचा निवडीचा कायदा करण्याचा अधिकार संसदेला देण्यात आल्याचे उल्लेख आहे. तर मग सत्तर वर्षात निवडणूक आयुक्ताच्या निवडीचा कायदाच गेला नाही. पण सी.बी. आय. मुख्य संचालकाची पंतप्रधान,सरन्यायाधीश व विरोधी पक्ष नेता समितीमार्फत निवड केली जाते,तरीही सी.बी.आय.या संस्थेवर प्रश्न चिन्ह निर्माण केले जातात.हा घटनात्मक संस्थाचा अवमान वाटत नाही काय ? त्या समितीने निवडणूक मुख्य आयुक्ताची निवड केली तर आयोगावर प्रश्न चिन्ह निर्माण केले जाणार नाही काय ? याची खात्री आहे काय ? हाच नियम न्याय संस्थेला लागू झाला पाहिजे काय ? आज न्याय यंत्रेणेकडे राजकीय नेते,चित्रपट कलाकार पैश्याच्या जोरावर उच्च न्यायालयात,लगेचच सर्वोच्च जातात,त्यांना लगेच जामीन,न्याय मिळतो, मग सामान्य माणसाला असा न्याय मिळतो काय ? याचा अर्थ 'जिसकी लाठी उसकी भैस' असेच चालले आहे.सामान्य गुन्ह्यातील आरोपी मात्र वर्षानुवर्षे करागृहात सडत आहेत,ही वस्तुस्थिती आहे.

# एक्सपर्ट इन- एका घावात दोन तुकडे ?

आधुनिक केसरी



श्रीकृष्णदास निरंकारी (बापू)
संपर्क क्र. 9423714883

**सुरेश भट यांचा जन्म ब्राह्मण कुटुंबात झाला होता. मात्र आयुष्याच्या उत्तरार्धात त्यांनी बौद्धधम्म स्वीकारला. भाऊ लोखंडे यांच्या उपस्थितीत भन्ते सुरई ससाई यांनी त्यांना धम्मदीक्षा दिली होती. ते नास्तिक होते. विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे त्यांचे श्रद्धास्थान होते. बौद्ध धम्म हा ईश्वराचे अस्तित्व नाकारणारा व डॉ.बाबासाहेबांचा धम्म आहे. त्यामुळे त्यांनी बौद्ध धम्माचा स्वीकार केला, असे मत त्यांचा मुलगा चित्तरंजन भट यांचे आहे. सुरेश भट हे मराठीतील एक सुप्रसिद्ध कवी होते. त्यांनी मराठी भाषेत गझल हा काव्यप्रकार रुजवला.**

त्यामुळे त्यांना गझलसम्राट असे आदराने संबोधले जाते. त्यांचा जन्म महाराष्ट्रातील अमरावती येथे दि.१५ एप्रिल १९३२ रोजी झाला. त्यांचे वडील श्रीधरपंत भट हे व्यवसायाने डॉक्टर होते. त्यांच्या आईला कवितांची खूप आवड होती. त्यांच्यामुळे सुरेश भट यांना लहानपणीच मराठी कवितांची आवड निर्माण झाली. ते अडीच वर्षाचे असताना त्यांना पोलिओची बाधा झाली होती. त्यामुळे त्याचा उजवा पाय जन्मभरासाठी अधू झाला होता. सुरेश भटांचा एक पाय दुर्बल झाल्यावर त्यांनी व्यायामावर जोर देऊन बाकीचे शरीर मजबूत बनवले. याचा उपयोग त्यांना गाण्यातही झाला. ते तास न् तास मैफली करू शकत. ते दंडबैठका काढत असत, पण डबल बारवर शंभर ते दीडशे डिप्स मारत. त्यामुळे इतकी शक्ती पायात आली की ते सायकल चालवू लागले. वडिलांनी त्यांना मिलर कंपनीचा डायनोमा असलेली रॅले कंपनीची सायकल महाविद्यालयात जाण्यासाठी दिली होती. काचा कुटून पतंगाचा मांजा बनविण्यात ते वाकबगार होते. त्यांना गुलेर- बेचकी किंवा गलोल बनविता येई. त्यांचा नेम अचूक असे. ते पाहून श्रीधरपंतांनी त्यांच्यासाठी खास अमेरिकन स्लिंग शॉट बंदूक आणली होती. ती वापरून भट चिमणी, कबुतर घायाळ करीत. ते भालाफेकही करीत. भालाफेकीचा सराव घराजवळच्या निंबाच्या झाडावर चाले तर तलवारबाजीचा प्रा.बाबा मोटे यांच्याबरोबर चालत असे. एका घावात दोन तुकडे करण्यात ते एक्सपर्ट होते. त्यांनी एचएमव्हीचा एक ग्रामोफोन आणला होता. मुलाची आवड पाहून आठवड्यातून ते एक तरी ध्वनिमुद्रिका विकत आणत. ही संगीत आवड सुरेश भट यांना शाळेच्या बँडपथकात घेऊन गेली. तिथे ते बासरी वाजवीत. संगीतातील गती पाहून त्यांच्या वडीलांनी त्यांना रीतसर संगीत शिक्षण द्यायचे ठरविले आणि प्रल्हादबुवा घरी येऊ लागले. आजारी असताना ते तास न् तास अंथरुणावर बासरी वाजवत बसलेले असायचे. ते स्वतः उत्तम गायक पण होते. त्यांचा गायनाचा एक कार्यक्रम अमरावतीत दि.२० फेब्रुवारी १९८४ रोजी झाला होता. त्यावेळी साथीसाठी पेटीवर हृदयनाथ मंगेशकर होते. अंथरुणावर बसून आणि पडून त्यांनी संतश्रेष्ठ गुलाबराव महाराज यांचा गानसोपान हा ग्रंथ आणि विष्णू नारायण भातखंडेकृत संगीत खंड असे अनेक ग्रंथ त्यांनी त्याच काळात वाचले होते. त्यांनी गानसोपानची अनेक पारायणे केली होती. सन १९५२मध्ये त्यांना तबला शिकावासा वाटल्यावर तोही ते शिकले. पुढे ते ढोलकीही वाजवीत असत. त्यांना एक मुलगी विशाखा व दोन मुलगे हर्षवर्धन व चित्तरंजन होती. त्यापैकी हर्षवर्धन यांचा अपघातात मृत्यू झाला होता. सुरेश भटांचे सर्व शिक्षण अमरावती येथे झाले. बीएला अंतिम वर्षात दोन वेळा नापास झाले. शेवटी सन १९५५ साली ते बीए पास झाले. त्यानंतर ते शिक्षकी व्यवसायात आले. अमरावती जिल्ह्यात ग्रामीण भागात नोकरी करताना त्यांनी त्यांचे कविता लेखन सुरू ठेवले होते. त्यांनी लिहिलेल्या कवितांचे एक चोपडे हृदयनाथ मंगेशकरांना एका फुटपाथवर सापडले. त्यातील कविता वाचून त्यांनी सुरेश भटांना शोधून काढले आणि त्यांच्या कवितांना चाली लावून त्या अमर केल्या. त्यांच्या गझला व कविता हृदयनाथ मंगेशकर, लता मंगेशकर, आशा भोसले, सुरेश वाडकर आदींनी गायल्या आहेत. त्यांचे काही काव्यसंग्रह- एल्गार, काफला, झंझावात, रंग माझा वेगळा, रसवंतीचा मुजरा, रूपगंधा, सप्तरंग, सुरेश भट-निवडक कविता आणि गद्य- हिंडणारा सूर्य आदी आहेत. कविश्रेष्ठ सुरेश भट हे गडचिरोली येथे भरलेल्या ३९व्या विदर्भ साहित्य संमेलनाचे अध्यक्ष होते. आयुष्याच्या अखेरच्या पर्वात त्यांनी बौद्ध धम्माचा स्वीकार केला होता. महाराष्ट्रातील नागपूर येथे हृदयविकाराच्या झटक्याने त्यांचे दि.१४ मार्च २००३ रोजी वयाच्या ७१व्या वर्षी निधन झाले.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. ( * पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद छत्रपती संभाजीनगर न्यायालयाच्या कक्षेत)आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Chhatrapati Sambhajinagar Industrial Co-op, Society, Station Road, Chhatrapati Sambhajinagar 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Chhatrapati Sambhajinagar (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Chhatrapati Sambhajinagar court.) RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# तरंग आसन करून गायला हरिपाठ

## तळवाड्याचे ह.भ.प. कृष्णा तात्यांची अनोखी साधना

आधुनिक केसरी न्यूज

**बंडू खडांगळे**

**लखमापूर :** भारतीय संस्कृतीमध्ये अनेक भक्ती साधनेला अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. त्यात ध्यानधारणा, समाधी, विविध स्वरूपांचे आसने ,विविध मंत्राचे पठण यामार्गाने प्रत्येक जण साधना करून भगवंताची भक्ती करीत असतो. परंतु याही पलीकडे पाण्यावर तरंग आसन संत ज्ञानेश्वर महाराजांचा हरिपाठ गाऊन भक्ती करतात ते तळवाडे( दिगर ) गावाचे हभप कृष्णा महाराज रौंदळ.

सध्या संत एकनाथ महाराज यांच्या पैठण येथे नाथ षष्ठी मोठ्या उत्साहात चालू आहे. येथील नाथसागरात पवित्र स्नान असंख्य भाविक भक्त करीत असतात.व देह पवित्र करीत असतात. परंतु ज्यांनी आतापर्यंत चार पायी नर्मदा परिक्रमा करून व आपल्या समाजप्रबोधनातुन जनजागृती करणारे हभप कृष्णा महाराज रौंदळ तळवाडेकर यांनी पैठण च्या नाथसागरात पाण्यांवर तरंग आसन लावून चक्क ज्ञानोबारायांचा



हरिपाठ खोल पाण्यावर तरंगून गायला व उपस्थित भाविक भक्तांना हरिपाठात काय भक्ती महिमा आहे. हे सिध्द करून दाखविले. ह.भ.प. कृष्णा महाराज यांनी या तरंग आसनावर नर्मदा मातेच्या तीरावर नर्मदे हर या भक्ती मय मंत्राचा उच्चार करून भाविक भक्तांची मने जिंकून घेतले आहे.

सध्या वयाची साठ वर्षे पूर्ण केलेली असताना तबल चार लगातार नर्मदा परिक्रमा, आळंदी, पंढरपूर, त्र्यंबकेश्वर, पैठण या क्षेत्रावरील असंख्य पायी वारी केल्या आहेत. तरंग आसन संदंभात बोलताना ते म्हणतात की मला पाण्यात पोहण्याची सवय लहानपणांपासुन



मी वेगवेगळ्या स्वरूपांची आसने आजही मोठ्या प्रमाणावर करतो . आसने ,पायी वारी इ .केल्याने आजही मी वयाची साठी पुर्ण करून मला कुठल्याही प्रकारचा आजार नाही . मी पुर्ण पणे निरोगी जीवन जगत आहेत .तरुण वर्गाला ते नेहमी सांगतात व्यसनाधिन जीवन जगण्यापेक्षा विविध आसने,परार्मथाची कास धरा व आपले जीवन यशस्वी करा .

**हभप कृष्णा महाराज रौंदळ .( तळवाडेकर )**

होती. परंतु ज्या दिवशी माझी परार्मथाची सुरुवात गुरूमाऊली कृष्णा माऊली खायदेकर यांनी केली तेव्हा पासून मला या तरंग आसनावर हरिपाठ गाण्याची सवय लागली. यामागे माझे सद्‌गुरू कृष्णा माऊली खायदेकर यांचा मोठा आर्शिवाद आहे, असेही ते मोठ्या मनाने सांगतात.

# केंद्र व राज्यातील भाजपा सरकार शेतकरी व सरकारी कर्मचारीविरोधी : नाना पटोले

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** भारतीय जनता पक्षाचे सरकार कोणत्याही मुद्द्यांवर केवळ सकारात्मक आहे असे म्हणून वेळ मारून नेते पण ठोस निर्णय घेत नाही. जुनी पेन्शन योजना लागू करावी, या मागणीसाठी २० लाख कर्मचारी संपावर गेले आहेत. जुनी पेन्शन लागू केल्यास आर्थिक बोजा पडेल असे सांगणाऱ्या सरकारकडे मुठभर उद्योगपतींची कोट्यवधींची कर्ज माफ करण्यासाठी पैसा आहे पण शेतकरी व शासकीय कर्मचाऱ्यांसाठी पैसा नाही हा सरकारचा ढोंगीपणा असून केंद्र व राज्यातील भाजपा सरकार शेतकरी व सरकारी कर्मचारीविरोधी आहे, असा आरोप महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी केला आहे.
विधिमंडळ परिसरात प्रसार माध्यमांशी बोलताना नाना पटोले म्हणाले की, सरकारी कर्मचाऱ्यांच्या संपामुळे प्रशासकीय व्यवस्था ठप्प झाल्या आहेत, जनतेची मोठ्या प्रमाणात गैरसोय होत आहे म्हणून सरकारने हा संप तातडीने मागे घ्यावा यासाठी मध्यस्थी करणे गरजेचे आहे. काँग्रेसशासित राजस्थान, हिमाचल प्रदेश व छत्तिसगडमध्ये जुनी पेन्शन योजना लागू करण्यात आलेली आहे. जे काम काँग्रेसशासित राज्ये करु शकतात तेच काम महाराष्ट्रातील शिंदे-फडणवीस सरकार का करु शकत नाही ? सरकारी कर्मचाऱ्यांच्या जुनी पेन्शन योजना लागू करण्याच्या मागणीवर राज्यातील भाजपाप्रणित सरकारने तोडगा काढावा अन्यथा खुर्ची खाली करावी.

नाशिकहून लाखो शेतकरी विधानभवनवर मोर्चा घेऊन येत आहेत, त्यांच्या पायाला जखमा झाल्या आहेत, चालून चालून पायाला फोड आले आहेत पण राज्य सरकारला त्यांची दया येत नाही. हे सरकार शेतकऱ्याला मदत करत नाही. कांद्याला फक्त ३०० रुपये अनुदान देऊन शेतकऱ्याच्या तोंडाला पानं पुसली आहेत. छत्तीसगडमध्ये काँग्रेस सरकारने धानाला ३००० रुपये भाव व ६०० रुपये बोनस दिला आहे. राज्यातील शिंदे-फडणवीस सरकार मात्र ३५० रुपये देत आहे. महाविकास आघाडी सरकार धान उत्पादक शेतकऱ्याला ७०० रुपये बोनस देत होते. भाजपा सरकार फक्त उद्योगपतींचे आहे, गरिबांचे, शेतकऱ्यांचे, कर्मचाऱ्यांचे सरकार नाही. भाजपा सरकारकडे या घटकाला देण्यासाठी पैसा नाही हे दुर्दैवी आहे, असेही काँग्रेस प्रदेशाध्यक्ष म्हणाले.

# कांद्याला पाचशे रुपये सानुग्रह अनुदान द्या : अजित पवार

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** शेतकऱ्यांना खरीप हंगामाच्यापूर्वी वेळेत आणि पुरसे पीक कर्ज उपलब्ध करुन द्यावे तसेच खतांसह, बी-बियाण्यांचे दर कमी करावेत. तसेच दर पडल्यामुळे राज्यातला कांदा उत्पादक अडचणीत आला आहे, सरकारने जाहिर केलेले अनुदान पुरेसे नाही, तरी कांदा उत्पादक शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी राज्य सरकारने प्रतिक्विंटल किमान पाचशे रुपये सानुग्रह अनुदान देण्याची मागणी विधानसभेचे विरोधी पक्षनेते अजित पवार यांनी राईट टू रिप्लायवर बोलताना केली.
दरम्यान इतर पीकांप्रमाणे फळबागांसाठी सुध्दा सवलतीच्या दरात कर्ज योजना सुरु करण्याची मागणीही अजित पवार यांनी केली.
नैसर्गिक आपत्तीसह शेतमालाला दर कमी मिळत असल्यामुळे राज्यातला शेतकरी अडचणीत आला आहे. त्यामुळे राज्यात शेतकऱ्यांच्या आत्महत्या वाढत आहेत. शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी खरीपाचे कर्ज शेतकऱ्यांना वेळेत उपलब्ध करुन देण्यासाठी सरकारने पुढाकार घ्यावा, त्यासाठी स्वतंत्र यंत्रणा उभारण्यात यावी. तसेच शेतकऱ्यांचा उत्पादन खर्च कमी करण्यासाठी खते आणि बी-बियाण्यांचे दर कमी करावेत. तसेच शेतकऱ्यांचे पीक विम्याचे दावे नाकारण्याचे प्रमाण वाढले आहे. यामध्ये सरकारने हस्तक्षेप करत पीक विमा कंपन्यांना योग्य ती समज द्यावी अशी सूचनाही अजित पवार यांनी सरकारला केली. ज्या शेतकऱ्यांना नैसर्गिक आपत्ती नुकसान भरपाई मिळालेली नाही त्यांना ती देण्यात यावी. शेतकऱ्यांना वीज बिल माफीचा निर्णय घेण्यात यावे. हरभरा, कापूस, कांद्यासह शेतमाल खरेदी केंद्रे तातडीने सुरु करावीत. महाराष्ट्र हा साखर उत्पादनात अव्वलस्थानी आहे. साखर उद्योग हाच महाराष्ट्राचा मुख्य कणा आहे. मात्र राज्यातील साखर कारखान्यांना कर्ज वाटप करताना दुजाभाव केला जात आहे, तरी ज्या साखर कारखान्यांना कर्ज आवश्यक आहे, त्यांना ते उपलब्ध करुन देण्यासाठी राज्य सरकारने हस्तक्षेप करावा अशी मागणीही अजित पवार यांनी केली.

# कामगार रुग्णालयात ईएसआयसी पंधरवडा साजरा

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** एमआयडीसी चिकलठाणा येथील राज्य कामगार विमा योजना रुग्णालयात दि. 24 फेब्रुवारी 2023 ते दि. 10 मार्च 2023 या कालावधीत ईएसआयसी पंधरवडा साजरा करण्यात आला. यानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. ईएसआयसीचा पंधरवाडा दरवर्षीप्रमाणेच याही वर्षी दि. 24 फेब्रुवारी ते 10 मार्च 2023 या कालावधीत साजरा करण्यात आला. या पंधरवाडयात आंतरराष्ट्रीय तृणधान्य वर्ष, आंतरराष्ट्रीय महिला दिन हेही कार्यक्रम घेण्यात आले. या दरम्यान सीपीआर फर्स्ट ट्रेनिंग, ईएसआयसीच्या विविध उपलब्ध सुविधांची माहिती, पिसादेवी येथे नागरी



वस्तीत स्वच्छता मोहीम, विमाधारकांचे तक्रार निवारण सुविधा समागम, चाळीस वर्ष वयोगटातील विमाधारकांचे ईसीजी, रक्त शर्करा तपासणी, महिलांचे कॅन्सर आजारावर डॉ.अनुप तोष्णीवाल यांचे मार्गदर्शन, आंतरराष्ट्रीय तृणधान्य दिनानिमित्त तृणधान्य फायदे व पौष्टिक आहाराबाबत आहारतज्ज्ञांचे मार्गदर्शन, तृणधान्यापासून तयार केलेल्या पदार्थांचे प्रदर्शन फॉरमी स्टुडिओचे शशिकांत बोडके यांनी प्रदर्शित केले. या

सर्व कार्यक्रमास कामगार रुग्णांचा मोठा प्रतिसाद लाभला. सदरील सर्व कार्यक्रम महा-राकावियो सोसायटीचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.अशोक करंजकर, संचालक प्रशासन महेश वरुडकर, संचालक वैद्यकीय डॉ.संजय ढवळे, राज्य आयुष नोडल अधिकारी डॉ.संजय गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच कामगार रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ.विवेक भोसले यांच्या देखरेखीखाली संपन्न झाले. सदरील कार्यक्रमास विशेषज्ञ, वैद्यकीय अधिकारी, परिचारिका व कर्मचारी वर्गाचे सहकार्य लाभले.




महाराष्ट्र Business Katta












# माय माऊल्यांनो ! तुमच्या कर्तृत्वापुढं आभाळ ठेंगणं होवो !

## संयमाचा परीघ



चित्र : बाबूराव पाटील, भोकर




प्रा. डॉ.मुकुंद राजपंखे
संपर्क क्र. 9881294226

भाग : १९

आधुनिक केसरी

सणावाराला शेजारच्या घरातुन चुलीवर रटरट शिजवलेले इलायची घातलेलं पुरण खमंग सुवासाच्या दर्वळात काटवटीत घेऊन पितळीतांब्यानं रांधत असतात बायका आणि त्यांच्या पिंगने पोरं-पोरी हातात पुरणाचे बारकुले गोळे घेऊन खात असतात शेंबडासह, तेंव्हा आपले लेकरं टुकूटुकू बघंत राहतील या धास्तीनं गर्भगळीत झालेली माय माऊलीआपल्या लेकरांना ऊनऊन भाकरीचा पापुडा काढून मिरचू कुटलेल्या खलबत्यात रगडून मुटका करुन देते... आपल्या गरीबीचे लक्तर टांगू देत नाही वेशीवर लेकरांना... घरातच अडकवून ठेवण्याचा आटोकाट प्रयत्न करते. या माय माऊल्या शाळेतही गेल्या नाहीत कधी, एक अक्षरही फुटंत नाही यांना. माझी जीभ धजावत नाही या माय-माऊल्यांना अडानी, अनपड, अशिक्षीत म्हणायला. या पोरांचे माय-बाप ऊस तोड कामगार, उसाच्या फडात आहेत परजिल्ह्यात, पश्चिम महाराष्ट्रात.पेतं सोबत घेतलं आहे आणि बारकं एक म्हाता-या आजी आजोबासोबत आणि सद्गुणी मायीच्या काळजाच्या गुरुजींच्या जिवावर सोडलंय गावात परदिशी लेकरासारखं. बारकं तोंड करुन मायीच्या म्हागारी लेकरं शाळंतल्या खिचडीवर दुपारची गुजरान करतात, जिल्हा परिषदेच्या वसतीगृहाच्या जिवावर. ही लेकरं सायंकाळी म्हाता-या आजीला मदत करतात जळणं आणायला, पिटाचा डब्बा आणतात, टकुरं भाजून निघतं चक्कीहून गरम दळण घरी आणताना. बारकुल्या कळशांनी आणतात पाणी.पोरी सोरी आजी- आजोबांसोबत ठेवावं की नाही यावर बक्कळ खलबतं होतात आणि परिस्थिती रडकुंडीस आणते माय-बापाला आणि अखेर ठोकर सुमी सोबत जाते आई-वडीलांच्या, शाळा बुडवूनच, तिचं अगतीक रडणं काळीज पिळवटून टाकणारं, पण पर्याय नाही त्यालाही. शाळा सोडून माय-बापासोबत जायचं म्हणून कसलाच आनंद नसतो तिच्या मनात परंतू परिस्थिती देत नाही परवानगी तिला. शाळा बुडते आहे याचं दुःख नाही अशा वेळी,लेकरु सोबत राहील डोळ्यासमोर आपल्या, हे मायीचं मनही समजून घेणं मला महत्वाचं वाटतं.या भयानंही काळीज पिळवटून निघतं संवेदनशील मनुष्याचं. ही गरीबीनं कुपाटीवर होरपळून काढलेली माय-बाप मंडळी आणि या भयानकात भरडंत चाललेलं बालपण आपली मोठी अडचन आहे. यावर कुणी जबाबदार व्यवस्था उत्तर शोधंत नाही, हे त्याहून वाईट. ती पहाटे उठून ब्रश करून अर्ली मॉर्नींग वॉक करते नियमीत. वेट लॉस करण्यासाठी किती कॅलरीज जाळायला हव्यात याचं गणीत असतं तिचं 'सखी मंचच्या हेल्थ केअर यूनीट'कडून बनवून घेतलेलं. दोरीवरल्या उड्या मारवत नाहीत तिला हल्ली. सकाळची सगळी कामं चटचट अटोपून लेकराचा डब्बा शाळेच्या 'टिफीन प्लॅन' नुसार तयार केलेला असतो तिने. चुकूनही डब्यात कांदा पोहे द्यायचे नाहीत किंवा बिस्कीट्स, चॉकलेट्स नो, बर्गर पिझ्झा तर नो म्हणजे नोच ! कधी इडली,वडा सांबर, कधी आपे-नारळ चटणी, कधी पोळी भाजी कधी गुळचिट दही-धपाटं कधी पुरी-भाजी कधी ऊसळ पोळी... मंडे टू सॅटरडे टिफीन प्ल्यानची शिस्त म्हणजे शिस्त ! गाडी हॉर्न वाजवायच्या आत गाऊनवरंच लेकराची वॉटरबॅग आणि टिफीन बास्केट हातात घेऊन ओडंत नेते अक्षरशः लेकराला स्टॉपवर आणि बसवते गाडीत प्लिजंट स्माईलसह. किन्नर भैय्याकडं 'काळजी घ्या'ची धावती नजर टाकते आणि गाडी हालली म्हणजे जाता जाता अगदीच कॅज्युअल हसून विचारते गोचडे सरांना तनूची आई आज तनूला सोडायला का बरं नाही आली म्हणून. बंटीच्या आईची फिगर तिला अक्षरशः जाळून टाकते. इर्षेनं होरपळंतच बिचारी गाटते घर. लेकराच्या इंग्रजी माध्यमाच्या शाळेचं आरंभी वाटलेलं आप्रूप हळूहळू ओझं वाटायला लागतं तिला. 'जीवघेण्या स्पर्धेत टिकायला हवं लेकरु' म्हणून काय काय करंत नाही ती... बबडीला कथ्थक डान्स, अमीतला तबला, ट्युशन्स, क्रिकेट अकादमी... एक ना अनेक... काय काय करंत असते... 'आमच्या ह्यांना कांही कळंत नाही हो ! मलाच सगळं बघायचं असतं. साहेबांना वेळ कुठं असतो ऑफिसातून बाहेर पडायला म्हणते तिच्या मम्मीला आणि हमखास तिच्या आईचं कौतुक पदरी पाडून घेते. संडे म्हणजे हमखास पाव-भाजी, आईस्क्रीम नाही तर बर्गर-पिझ्झाच लेकरांच्या आग्रहाखातर... काय होतं एक दिवस खाल्लं तर म्हणून. शाळेला कधीच न कळू देता. तो कमावता. ती कमावती. तो अपडाऊन करतो. ती अपडाऊन करते. लेकरं सकाळी शाळेत जातात. दुपारी परत येतात. सविताताई येतात लेकरांची काळजी घ्यायला. हवं असेल तर दूध देतात गरम करुन लेकरांना. बिस्कीट्स वगेरे हवे असतील तर देतात काढून... लेकरांना कांही हवं नको बघतातच. सविताताईंना कधी मधी यायला उशीर झाला अथवा आल्याच नाहीत म्हणजे परिस्थीती अगदीच अवघड होते. लेकरं लगेच ममाला फोन करुन कळवतात. आईची अगतीकता वाढंत जाते परंतू पर्याय असंत नाही कार्यालयात थांबण्याशिवाय. भूक लागलेली असते लेकराला आणि हातालाही येत नाही किचनओटा. खालच्या कप्प्यात पोळीच्या डब्यात ठेवलेली पोळी आणि प्लेटझाकून ठेवलेली भाजी खावून खेळतात लेकरं घरातच दार बंद करुन टेडीसोबत नाही तर बसतात कांही लिहीत वाचंत, नाहीतर मोबाईल, टी व्ही बघंत. दारातल्या मोत्याला दूध काला करुन ठेवलेलाच असतो. चिऊंचा गलबला सुरु असतो दुध-काल्या भोवती... कैकजनी तर मोत्याच्या अंगावर बसलेल्या असतात. हे बघूनही बरेच रमतात लेकरं. छान बघंत बसतात किती तरी वेळ... आईने काळजीवाहू सविताताई नेमलेल्या असतात लेकरांची काळजी घ्यायला. त्या हवं असेल तर दूध देतात गरम करुन दादूला, सुमीला. बिस्कीट्स वगेरे हवे असतील तर देतात काढून... लेकरांना कांही हवं नको बघतातच. अक्षरशः जिवावर आलेत हे सण समारंभ, पाहुणे-रावळे आणि कार्यालयाची कामं. एक सुट्टी मनासारखी जगता येत नाही. अगोदरंच टिचा पडलाय... 'यांच्या दाराला कायम कुलूप असतं' यांच्या घरी पाहुण्यांनी सुट्यांच्या दिवशी आलं तर चालेल.दिवाळी, उन्हाळाच्या सुट्ट्यात आलात तर उत्तम. 'नातलगांनी शनीवार सायंकाळ आणि रविवार सोडून तसदी देऊ नये' हा अलिखीत नियम दारावर 'घरी कुत्रा आहे.



सावधान !' या सोबतच लावायला हवा होतं असं कितीदा तरी वाटून राहिलं वंदनाताईंना. 'आपल्या घरी पाहुणा-रावळा येत नाही' ही खंत वाटूनही उपयोग नाही. 'घरी बुजुर्गींची काळजी कोणी घ्यायची ?' हा विषयही ब-यापैकी मिटवून टाकला मंडळींनी त्यांना गावीच ठेवून किंवा आश्रमांनी ठेऊन दिले आई-वडील नाविलाजास्तव. कुणीच येत नाही दारावर पाहुणा-रावळा. सरांचं ऑफिस असतं आणि ताईंचं कार्यालय. दोघंही नौकरीला. त्यामुळं घरी कोण ? लेकरं आपापल्या शाळा, कॉलेजांनी. त्यामुळं रविवार शिवाय सुट्टीच नाही आणि त्या रविवारवरही टपलेले सगळे आपले, गणगोताचे कार्यक्रम. श्वासाला जराही मोकळीक नसलेल्या विशाखा ताई कायम चिडचिड करंत असतात. तुम्ही गरीब आहात की श्रीमंत हा विषयच नाही. विषय हा आहे की तुम्ही दोघंही घराबाहेर आहात, नवरा-बायको म्हणा नाही तर आई-वडील म्हणा... तुम्ही कमावत आहात. काम धंदा करत आहात.परवडंत नाही तुमच्यातल्या एकाला घराची जबाबदारी घ्यायला. तुम्ही लेकरबाळं जन्माला घातली, त्यांचं संगोपण कुणी करायचं ? कसं करायचं ? तुमची लेकरं शाळा-कॉलेजात शिकंत आहेत, त्यांची बडदास्त कुणं करायची ? तुमच्या घरी वयस्कर माणसं आहेत, त्यांचा औषधेपचार असतो. वयोमानामुसार त्यांच्या गरजा, अडीअडचनी असतात, गरजा असतात, त्यांचं कसं करायचं ? दारावर कुणी आलं गेलं तर घर, घर रहातं. तुमच्या घराला कायमंच कुलूप पाहून कोण येईल तुमच्या दारी ? सुखं चार दिवस वाट बघतील आणि आपली वाट धरतील. पुर्वी आणि आजही गरीबी आहेच आणि तिव्र स्वरुपाच्या गरीबीलात तर भाकर ही प्राथमीक गरज होवून बसते. पोटाची टिचभर खळगी भरण्यासाठी वनवन फिरणा-या माय-बापांच्या घरावर तर हराळी उगवल्यासारखी विदारक परिस्थिती आहे. गावोगावी डोळ्यात प्राण आनून लेक-सून सुखरूप परत यावीत ही प्रार्थणा घेऊन बसलेलं म्हातारपण आणि चिमुरडं बालपण जीवाची चाळंण करतं. परवा आमचा बब्रुवान हाके या बी ए प्रथम वर्षाच्या लेकराचा फोन आला. म्हणाला, "सर ! माझी फिस भरा नं तेवढी. परवा पटा पडणारंय. आम्ही फडात हाऊत. पैसेबी पाटविता येत नाहीत मला ऑनलाईल." मी म्हणालो, "बाळ ! जवळ असलेला नेट कॅफे गाठ. तिथून भर.पावती पाठव मला, मी बघतो पुढचं." मागेही एक दोनदा याच लेकराची फिस भरली होती मी आणि त्याने आवर्जून भेटून पैसे परती केले होते मला.भलतं चुनचुनीत लेकरु आहे. गरीब आहे प्रचंडच परंतू विनयशीलता टोकाची आहे त्याच्या अंगी. चिचखंडीचाय. गावी असला म्हणजे येता जाता कधी पळसाची फुलं घेऊन येणार, आंब्याच्या कै-याच्या दिवसात नेमका उसाच्या फडात असतो. ढगं दाटून आले की काळ्या-पांढ-या ढगांचा फोटो टाकणार.तानी गाय होती त्याच्याकडं. गाय व्याली आणि पट्ट्यानं तिचं बाशसेदार वासरु टाकलं वॉट्सअपवर.गोरं दिलंय म्हणून सांगीतलं व्हंडीनं. कधी साळुंकीचा तर कधी फेंट हिरव्या पोपटी नवतीचा लुसलुशीत फोटो टाकणार.कॉलेज बुडायलंय आपलं ही अगतीकता त्याला बारीक तोंड करायला भाग पाडते आणि दुसरा कांही पर्यायही नसतो त्याच्याकडं. या पोराला काम केल्या शिवाय परवडंतच नाही जगायला. मी शेख अलीला, आमच्या संवेदनशील कार्यालयीन कर्मचारी बांधवाला सांगून आणि आमच्या चि. आकाशच्या मोबाईलवरुन त्याची फिस भरली.हाके पैसेही देईल मला आल्यावर वापस, तो भाग फार महत्वाचा नाहीच मला. प्रश्न हा आहे की असे किती लोक आहेत, ज्यांची ही आवस्था आहे स्वातंत्र्याच्या पंचाहत्तरी नंतरही ? घरात भाकर नाही म्हणून कामासाठी वनवन फिरंत रहाणं वेगळं आणि हौस मौज म्हणून कामाला विरंगुळा समजणं वेगळं.परवा जागतीक महिला दिन साजरा झाला, सा-या जगानं साजरा केला, तसा आपणही. डोळ्या समोर कांही दृष्ये तरळून गेली आणि मोठं अवघडून गेलं मन.

१. पुरणपोळीच्या वासानं आपलं लेकरु कासावीस होईल, त्यावर मुटक्याचा पर्याय काढणारी माय, मला वंदनीय वाटते.

२. आपलं गाव, घर, गणगोत, माय-बाप, सासू-सासरे लेकरांचं शिक्षण टांगणीला टाकून पाचटी साळणा-या माय-माऊल्यांच्या गरीबीनं मांडलेली अगतीकता जिवाला करतडंत रहाते.

३. सांपत्तीक समृद्धी असलेली घरं पैशाच्या मागं धावताना आणि लेकराबाळांचं बालपण, पाहुण्यांसाठी, गणगोतांसाठी अलिखीत नो एन्ट्रीचा बोर्ड, महिला वर्गांची होत असलेली तारांबळ, त्यांच्या मनाची होत असलेली प्रचंड हेळसांड सगळंच सहनशीलतेच्या पलिकडलं आहे.

४. गरीबीनं गहन प्रश्न उभे केलेले लोक आणि विषेशतः त्यांच्या घरच्या बायकांचं जगणं तर मोलमजुरीच्या खुंट्याला बांधलेलं आहेच.तुम्ही मजूर आहात की मालक, तुम्ही माणुस म्हणून घरादाराला कसं घेता, जबाबदा-यांना कसं घेता हे अधीक महत्वाचं !

५. नौकरी असली म्हणजे भाकरीची सोय होते हे अगदीच रास्त.परंतू समाजात पत,प्रतिष्ठा मिळते म्हणून आपल्या कौटुंबीक जबाबदा-या सोडून नौक-यांचा नाद परवडणारी गोष्ट आहे का कुटुंबासाठी ? लेकराबाळांसाठी ? यावरही विचार व्हायला हवा. महिला आपली आजी, आई, मावशी, सासू, सूण, ननंद, भावजई, आत्या, बायको, मेहुणी, मुलगी, मैत्रीण आहे. आदरार्थी आहे. ती करत असलेली कुठलीच कामं हीन नाहीत.गरीबीच्या संसाराला ती हातभार लावते, हा आनंद अवर्णणीय आहे. ती जबाबदापणे आपली जाबदारी पार पाडते, हे छानंच आहे.तिच्यामुळं घर नावाची वास्तू धन्य व्हावी एवढीच अपेक्षा.तिच्या दारी आल्या गेल्या पाहुण्या-राळ्यांचा मान सन्माण राहो, एवढीच इच्छा.तिने आपल्या इच्छा दडपून जगावं हे कदापी नाही.ती कमावती असेल तर सहचराने तिच्या जबाहदा-यात हातभार लावावा. लेकरांना माय मोठी प्रिय असते.म्हाता-या माणसांना लेकीसारखी काळजीवाहू सून हवी असते.

माय-माऊल्यांनो ! तुम्ही घराच्या मुलभूत गरजांना बगल देवून नौक-या करणं खरंच गरजेचं आहे ? तुम्ही करता ती कामं नौकरीहून कमी महत्वाची आहेत का ? बालसंगोपणासाठी पाळणाघरं उघडावी लागताहेत. बुजुर्गांसाठी आश्रमं काढाली लागताहेत. घरं आणि घराच्या जबाबदाया वा-यावर सोडून तुम्ही कशी सुखी ठेवणार आहात घरं हा कळीचा प्रश्न आहे ! आमचाच काय कुणाचाही विरोधंच आहे तुमच्या शोषणाला. आम्हीच काय कुणीही तुमचा स्वाभिमान दुखावणारी माणसं दंडनीय दंडास पात्र समजावेत. तुमचा माणुस म्हणून सन्मान होणं कधीहा आणि केंव्हाही गरजेचीच गोष्ट आहे. माय माऊल्यांनो ! तुमच्या कर्तुत्वापुढं आभाळ ठेंगणं व्हावं ! **(लेखक मराठी भाषेचे साहित्यिक आणि इंग्रजी भाषा आणि साहित्याचे संशोधन मार्गदर्शक आहेत.)**

## मानसिकता

आधुनिक केसरी



मच्छिंद्र ऐनापुरे
जत, जि. सांगली

माझ्या एका मित्राच्या घरी गेलो होतो. आम्ही पोर्चमध्ये बसून गप्पा मारत होतो. बाजूलाच असलेल्या नळातून पाणी वाहत होतं. जवळ बसलेल्या माझ्या मित्राला मी म्हणालो, दोस्ता, पाणी बघ किती वाया चाललंय. तो बेफिकिरीने म्हणाला, अरे, त्याचं थोडंच बील येणार आहे? मी शांतपणे म्हणालो, तू इतकी मोठी चूक का करतो आहेस? तो चपापला. म्हणाला, कसली चूक? मी सांगायला सुरुवात केली. "तुला तर माहितच आहे, तहानलेल्या पाणी पाजणं किती पुण्याचं काम आहे. अगदी शत्रूनेदेखील पाणी मागितलं तरी त्याला दिलं जातं.

मित्र ते स्वीकारत म्हणाला, "हो,ती तर आपली परंपराच आहे. उन्हाळ्यात लोकं वर्गणी काढून पाणपोया उभ्या करतात. कारण वाटेने चाललेल्या लोकांची तहान भागवून पुण्य मिळावं. त्याने होकारार्थी मान हलवली,पण पुढे विचारलं, पण यात माझी काय चूक आहे? मी म्हणालो, माणसे पाणी पाजून पुण्य कमवतात,परंतु तू पाणी असेच व्यर्थ वाया घालवून पापाचा वाटेकरी बनत आहेस. त्याने उत्सुकतेने मला विचारले, "ते कसे काय? मी म्हणालो, जे पाणी तू इथे व्यर्थ वाया घालवत आहेस, त्यामुळे ते पाणी ज्या लोकांना हवं आहे, त्यांच्यापर्यंत पोहचत नाही. ते या पाण्यापासून वंचित राहत आहेत. आणि त्यामुळे त्यांना पाणी लांबून आणावे लागत आहे. साहजिकच त्यांना त्रास होणार. ते संताप करणार. शाप देणार. ज्यांच्यामुळे त्यांच्यापर्यंत पाणी पोहचत नाही, त्यांच्याविषयी ते थोडेच गोड बोलणार?

तो पटकन उठला आणि नळ बंद करायला गेला. वर म्हणाला, सॉरी बरं का मित्रा, इथून पुढे असे होणार नाही.पाणी व्यर्थ घालवणार नाही आणि मी दुसर्‍यांनाही समजावून सांगेन. त्याला आपण पाप करण्यापासून बचावलो, ही गोष्ट चांगलीच लक्षात आली. मी त्याला सरळ सरळ सांगितले असते, तर त्याने माझे ऐकले नसते.त्याला पाणी वाहू दिल्याने किती लोक पाण्यापासून वंचित राहिले असते, हे कळले नसते.


**-मच्छिंद्र ऐनापुरे, जत जि. सांगली**



# प्रकाशभाऊ पोहरे : रस्त्यावर उतरणारा संपादक

आधुनिक केसरी

**पढने लिखने का अपना अलग ही मजा है,जॉब ढुंढते ढुंढते जिंदगी निकल जाये वह सजा है... माझं महाविद्यालयीन शिक्षण संपलं,एका नातेवाईकाच्या शिक्षण संस्थेत क्रीडा शिक्षकाची जागा असल्याने तिथे आपले बस्तान बसेल म्हणून मोठ्या अपेक्षेने बीपीएड केले अन डोनेशन द्यायची ऐपत नसल्याने मिळालेला नकार आणि आता आपलं कसं होईल..? अस वाटत असतांनाच आवड म्हणून देशोन्नती वर्तमानपत्राचा प्रतिनिधी झालो आणि माझ्या आयुष्याचा महत्वाचा-उदरनिर्वाहाचे साधन बनत असतांना माझ्या सारख्या कोऱ्या चेहऱ्याला देशोन्नती ने समाजात प्रतिष्ठा मिळवून दिली आणि सिद्धेश्वर पवार या नावाला ठाशीव ओळख दिली ती देशोन्नती च्या माध्यमातून प्रकाशभाऊ पोहरे यांनी. मला प्रकाशभाऊंबद्दल कमालीचे आकर्षण आणि आदर.**




कुठल्याही वर्तमानपत्राचा संपादक म्हटले की वातानुकूलित खोलीत बसणारा, असे चित्र असतांना देखील रस्त्यावर उतरणारा आणि चळवळीत स्वतःचे आयुष्य झोकुन देत सर्वसामान्यांसह शेतकऱ्यांसाठी लढा उभा करणारा संपादक म्हणून प्रकाशभाऊ पोहरे यांची ख्याती आहे. शेती हा आतबट्ट्याचा व्यवसाय, शेतकऱ्यांचा कुणी वाली नाही. केवळ आणि केवळ शेतकऱ्यांची चिंता असते ती विरोधी पक्षालाच. आजचा विरोधी पक्ष उद्या सत्तेत आला की पुन्हा शेतकऱ्यांची चिंता वाटते ती काल सत्तेत असणाऱ्या आणि आज विरोधी बाकावर गेलेल्या विरोधी पक्षालाच ! व प्रसिद्धी माध्यमदेखील सत्ताधाऱ्यांची बाजू उचलून धरत असतात. कर्मचाऱ्यांमध्ये एकजूट असल्याने त्यांच्या प्रश्नांना गांभीर्याने घेतल्या जाते,परंतु शेती आणि शेतकऱ्यांच्या प्रश्नाला बगलच दिल्या जाते. मोठ्या राजकारणी माणसांचा कुत्रा हरवला किंवा मेला तर ती बातमी बनते मात्र शेतकऱ्यांच्या मृत्यूला वर्तमानपत्रात स्थान नसते, अशी परिस्थिती असतांना शेतकऱ्यांच्या प्रश्नाला आणि शेतकरी आत्महत्याची नोंद घ्यायला लावत शेतकऱ्यांना मदत मिळावी यासाठी सरकारला देखील बाध्य करण्याचे काम प्रकाशभाऊ पोहरे यांच्या मधील लढवय्या नेत्याने केले आहे. नफ्या तोट्याचा विचार न करता आपल्या वर्तमानपत्रात शेतकऱ्यांसाठी जागा देणे, शेतकऱ्यांच्या पाठीशी भक्कमपणे उभे राहण्याचे व्रत प्रकाशभाऊ पोहरे यांनी स्वीकारले आणि देशोन्नतीची मोठी ताकद शेतकऱ्यांच्या पाठीशी उभी केल्यामुळेच देशोन्नती हे वर्तमानपत्र म्हणजे शेतकऱ्यांचे 'मुखपत्रच' अशी स्वतंत्र ओळख देशोन्नती ने निर्माण केली आहे,आणि त्याच्या पाठिशी प्रकाशभाऊ पोहरे यांचं चळवळी व्यक्तिमत्त्व आहे,हे मान्यच करावे लागेल. प्रकाशभाऊ पोहरे यांचा १७ मार्च हा वाढदिवस.

१७ मार्च रोजी ते वयाची ६९ वर्ष पूर्ण करत ७० व्या वर्षात पदार्पण करत आहेत. वाणिज्य पदवीधर असलेले भाऊ व्यवसायात स्थिरस्थावर झालेले असतांना स्व मधुसूदन वैराळे यांनी १९८६ साली स्थापन केलेल्या देशोन्नती या दैनिकाचा संपादकपदाचा १९९० मध्ये पदभार स्वीकारला आणि अशा पद्धतीने पूर्वी काहीही संबंध नसतांना पत्रकारितेच्या क्षेत्रात अचानक प्रवेश झाला. खरं म्हणजे त्यावेळी देशोन्नती चा खप हा केवळ ४ हजार प्रतींचा आणि ४ पानांचे हे वर्तमानपत्र कृष्णधवल. आज या वर्तमानपत्रांच्या तब्बल २२ आवृत्या आहेत आणि १८ पानांचे हे वृत्तपत्र रंगीत छपाई सह २२ आवृत्यामध्ये प्रकाशित होत आहे.

"मुफ्त की कोई चीज बाजार में नहीं मिलती,
किसान के मरने की सुर्खिंया अखबार में नही मिलती"

अशीच परिस्थिती सगळीकडे असतांना दुसरीकडे मात्र हा संपादक स्वतः रस्त्यावर उतरून शेतकऱ्यांना न्याय मिळवून देतो.कागदाचे भाव गगनाला भिडलेले असतांना लाखो रुपयांची जागा शेतकऱ्यांच्या प्रश्नासाठी,कृषी क्षेत्रातील आधुनिक तंत्रज्ञान शेतकऱ्यांना अवगत व्हावे म्हणून कृषकोन्नती हे सेंद्रिय शेतीला समर्पित केलेले साप्ताहिक काढतो. शेतकऱ्यांचा कापूस सीमापार गेला पाहिजे,त्याच्या खिशात अधिकचा पैसा आला पाहिजे म्हणून कापूस सीमापार आंदोलन करणारे,दारूचे ठेके बंद करण्यासाठी रस्त्यावर उतरणारे,कोरोना च्या काळात हे सारे काही थोतांड आहे असे म्हणून कोरोना हे फार्मा कंपनीचे मायाजाल आहे आणि या कंपन्यांची दलाली करण्याचे काम सरकार करत असल्याचा रोखठोक सवाल उपस्थित करणारा हा संपादक आहे. एव्हड्यावरच न थांबता आत्महत्या केलेल्या शेतकरी कुटुंबाला भरपाई मिळण्यासाठी मुंबई उच्च न्यायालयात त्यांनी दाखल केलेल्या जनहित याचिकेमुळे आत्महत्याग्रस्त शेतकरी




सिद्धेश्वर राना पवार
संपर्क क्र. : 9422880080

कुटुंबाला एक लाख रुपये अनुदान देण्याचे उच्च न्यायालयाने आदेश दिलेत. तर अवैध सावकारांना संरक्षण देण्याच्या विरोधात सर्वोच्च न्यायालयात याचिका,परिणामी तत्कालीन मुख्यमंत्री स्व विलासराव देशमुख यांना १० लाखाचा दंड ठोठावण्यात आला होता.प्रकाशभाऊ पोहरे हे शेती प्रश्नाचे अभ्यासक आणि जाण असणारे नेते आहेत. शेतकरी आत्महत्या थांबविण्यासाठी सेंद्रिय शेती मिशनची त्यांनी स्थापना केली. आणि ४०० गावांमध्ये शेतकऱ्यांचे ४००गट स्थापन केले व त्यांच्या ४० शेतकरी उत्पादक कंपन्या आणि त्या कंपन्यांचा एक महासंघ स्थापन केला.शेतकऱ्यांच्या प्रश्नांची त्यांना जाण असल्याने,तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी डॉ पंजाबराव देशमुख जैविक शेती मिशन समितीच्या अध्यक्षपदी निवड केली. विदर्भातील अकोला,बुलडाणा, अमरावती, यवतमाळ, वाशीम,आणि वर्धा ह्या ६ जिल्ह्यात सर्वाधिक शेतकरी आत्महत्या झालेल्या आहेत.या जिल्ह्यातील शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी सरकारने दिलेल्या आश्वानानुसार तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी फेब्रुवारी २०१८ मध्ये १०० कोटी रुपये निधीची घोषणा करून ४ वर्षाच्या कालावधी साठी मिशन जाहीर केले होते. आझाद हिंद सेनेच्या वतीने मराठा सेवा संघाचे संस्थापक अध्यक्ष पुरुषोत्तम खेडेकर साहेब यांच्या हस्ते प्रकाशभाऊंना 'लोकनायक' ही उपाधी बहाल करण्यात आली. लोकांसाठी झगडणारा,त्यांना न्याय मिळवून देत त्यांच्या आयुष्यात 'गोडवा'निर्माण करणारा आणि शेतकऱ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी त्यांच्या पाठीशी नव्हे तर एक पाऊल पुढे टाकणाऱ्या या लोकनायकाने २००१ ते २००८ या काळात विदर्भातील शेतकरी आत्महत्या बाबत दैनिक देशोन्नती ची मोहीम तत्कालीन पंतप्रधान मनमोहन सिंग, पी.चिदंबरम ,तत्कालीन कृषी मंत्री शरदचंद्र पवार यांच्यासमोर २००८ मध्ये मोहनजी धारिया यांच्यासोबत २ तास ४० मिनिटांचे सादरीकरण केले आणि परिणामी ७२०००कोटी रुपयांची कर्जमाफी आणि २००८ च्या हंगामात हमी भावात ४० ते ७० टक्के वाढ झाली.

अवैध सावकाराविरोधात त्यांनी दीर्घकालीन संघर्ष केला.त्या अनेक सभांचे सूत्रसंचालन करण्याचे आणि भाऊंसोबत विविध ठिकाणी जाण्याचे भाग्य मला लाभले हे माझं भाग्य. भाऊंच्या ह्या दीर्घकालीन संघर्षामुळेच सावकारी विरोधी कायदा बनवण्यात भाऊंचा सहभाग ऐतिहासिक आहे. विशेष म्हणजे अवैध सावकारांना संरक्षण देण्याच्या विरोधात सर्वोच न्यायालयात याचिका दाखल करत तत्कालीन मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांना न्यायालयाने १० लाखाचा दंड ठोठावला होता.किसान ब्रिग्रेड चे राष्ट्रीय अध्यक्ष असलेल्या भाऊंनी वेगळे विदर्भ राज्य झालेच पाहिजे यासाठी आता आंदोलनात उडी मारली आहे.त्यासाठी सायकल यात्रा,विविध पद्धतीने त्यांनी आंदोलन आखले असून विदर्भ राज्याचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आणण्यात त्यांना चांगलेच यश आले असून या चळवळी ला नवसंजीवनी प्राप्त झाली आहे. कित्येक विदेश दौरे केलेल्या, कृषी, सामाजिक, शैक्षणिक विषयांवर १४०० हुनही अधिक लेख लिहलेल्या भाऊंची अनेक पुस्तके प्रकाशित झालेली आहेत.तर सामाजिक व शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नांसाठी आंदोलन केलेल्या भाऊंना ३०-४० वेळा अटक झालेली आहे.२०० पेक्षा जास्त दिवस तुरुंगवास किंवा पोलीस कोठडी झालेली आहे. ४० हुंन अधिक खटल्यांमध्ये १५-२० वर्षाच्या न्यायालयीन संघर्षानंतर अखेर सर्व खटल्यांमधून त्यांची निर्दोष मुक्तता झालेली आहे.

ज्यापद्धतीने राजकारणात आणि समाजकारणात सर्व प्रश्नांची जाण असणारे शरद पवार आहेत अगदी त्याच पद्धतीने प्रकाशभाऊ पोहरे हे त्या अर्थाने विदर्भातील शरद पवार आहेत असे जर म्हटले तर चुकीचे होणार नाही. पण त्याचं दुर्दैव की ते विदर्भात जन्माला आले,ते पश्चिम महाराष्ट्रात जन्माला आले असते तर त्यांच्या ह्या संघर्षाची- आंदोलनाची लोकांनी दखल घेतली असती व त्यांना तेथील जनता डोक्यावर घेऊन नाचली असती.

***यूं ही नही बनता कभी कोई मसीहा***
***खुद के तकलिफों की तिलांजली देकर गैरो की***
***अपनानी पडती है***

# विद्यार्थी आंदोलनाची दखल घेणार का ?



विनोद सदावर्ते
संपर्क क्र. 9130979300

आधुनिक केसरी

**महाराष्ट्रामध्ये सध्या एक विद्यार्थांचे आंदोलन सुरू आहे. या आंदोलनाचा दखल कोणीच घेताना दिसत नाही आहे. सरकारच्या अनेक शैक्षणिक धोरणामुळे शेतकरी, शेतमजूर मुलांच्या शिक्षणाचा प्रश्न ऐरणीवर आलेला आहे. अनेक समस्या निर्माण झालेल्या आहेत. शैक्षणिक समस्या निर्माण करून शिक्षण बंद करण्याचे षडयंत्र सरकार करत आहे हि बाब आता उघड झाली आहे. प्राथमिक शिक्षणापासून तर उच्च व संशोधना पर्यंत अनेक जाचक अटी व शिक्षणावर न होणारा खर्च बघता सर्वसामान्य कुटुंबातील विद्यार्थांनी शिक्षण घ्यावे की हा प्रश्न उपस्थित झाला आहे.**

मुंबई येथील आझाद मैदानावर गेल्या २१-२२ दिवसापांसुन महाराष्ट्रातील संशोधक विद्यार्थी संशोधक विद्यार्थी कृती समीती च्या नावाखाली एकत्र येऊन आपल्या न्यायासाठी संविधानीक आंदोलन करत आहेत. एवढे दिवस होऊनही अजुनही सरकार कडून योग्य ती दखल घेण्यात आली नाही. या विद्यार्थांची मागणी विषेश अशी काहीच नाही. संशोधन करण्यासाठी बार्टी कडून अनुसुचित जातीच्या प्रवर्गातील विद्यार्थी जी फेलोशिप मिळायला पाहिजे ती मिळाली नाही. सदर फेलोशिप ही २०२१ ची प्रलंबित आहे. आणि अजूनही त्यावर तोडगा सरकार काढण्यास दिरंगाई करत आहे. मुख्य विषय असा आहे की २०२१ साली बार्टी कडून फेलोशिप साठी पात्र उमेदवारांची निवड करण्यात आली. निवड करण्याचे पुर्ण अधिकार बार्टीलाच आहेत. आणि २०२१ साली एकुण ८६१ विद्यार्थी फेलोशिप साठी निवडले गेले. ८६१ विद्यार्थी निवडले गेले असताना अजूनही विद्यार्थ्यांना फेलोशिप मिळाली नाही. विद्यार्थांनी फेलोशिप ची विचारणा केल्या नंतर त्यांना सांगण्यात आले फक्त २०० विद्यार्थ्यांना फेलोशिप देण्यात येणार आहे. निवड झालेले ८६१ विद्यार्थी असताना फक्त २०० विद्यार्थांनाच फेलोशिप का ? २०० विद्यार्थ्यांना कोणत्या आधारावर फेलोशिप देणार ? २०० विद्यार्थ्यांना फेलोशिप द्यायची तर ८६१ विद्यार्थी कसे पात्र असे अनेक प्रश्न उपस्थित होतात. आणि सर्व विद्यार्थ्यांना म्हणजे ८६१ विद्यार्थ्यांना सरसकट फेलोशिप मिळावी म्हणून संशोधक विद्यार्थी कृती समीतीच्या नावाखाली सर्व संशोधक विद्यार्थी एकत्र येऊन मुंबई च्या आझाद मैदानावर आंदोलन करत आहेत. गेल्या २१-२२ दिवसापासून विद्यार्थी आंदोलन करत असताना मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांनी त्यांकडे धावती भेटही न देणे म्हणजे अनुसूचित जातीतील विद्यार्थांना जाणीव पुर्वक फेलोशिप देण्यास दिरंगाई व अडचणी वाढविल्यासारखे आहे. सरकारच जर सामाजिक अन्याय करत असेल तर न्याय मागायाचा कुणाकडे ? सरकार विद्यार्थांप्रती एवढे असंवेदनशील कसे असु शकते ? आणि २०२१ ची फेलोशिप आज पर्यंत न देणे म्हणजे जाणिव पुर्वक विद्यार्थांना फेलोशिप द्यायची नाही ह कुटील डाव आहे. २१-२२ दिवस घरापासून दुर राहणे काय असते याची जाणीव सरकारला नाही. अनेक विद्यार्थ्यांची आर्थिक परिस्थिती बरोबर नसताना मुबंई सारख्या ठिकाणी जाणे येणे तेथे त्यांचे जेवन पिण्याचे पाणी, स्वच्छतागृह, स्नानगृह अशा अनेक समस्यांना सामोरे जाणे खूप चिंताजनक आहे. आंदोलनात सहभागी विद्यार्थी हे बहुतांश ग्रामीण भागातील आहेत मुंबई चे वातावरण हे ग्रामीण वातावरणापेक्षा वेगळे आहे. जर वातावरणात बदल झाला, खाण्यापिण्यात काही बदल झाला आणि विद्यार्थांचे आरोग्य जर बिघडले तर याला जबाबदार कोण ? सरकारला विद्यार्थांची एवढीही काळजी नसावी ? सरकारचे वर्तन बघता सरकार जातीवाद करुन अनुसूचित जाती प्रवर्गावर अन्याय च करत आहे. कारण बार्टी च्या धरतीवर सारथी आणि महाजोती या सुद्धां संस्था आहेत. सारथी आणि महाजोती संस्थेतील विद्यार्थ्यांना फेलोशिप मिळते तेथे कोणत्याही प्रकारची अडचण येत नाही परंतु बार्टीच्याच विद्यार्थ्यांना फेलोशिप दिली जात नाही तर हा शासकीय जातीवादच मानावा लागेल.सरकारने शिक्षण, आरोग्य, रोजगार या बाबींवर काम करणे हे सरकारचे प्राथमिक काम आहे. सरकार प्राथमिक कामावरच दूर्लक्ष करत असेल तर हा अनुसूचित जातीतील समुदायावर अन्याय आहे. हजारो वर्षांपासून शिक्षणापासून दूर ठेवले होते आज संधी मिळाली तर शासकीय पातळीवरुनच जर शिक्षणावर दुर्लक्ष केले जात असेल तर शिक्षणाची गुणवत्ता व योग शिक्षण व शिक्षणाकडे बघण्याचा दृष्टिकोन नक्कीच बदलु शकतो आणि पुन्हा शिक्षणापासून विद्यार्थी दुरावू शकतात. महाराष्ट्र हा फुले शाहु आंबेडकरांचा महाराष्ट्र आहे. या महाराष्ट्राला ऐतिहासिक, सांस्कृतिक, सामाजिक व शैक्षणिक वारसा आहे. कोणत्याही व्यक्तीला शिक्षणापासून दुर राहता येणार नाही, प्रत्येकाने शिकायला पाहिजे म्हणून स्वतः च्या पदरचा पैसा मोडून लोकांना शिक्षीत करण्याचे काम महात्मा जोतिबा फुले यांनी सुरू केले. समाजातील लोकांचा रोष पत्कारला परंतु शिकवण्याचे काम सोडले नाही असे ते जोतीराव फुले. शिष्यवृत्ती देण्याचे कोणतेही बंधन नसताना केवळ पैसे नाही म्हणून शिक्षण थांबवने हे योग्य नाही असा विचार करून डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची स्वतः भेट घेऊन स्वतः च्या राज तिजोरीतून शिष्यवृत्ती देऊन शिक्षणाला पाठबळ देणारे शाहू महाराज, आणि भविष्यात कोणाताही विद्यार्थी फक्त पैशामुळे शिक्षणापासून दूर राहणार नाही म्हणून विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदतीची तरतूद संविधानात करून विद्यार्थ्यांना शिक्षण क्षेत्रात भरारी घेण्यासाठी प्रेरणा व संविधानीक संरक्षण देणारे डॉ बाबासाहेब आंबेडकर. या महापुरुषांनी शिक्षणाला अति महत्व देऊन शिक्षणाच्या सोई स्वतः च्या खर्चातून करून दिल्या. परंतु याच महापुरुषांच्या राज्यात विद्यार्थ्यांना विद्यार्थांच्या हक्काचे, गोरगरीब लोकांनी दिलेल्या करातील लोकांचेच पैसे सरकार विद्यार्थ्यांना देत नसेल तर ही जातीय व भेदभावाची माणसिकता आहे. २१-२२ दिवसापांसुन विद्यार्थी आझाद मैदानावर आहेत. संविधानीक पद्धतीने आपले आंदोलन चालवत असताना सरकारने त्यांना भेटून त्यांच्या समस्या जाणून घेऊन तोडगा काढण्यासाठी अर्धा एक तासही वेळ देऊ नये म्हणजे खुप चिंताजनक आहे. २१-२२ दिवस आंदोलनाची दखल जर सरकार घेत नसेल तर याचा अर्थ हे सरकार गोरगरीब लोकांचे नाही. कोणत्याही देशाची गुणवत्ता ही त्या देशातील शिक्षणावर व संशोधनावर अवलंबून असते आणि येथे जर शिक्षणावरच योग्य खर्च होत नसेल तर शैक्षणिक पातळी कशी उंचाणार हा गहन प्रश्न आहे. एकीकडे सरकारकडे विद्यार्थ्यांना द्यायला पैसे नाहीत दुसरी कडे अदाणीला लाखो करोडो रुपये द्यायचे आणि अदाणी डूबला, तोट्यात गेला तरीही म्हणायचे याचा परिणाम अर्थव्यवस्थेवर होत नाही. अदाणीला दिलेल्या पैशाचा परिणाम जर देशातील अर्थव्यवस्थेवर होत नाही तर त्याला दिलेला पैसा नेमका आहे कुठला ? अदाणी डूबल्यावर महागाई कशी वाढली ? विद्यार्थ्यांना पैसे नाहीत म्हणून फेलोशिप दिली जात नाही की पैसे आहेत परंतु मुद्दामहून दिली जात नाही ? लाखो करोडो रुपये डूबल्यावर ही वरुन हजारो करोड पुन्हा अदाणीला दिले जातात परंतू विद्यार्थ्यांना फेलोशिप देण्यासाठी सरकारकडे पैसा नसतो. जन प्रतीनिधी जनतेच्या समस्या सोडविण्यासाठी असतात. पदवीधरांचे वेगळे प्रतिनिधी असतात जर पदवीधरांना संशोधनासाठी फेलोशिप मिळत नसेल तर राज्यातील पदवीधर आमदार नेमके करतात तरी काय ? पदवीधर आमदारांना पदवीधरांच्या समस्या सोडून इतर वेगळे कोणते काम असतात ? राज्यात पदवीधरांच्या कोणत्या समस्या आहेत हेच जर पदवीधर आमदारांना माहिती नसेल तर पदवीधर आमदार नेमकं करतात तरी काय ? असे या संदर्भात अनेक प्रश्न उपस्थित होऊन सरकारचा नाकर्तेपणा समोर येतोय. परंतु मुळ मुद्दा हा आहे सरकारचा नाकर्तेपणा विद्यार्थी किंवा कोणत्याही व्यक्तीला जर जाणीव पुर्वक त्रास देऊन अडचण निर्माण करत असेल तर हे सरकार जनतेचे सर्वसामान्य लोकांचे आहे असे कसे म्हणावे ? सरकारच्या चुकिच्या धोरणामुळे, जातीय द्वेषामुळे विद्यार्थांचे नुकसान होऊन संशोधन कार्यावर दुर्लक्ष होत आहे. तरीही मोठ्या सकारात्मक दृष्टीने संशोधक विद्यार्थी न्याय मिळण्याच्या उद्देशाने आझाद मैदानावर अविरतपणे आंदोलन करत आहेत. आता प्रश्न हा आहे सरकार याची दखल घेणार तरी कधी आणि विद्यार्थ्यांना न्याय मिळणार तरी कधी ? सर्वसामान्य लोकांनी एक गोष्ट लक्षात घ्यावी की सदर त्रास हा फक्त अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांना आहे. यांच्या कामी एकही राजकीय नेता येत नाही. म्हणून समाजाने व सुशिक्षित लोकांनी राजकीय पक्ष संघटना सोडून सामाजिक न्यायासाठी एकत्र येऊन सामाजिक आवाज मजबूत करणे आवश्यक आहे. म्हणून राजकीय गटतट स्वार्थी राजकारण, समाजकारणाच्या नावाखाली दुकानदारी चालविणारे अनेक आहेत परंतु विद्यार्थांची मागणी लाऊन धरणारे कोणीही समोर येत नाही ही शोकांतिका नाकारता येत नाही. शेवटी परिस्थिती कशीही असली तरी प्रश्न हाच उरतो संशोधक विद्यार्थ्यांची दखल सरकार घेणार का ? न्याय देणार का ?



श्री संतश्रेष्ठ तुकामाई संस्थान येहेळेगाव यांचा आज फाल्गुन कृ. रंगपंचमी रोजी जन्मोत्सव रेणुकामाता मंदिर सिडको एन-९ व रेणुकामाता मंदिर श्रेयनगर येथे उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी संतश्रेष्ठ तुकामाईचे पारायण 250 बंधू-भागिनींनी केले. तसेच तुकामाई जन्मोत्सव पाळणा व सर्वांनी एकमेकांना रंग लावून साजरा केला. यावेळी अनिल मुळे, महेश कुलकर्णी, सुरेश जोशी, संतोष देशपांडे, तांदुळजे, स्वप्निल जोशी, सतिश देशपांडे, केदार चौंढीकर, माधव घोडे, सुहास ठोसर, संतोष कुलकर्णी, राम नाईक, अनिल जोशी, सुहास पुर्णपात्रे, रोहिणी जोशी, सीमा पुर्णपात्रे, वैशाली दुधेकर, सुरेखा देशपांडे, भाग्यश्री किंबहुने, शैला मानूरकर यांनी परिश्रम घेतले.

# दूषित पाणीपुरवठ्यामुळे बाळापुरकरांचे आरोग्य धोक्यात

## मनपा प्रशासनाविरोधात नागरिकांचा रोष

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** महापालिका हद्दवाढ असलेल्या बाळापुर



गावातील सुभाष नगर भागात पाणी पुरवठा करणाऱ्या पाईप लाईन मध्ये लिकेज निर्माण झाल्याने नागरिकांना दुषित व जंतूयुक्त पाणीपुरवठा केला जात आहे. नळाच्या तोट्यांमध्ये जंतू आढळून आले असल्याने या दूषित पाणी पुरवठ्यामुळे नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण झाला आहे. तर स्थानिक नागरिकांनी मनपा प्रशासनावर रोष व्यक्त केला आहे. उघडया गटारी आणि त्यातून जाणाऱ्या फुटलेल्या जलवाहिन्यांमुळे बाळापुर सुभाष नगर भागात सांडपाणीमिश्रित दूषित पाण्याचा पुरवठा होत



असल्याचे समोर आले आहे. वेळोवेळी याबाबत प्रशासनाला माहिती देऊनहीं याची दखल घेतली जात नसल्याची व्यथा स्थानिक रहिवाशांनी मांडली आहे. नागरिकांच्या घरात दुर्गंधीयुक्त पाणी येत असल्याने आधीच टंचाई असलेल्या या भागातील नागरिकांत संतापाचे वातावरण आहे. या पाण्यामुळे लहान मुले, ज्येष्ठ नागरिक आणि महिलांच्या आरोग्याला धोका निर्माण झाला आहे. तरी त्वरित पाईपलाईन लिकेची दुरुस्ती करण्यात यावी, अशी ही मागणी स्थानिक रहिवाशांनी केली आहे.

# सुशोभिकरणासाठी निवेदन

आधुनिक केसरी न्यूज



**धुळे :** मोहाडी उपनगरातील दंडेवाले बाबा नगर सिटी सर्व्हे क्रमांक D61/147 परिसरात महानगरपालिकेची दोन ठिकाणी ओपण स्पेस जागा पडून आहे. त्या जागेच्या आजूबाजूला घरे आहेत. या घरांचे सांडपाणी त्या ठिकाणी जमा होते असते, यामुळे परिसरातील नागरिकांची आरोग्य बिघडत जाते, व याच ठिकाणी लाईट नसल्यामुळे लहान मोठे खड्ड्यात रात्री चालत असताना वृद्ध नागरिक पडत असतात, त्यामुळे स्ट्रीट लाईट व कंपाउंड करणे गरजेचे आहे.

ही जागा एक मारुती मंदिरासमोर, नरेंद्र पाटील यांच्या घराच्या बाजूला असलेले ओपन स्पेस तसेच नारायण बाबुराव लोहार यांच्या घराजवळ ओपन स्पेस आहे, त्या ठिकाणी मोट्या प्रमाणात कचरा टाकला जातो त्या मुळे दुर्गंधी पसरते, त्या साठी या गोष्टींना कुठेतरी आळा बसावा त्यामुळे ओपन स्पेस जागेवर सभापती ताईसाहेब यांनी आमची दखल घेऊन ओपन स्पेस जाग्यावर कंपाउंड, लहान मुलांसाठी खेळणे, स्ट्रीट लाईट करून देणे, सभापती ताईसाहेब, कंपाउंड केल्यानंतर परिसराला शोभेल असे वातावरण निर्माण होणार, बगीचा तयार झाल्यानंतर लहान मुले व जेष्ठ नागरिक यांना बसण्यासाठी जागा उपलब्ध होणार. त्यामुळे सभापती यांना निवेदन देऊन विनंती करण्यात आली आमच्या या दोघे कंपाउंडला मंजुरी देणार अशी स्थानिक नागरिकांची अपेक्षा असल्यामुळे निवेदनाद्वारे मागणी करण्यात आली.

# विविध योजना जनतेपर्यंत पोहोचवण्याची जबाबदारी बूथ प्रमुखांची : लोणीकर

आधुनिक केसरी न्यूज

**परतुर :** बूथ सशक्तिकरण अभियानाच्या माध्यमातून शक्ती केंद्रप्रमुख विस्तारक बूथ प्रमुख यांनी, समाजाच्या प्रत्येक घटकातील युवा महिला यांना भारतीय जनता पार्टीच्या प्रवास आणण्यासाठी काम करण्याचे आवाहन माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांनी केले. ते परतुर येथे आयोजित बूथ सशक्तिकरण अभियानांतर्गत घेण्यात आलेल्या प्रशिक्षण वर्गात बोलत होते. पुढे बोलताना माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर म्हणाले की भूत समितीमधील कार्यकर्त्यांना बूथ अध्यक्ष, बूथ सचिव, यांच्यासह कार्यकारिणी निवड करणे गरजेचे असून प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचा येत्या 26 मार्च रोजी होणारा मन की बात कार्यक्रम प्रत्येक बूथप्रमुखांनी करणे आवश्यक असून एप्रिल महिन्यातील शेवटच्या रविवारी म्हणजेच 30 एप्रिल रोजी होणारा 100 वां मन की बात कार्यक्रम, नाविन्यपूर्ण साजरा करण्याचे आवाहन यावेळी बोलताना त्यांनी उपस्थित बूथ पदाधिकाऱ्यांनीं दिले, पुढे बोलताना ते म्हणाले की प्रत्येकाने भूत स्तरावर व्हाट्सअप ग्रुप निर्माण करणे आवश्यक असून प्रत्येक बूथ प्रमुखाकडे सगळी समाज माध्यमे इन्स्टॉल असावी व त्या माध्यमातून मोदीजी ने केलेल्या विविध विकासाच्या योजना प्रसारित केल्या जाव्यात असेही यावेळी बोलताना त्यांनी नमूद केले. मतदार संघातील 325 बूथ मजबूत बूथ असावेत, यासाठी शक्ती केंद्रप्रमुखांनी व विस्तारकांनी प्रवासाचे नियोजन करून, त्या माध्यमातून भूत मजबूत बनवण्याची प्रक्रिया करणे गरजेचे असल्याचे यावेळी बोलताना त्यांनी नमूद केले.

# अनुवाद : नवनिर्मितीसाठी नवे दालन : डॉ. नितोंडे

आधुनिक केसरी न्यूज




**सोनपेठ :** येथील कै.रमेश वरपूडकर महाविद्यालयात दिनांक 13 मार्च रोजी परभणी येथील शिवाजी महाविद्यालयाचे प्रा.डॉ. रोहिदास नितोंडे यांचा सत्कार आणि विशेष व्याख्यान कार्यक्रमात डॉ. नितोंडे बोलत होते. नुकत्याच स्वा.रा. तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेडच्या विविध प्राधिकरणाच्या निवडणुका संपन्न झाल्या.

त्या निवडणुकीमध्ये इंग्रजी विषयाच्या अभ्यास मंडळ अध्यक्षपदी परभणी येथील इंग्रजी विभागाचे प्रा.डॉ. रोहिदास नितोंडे यांची निवड झाल्याबद्दल सोनपेठ येथील कै.रमेश वरपूडकर महाविद्यालयाच्या इंग्रजी विभागात त्यांचा सत्कार आणि "भारतीय इंग्रजी वाङ्मय आणि अनुवाद" या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी नितोंडे यांनी अनुवाद विषयावर प्रकाश टाकताना तमिळ, तेलगू, मराठी, हिंदी, गुजराती, पंजाबी, उर्दू आणि अन्य भाषेतून इंग्रजी भाषेत विपुल प्रमाणात अनुवाद झाले असून ती एक नवनिर्मिती असल्याचे सांगितले. तसेच अनुवाद क्षेत्र हे नवनिर्मितीसाठी नवे दालन असल्याचे प्रतिपादन केले. या कार्यक्रमासाठी संस्थेचे संचालक श्री रामेश्वर कदम यांची विशेष उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.डॉ.विठ्ठल जायभाये यांनी केले. कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप करतांना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.वसंत सातपुते यांनी 'विद्यार्थ्यांनी अनुवाद करायला शिकून नव्या संधी शोधण्याचे' आवाहन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.डॉ.गणेश जयतपाल यांनी तर आभार प्रा.दिलीप कोरडे यांनी मानले. या कार्यक्रमास इंग्रजी विभागातील विद्यार्थ्यांबरोबर अन्य भाषेचे विद्यार्थी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते. शेवटी राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

# संशोधक-विद्यार्थ्यांनी ई- संसाधनाकडे वळावे

## प्रा.सूर्यकांत मस्के : दयानंद वाणिज्य महाविद्यालय ग्रंथालयामध्ये एक दिवशीय कार्यशाळा

आधुनिक केसरी न्यूज

**लातूर :** ग्रंथालयामध्ये पारंपारिक वाचन साहित्याबरोबर ई संसाधने जसे की, एन लिस्ट, डेल नेट, शोधगांगा, ई पाठशाला, शोधगंगोत्री, नॅशनल डिजिटल लायब्ररी, विविध वेबसाईट याद्वारेही ई रिसोर्स मोठ्या प्रमाणात उपलब्ध आहेत. विद्यार्थी व प्राध्यापकांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन ग्रंथपाल प्रा. सूर्यकांत मस्के यांनी केले. येथील दयानंद वाणिज्य महाविद्यालय ग्रंथालय व अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने "ऑनलाइन ई संसाधनाचा शोध" या विषयावर एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजाराम पवार, सिनेट सदस्य डॉ. विष्णू पवार, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष समन्वयक डॉ.बालाजी कांबळे, ग्रंथपाल प्रा. विठ्ठल जाधव यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रा.मस्के पुढे म्हणाले, जगातील सर्व ज्ञान एका क्लिकवर उपलब्ध् असून त्याचा चांगला वापर कसा करायचा ते करणाऱ्यावर अवलंबून आहे. माहितीच्या परिस्फोटतून नेमकी माहिती शोधणे जिकरीचे झाले आहे. त्यामुळे ग्रंथपालांची भूमिका महत्त्वाची ठरत आहे. दयानंद वाणिज्य महाविद्यालयाचे ग्रंथालय समृद्ध असून येथील प्रेरक उपक्रम स्तुत्य असल्याचे त्यांनी प्रतिपादन सिनेट सदस्य व शिवाजी महाविद्यालय उदगीर चे ग्रंथपाल डॉ.विष्णू पवार यांनी यावेळी केले. अध्यक्षीय समारोपात प्राचार्य डॉ. राजाराम पवार यांनी ई जर्नल, ई बुक्स याचा जास्तीत जास्त वापर करून महाविद्यालयामध्ये दर्जेदार संशोधन व्हावे ही अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. प्रास्ताविक ग्रंथपाल प्रा.विठ्ठल जाधव यांनी केले. आभार डॉ. लक्ष्मीकांत सोनी, सूत्रसंचालन डॉ. स्वप्नाली माणिकशेट्टी पाहुण्यांचा परिचय प्रा. प्रेमसागर मुंदडा यांनी करून दिला. कार्यक्रम यशस्वीतेसाठी अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष विभागातील सर्व प्राध्यापक तसेच ग्रंथालयातील लक्ष्मीकांत वाघ व इतर कर्मचारी यांनी प्रयत्न केले. कार्यक्रमास डॉ.गणेश लहाने, डॉ.कविता बियाणी, डॉ.बाळासाहेब चव्हाण आदीसह सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.






# मोफत आरोग्य शिबिरास प्रतिसाद

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** छत्रपती शिवाजी महाराज जयंती व महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या १७ व्या वर्धापन दिनाचे औचित्य साधून महाराष्ट्र नवनिर्माण सेना कन्नड तालुक्यातर्फे मोफत आरोग्य तपासणी शिबिर उदंड प्रतिसादात यशस्वीरीत्या संपन्न झाले. यावेळी दिवसभरात एकूण ६३७ रुग्णांनी विविध प्रकारची आरोग्य तपासणी करवून घेत सहभाग नोंदवला. सदरील शिबिराचे उदघाटन मनसे संभाजीनगर जिल्हाध्यक्ष वैभव मिटकर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी जिल्हा उपाध्यक्ष डॉ.बाबासाहेब थेटे,जिल्हासचिव गौतम शिरसाठ, शहरातील पूर्व शहर उपाध्यक्ष शुभम बोराडे,माथाडी कामगार सेनेचे जिल्हाध्यक्ष प्रशांत आटोळे यांची प्रमुख उपस्थिती होती. या शिबिरास अमूल्य वेळ देणारे व मोलाचे सहकार्य केल्याबद्दल सर्व सन्माननीय डॉक्टर्स व त्यांच्या टीम चे जिल्हाध्यक्ष वैभव मिटकर व कन्नड तालुक्यातील पदाधिकाऱ्यांच्या वतीने सत्कार करून आभार व्यक्त करण्यात आले. या शिबिराचे आयोजन तालुकाध्यक्ष विकास बागुल व शहराध्यक्ष शशांक महादने यांनी केले असुन मनसैनिकांची उपस्थीती होती.

# आ. डॉ. राठोड यांनी फोडला मुक्रमाबाद सर्कलमधील विविध गावांत जलजीवन मिशनचा नारळ

आधुनिक केसरी न्यूज

**मुखेड :** मुखेड कंधार विधानसभा मतदारसंघाचे कार्यसम्राट आमदार डॉ. तुषार राठोड यांनी मुखेड तालुक्यांमध्ये विकास कामांचे मोठे जाळं निर्माण करत आहेत. आमदार तुषार राठोड यांनी मुखेड तालुक्यातील मुक्रमाबाद सर्कलमधील सावरमाळ येथे जलजिवन मशिन योजने अंतर्गत १ कोटी ६१ लक्ष तसेच सिसी रस्ता सभामंडपसाठी १५लक्ष , वंटगीर व ताडा येथे गावातील जल जीवन मिशन अंतर्गत १ कोटी २१लक्ष तसेच सिसी रस्ता सभामंडप १५ लक्ष, कोटग्याळवाडी जलजिवन मशिन योजने अंतर्गत १ कोटी ७५ लक्ष तसेच सिसी रस्ता सभामंडपसाठी १५ लक्ष, आंदेगाव येथे जलजिवन मशिन योजने अंतर्गत १ कोटी २८ लक्षसह तालुक्यातील विविध पाणीपुरवठा योजनेचे व पेवर ब्लॉक सीसी रस्ता चा भूमिपूजन मुखेड कंधार विधानसभा मतदारसंघाचे कार्यसम्राट आमदार डॉ तुषार राठोड यांच्या हस्ते पार पडले. यावेळी माजी सभापती खुशालराव पाटील उमरदरीकर, माजी सभापती लक्ष्मण पाटील खैरकेकर, भाजपा तालुका अध्यक्ष डॉक्टर वीरभद्र हिमगिरे, शेखर देशमुख,भाजपा युवा मोर्चा तालुका अध्यक्ष बालाजी पाटील सकनुरकर, संग्राम सावकार मळगे, युवा नेते धीरज पाटील गोजेगावकर, सरपंच जाधव राम, कपिल पाटील बनबरे, हेमंत खंकरे, अविनाश पाटील कोटग्याळकर, नागनाथ पारसेवार, जलालोदीन सय्यद, नागेश गोपनर, विजयकुमार स्वामी, नागनाथ बर्ले, देविदास राठोड, रमेश राठोड, वसंत राठोड, कोंडिबा गायकवाड, ग्राम सेवक शुभम भंगे, अनिल बारोळे, आंदेगाव, वंटगीर,सावरमाळ,कोटग्याळवाडी येथील ग्रामपंचायत सदस्य गावातील नागरिक मोठ्या संख्येत उपस्थित होते.



# विठ्ठल रुक्मिणी मंदिरात रंगपंचमीचा जल्लोष

आधुनिक केसरी न्यूज

**पंढरपूर :** पंढरीचा परमात्मा पांडुरंग हा साक्षात श्रीकृष्णाचा अवतार मानला जातो. त्यामुळे पंढरपूरच्या श्री विठ्ठल रखुमाई मंदिरात वसंत पंचमी ते रंगपंचमी असा एक महिना रंगपंचमीचा सण साजरा केला जातो. जगाच्या पाठीवर एक महिना रंगपंचमीचा सण साजरा करणारे श्रीक्षेत्र पंढरपूर हे एकमेव देवस्थान आहे. रंगपंचमी सणाच्या निमित्ताने देवाला दररोज पांढरा पोशाख करुन देवाच्या अंगावर केशर व गुलाब पाण्याच्या रंगाची उधळण केली जाते. सलग महिनाभर हा दिनक्रम सुरु असते. या उत्सवाची सांगता रंगपंचमीला होते. प्रतिवर्षीप्रमाणे रूढी व परंपरेनुसार मंदिरातील नित्योपचार व सण उत्सव मोठ्या उत्साहात साजरे करण्यात येतात. आज फाल्गुन कृ.५ रविवार दि.१२/०३/ २०२३ रोजी श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समितीचे वतीने रंगपंचमी निमित्त दुपारी ०३ वाजता कलगीचे वाजतगाजत मिरवणुक काढुन कलगीवाले यांचे मठामध्ये जावून पुजा करून मानकऱ्यांचा सत्कार करण्यात आला . तर डफाची मिरवणुक कलगीवाले यांच्या मठापासून काळा मारुती-चौफाळा पश्चिमन्दार रुक्मिणी उत्तरव्दार ( व्ही आय पी गेट )- संत नामदेव पायरी अशा मार्गाने आण्यात आली. त्यानंतर दुपारी ०४.३० वाजता पोषाखानंतर मा. व्यवस्थापक बालाजी पुदलवाड यांचे हस्ते श्री विठ्ठल व रूक्मिणी मातेची पाद्यपूजा करून देवाच्या अंगावर रंग उधळण्यात आला व त्यानंतर मंदिरे समितीच्या डफाची पूजा करण्यात आली. डफाची व रंगाची मिरवणुक वाजतगाजत, नवरंगाची उधळण करत तसेच बॅन्ड व हलगीच्या निनादात मोठया उत्साहात मंदिराला प्रदक्षिणा घालण्यात आली तसेच कलगीवाले डफाचे मानकरी यांचा मंदिर समितीच्या यथोचित मानसन्मान करण्यात आला. तसेच श्री ना वसंत पंचमी ते रंगपंचमी पर्यंत पांढरा पोषाख घालण्यात आला त्याची आज सांगता करण्यात आली आणि आता उद्यापासून श्री ना रंगीत पोषाख घातला जाणार आहे अशी माहिती सूत्रांनी दिली आहे.



# ग्रामसुरक्षा यंत्रणेमुळे दरोड्यांना आळा बसू शकेल : पो.नि. टाकणे

आधुनिक केसरी न्यूज

**पिलीव :** माळशिरस पोलिस स्टेशन जिल्हा सोलापूर हद्दीतील पिलीव, गोरडवाडी, सदाशिवनगर, मेडद, खुडूस या 5 गावांत ग्राम सुरक्षा यंत्रणेच्या प्रभावी वापराबाबत जनजागृती प्रशिक्षण कार्यक्रम घेण्यात आले. आपत्कालीन स्थितीत ग्रामसुरक्षा यंत्रणेच्या टोल-फ्री क्रमांकावर( 18002703600 ) फोन केल्यास एकाच वेळी गावातील सर्व नागरिकांशी संपर्क साधला जाईल.त्यातुन इतरांना सावध करता येईल,तसेच मदतीसाठी बोलाविता येईल ही यंत्रणा ग्रामपंचायतीमार्फत गावात राबवली जाणार आहे. ग्रामसुरक्षा यंत्रणा ही ग्रामीण भागासाठी प्रभावी ठरेल.ग्रामसुरक्षा यंत्रणेमुळे चोरी व दरोड्यांना आळा बसू शकेल.पोलिस यंत्रणेस कायदा व सुव्यवस्था कायम राखणे कामे नागरिकांचे सहकार्य मिळते. प्रशासनाला नागरिकांशी जलद संपर्क साधता येतो. याप्रसंगी माळशिरस पोलीस स्टेशन पोलीस निरीक्षक राजेंद्र टाकणे यांच्या सूचनेनुसार, गणेश लोकरे ग्राम सुरक्षा यंत्रणा वरिष्ठ विभागीय अधिकारी सोलापूर ,विक्रमसिंह घाटगे जिल्हा समन्वयक ग्राम सुरक्षा यंत्रणा,पोलीस उपनिरीक्षक पुजारी एम.एम व पिलीव औट पोस्टचे सर्व पोलीस बांधव उपस्थित होते.ग्रामसुरक्षा यंत्रणेचे वरिष्ठ विभागीय अधिकारी गणेश लोकरे मार्गदर्शन करताना म्हणाले की ग्राम सुरक्षा यंत्रणा प्रभावीपणे राबवल्यास जिल्ह्यातील गुन्हेगारी कमी होण्यास व जिल्ह्यातील महत्त्वाची माहिती नागरिकांपर्यंत तात्काळ पोहोचवणे सुलभ होईल.ग्राम सुरक्षा यंत्रणेची वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे आहे.संपूर्ण स्वयंचलित यंत्रणा आहे.गावासाठी यंत्रणा सुरू करणे व सहभागी होण्यासाठी सोपी पध्दत आहे.संपूर्ण भारतासाठी एकच टोलफ्री नंबर 18002703600 हा आहे.यंत्रणेत सहभागी असलेला कोणताही नागरिक आपत्ती काळात संपूर्ण परिसराला सावध करू शकतो.संदेश देणाऱ्या व्यक्तीच्या आवाजातच संदेश कॉल स्वरूपात परिसरातील नागरिकांना मिळतो.एका गावात चोरी करून चोर दुसऱ्या गावच्या दिशेने गेल्यास त्या गावालाही सावध करणे शक्य आहे. यासाठी ग्रामसुरक्षा यंत्रणेची आवश्यकता आहे.

जिल्ह्यातील सर्व गावांत ग्रामसुरक्षा यंत्रणा कार्यरत करण्यात आली असुन चोरी- दरोड्याची घटना, महिलांसंदर्भातील गुन्हे, लहान मुले हरविणे, वाहन चोरी, गंभीर अपघात, वन्य प्राण्यांचा हल्ला,आग जाळीताची घटना इ. घटनांमध्ये ग्रामसुरक्षा यंत्रणेच्या वापरामुळे तातडीने मदत मिळणे व दुर्घटनांना आळा घालणे प्रभावीपणे शक्य होत आहे.

# न्यू हायस्कूल पीरबावडा शाळेमध्ये माजी विद्यार्थ्यांचे स्नेहमिलन

आधुनिक केसरी न्यूज

**सुधाकर जेठे**

**फुलंब्री :** शाळेतील जुन्या आठवणींना उजाळा देत मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाच्या न्यू हायस्कूल पिरबावडा येथील २००८ बॅचच्या माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमिलनचा कार्यक्रम रविवार ( १२ ) रोजी मोठया उत्साहात पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सांडू पाटील काळे व प्रमुख उपस्थितीत जनार्दन पाटील काळे, माजी शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते. शालेय जीवनात नोकरी व्यवसाय करता बाहेर गेलेले सर्व माजी विद्यार्थी, विद्यार्थिनी एकत्र यावे या उद्देशाने हा मेळावा आयोजित करण्यात आला होता. तत्कालीन कार्यरत असलेले शिक्षक एस. पंचभैय्या, अनंत कोलते, व्ही. बनकर, दादासाहेब खंडागळे, विष्णू पवार, कैलास गरसोळे, ए. डी. जाधव, काळे मामा, रमेश घुगे आदींची उपस्थिती होती. १५ वर्षानंतर एकमेकांना भेटलेल्या माजी विद्यार्थीनी मनोगत व्यक्त करत जुन्या आठवणींना उजाळा दिला. सन २००८ या बॅचमधील विद्यार्थ्यांचा निकाल शाळेतील सर्वात चांगलानिकाल होता. तो आजही आठवणीत असल्याचे शिक्षकांनी सांगितले. तर दरवर्षी अशाच प्रकारे मेळावा आयोजित करून शाळेला आवश्यक असलेल्या बाबी देण्याचे आश्वासन माजी विद्याथ्र्यांनी यावेळी दिले. सूत्रसंचालन शारदा काळे यांनी केले तर आभार संजय गाडेकर यांनी व्यक्त केले. योगेश बकाल, राजेंद्र गाडेकर, अरुण गाडेकर आदींनी कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी मेहनत घेतली.






# कांद्याला भाव नाही; शेतकरी अडचणीत

## बेभाव कांदे विकण्यापेक्षा जनावरांना घातले तर काय वाईट...!



आधुनिक केसरी न्यूज

**शांताराम मगर**

**लोणी खु. :** औरंगाबाद जिल्ह्यात सर्वाधिक कांदा उत्पादक शेतकरी वैजापुर तालुक्यातील असून कांद्यानी आता शेतकर्याच्या डोळ्यात पाणी आणले आहे. कांद्याच्या भावात मोठी घसरण झाली असून या प्रकाराचा आर्थीक फटका शेतकऱ्यांना बसला आहे. गेल्या बर्‍याच दिवसांपासून कांद्याला बाजारभाव मिळत नाही भावात काही सुधारणा होत नसल्याने कांदा कवडीमोल भावात विकावा लागत असल्याने शेतकऱ्यांच्या आर्थिक अडचणीत भर पडली आहे. साठवणुकीसाठी कांदा चाळी मोठ्या प्रमाणात झाल्या काहिना अनुदान मिळाले तर कहीनी कर्ज काडुन कांदा चाळी केल्या परंतु नानाप्रकारच्या झळा सोसत कांदा पीक काढले; मात्र बळीराजाला आजच्या भावात खर्चदेखील निघत नसल्यामुळे कांदा मोठ्या कष्टाने पिकवलेला कांदा जनावरांना टाकण्याची वेळ शेतकऱ्यांवर आली आहे.

आलीकडे बळीराजाचे दुखः सोशल मीडियाच्या माध्यमातून व्यक्त करतांना नेटकरी बळीराजाचे दुःख मोकळे करण्याचा सोशल मीडियाच्या माध्यमातून केविलवाणा प्रयत्न होत असल्याचे दिसत आहे. वर्षभर सर्वच पिकांमधून तोटा सहन करावा लागल्याने आर्थिक व मानसिक त्रास सहन करणार्‍या बळीराजाच्या मनाला थोडासा आधार देण्यासाठी शेतकर्‍यांचीच मुले सरसावल्याचे सोशल मीडियावर फिरणार्‍या संदेशांवरून दिसत आहे. कांदा खाणारे ग्राहक व राजकीय नेत्यांच्या शेतकऱ्यांबद्दलच्या अनास्थेबाबत भावनिक व विनोदी मजकुराची चर्चा सोशल मीडियावर रंगत आहे. शेतकऱ्यांच्या भावना व मेहनतीची कदर करणारे संदेश 'शेअर' करण्याची चढाओढ सध्या दिसून येत आहे.

### आवक वाढल्याने भावात घसरण

उष्णता वाढल्याने कांदा टिकत नसल्याचे दिसून येते . उष्णतेमुळे कांदा खराब होत आहे . त्यामुळे शेतकऱ्यांचा कल विक्रीकडे वाढला सून काडीमोल भावाने विकला जात असल्याने शेतकऱ्यांचा उत्पादन खर्च फिटत नसल्याची तक्रार शेतकरी करीत आहेत . दुष्काळाशी दोन हात करणाऱ्या बळीराजाच्या डोळ्यातून चांगलेच पाणी काढले आहे . कांद्याच्या भावात मोठी घसरण झाल्याने व उत्पादन खर्चही फिटत नसल्याने शेतकरी हतबल झाला आहे . सततच्या दुष्काळाने होरपळून निघणाऱ्या कष्टकरी शेतकरीवर्गाला नेहमीच कोणत्या न कोणत्या कारणाने आर्थिक संकटांना सामोरे जावे लागत आहे . कधी बदलणार्‍या हवामानाशी दोन हात करूनही बाजारात मिळणाऱ्या मातीमोल भावामुळे पुरता जेरीस आलेल्या शेतकऱ्यांच्या डोक्यावरील कर्जाचा बोजा कमी होण्याचे नाव घेत नाही .बाजारात सध्या मिळत असलेल्या मातीमोल भावामुळे उत्पादन खर्चही फिटत नसल्याने शेतकरी आर्थिक व मानसिक विवंचनेत सापडला आहे . बाजारात कांद्याला मिळत असलेला दर शेतकऱ्यांनी कांदा पिकासाठी केलेल्या खर्चाचीही वसुली होत नसल्याने बळीराजा चांगलाच अडचणीत सापडला आहे . सतत बदलणारे हवामान, खते, औषधांच्या वाढलेल्या किमती व दिवसेंदिवस वाढणारी मजुरी आदिंचा सामना करत पिकवलेला कांदा बाजारात कमी दराने विकला जात असल्याने हातात पडणाऱ्या या रकमेत उत्पादन खर्चही वसूल होत नसल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे . पिकासाठी केलेल्या खर्चाची वसुलीही होत नाही तेथे कर्जाची फेड कशी करायची या मानसिक वेदनेने त्रस्त झाला आहे . अडचणीत सापडलेल्या कांदा उत्पादक शेतकऱ्यांच्या व्यथेकडे राजकीय नेते व मीडियाकडून दुर्लक्ष होत असल्याची भावना शेतकऱ्यांत व्यक्त होत आहे .

### कृषी प्रधान देशात शेतकऱ्यांवर आत्महत्येची वेळ दुर्दैवी

शेतकऱ्यांना पैशासाठी बँकावर अवलंबून राहावे लागते तर शेतमाल विकण्यासाठी दलाल व व्यापारी यांच्यावर अवलंबून राहावे लागते यामुळे अचणीत सापडलेल्या शेतकऱ्यांच्या व्यथेकडे सरकार शेतकऱ्यांच्या डोळ्यातून वाहणारे पाणी का दिसत नाही . या कृषी प्रधान देशात शेतकर्यावर आत्महत्येची वेळ यासारखी दुर्दैवी गोष्ट कोणती आहे . सरकारने काद्यांला योग्य हमी भाव द्यावा, अशी मागणी आम्ही करीत आहोत .

**नितीन आहेर, शेतकरी पाराळा**

### हेच का अच्छे दिन

शेतकऱ्यांना पैशासाठी बॅका अवलंबून राहावे लागते शेती करण्यासाठी सारखी व मजुरांवर तर शेतमाल विकण्यासाठी दलाल व व्यापारी यांच्यावर अवलंबून राहावे लागते ऐवडे करून बेभाव कांदे विकण्यापेक्षा जानावरांना घातले तर काय वाईट आहे .

**राघुबा किटे, मेंडपाळ शेतकरी तलवाडा**

### शेतकऱ्यांचे मरण हेच सरकारचे धोरण

कांद्याचे उत्पादन व मागणी याचा विचार करून कांदा निर्यात धोरण ठरवुन शेतकऱ्यांना किमान आधारभुत किमत ठरवुन योग्य भाव देणे गरजेचे आहे मात्र कुठलेही नियोजन केले जात नाही . सरकार कुठलेही असो शेतकरयाचे मरण हेच सरकारचे धोरण झालेले आहे .

**दादासाहेब तांबे, ता .अध्यक्ष स्वाभिमानी संघटना**



# नांदेडची सुवर्णकन्या सृष्टी पाटील जोगदंडसह भारतीय धनुर्विद्या संघ एशिया कप स्पर्धेसाठी तैवानला रवाना

आधुनिक केसरी न्यूज

**नांदेड :** वर्ल्ड आर्चरी संघटनेच्या अंतर्गत तैवान येथे आयोजित एशिया कप स्टेज वन वर्ल्ड रँकिंग स्पर्धेसाठी नांदेडची सुवर्ण कन्या तथा मराठवाडा एक्सप्रेस कुमारी सृष्टी बालाजी पाटील जोगदंड दिनांक १३ मार्च २०२३ रोजी भारतीय संघासमवेत तैवानला रवाना झाली. रिकव्हर प्रकारात खेळणारी सृष्टी महाराष्ट्रातील एकमेव महिला खेळाडू असून तिच्या आयुष्यातली पहिली आंतरराष्ट्रीय स्पर्धा ती खेळत आहे . साई सोनीपत येथे आयोजित निवड चाचणी स्पर्धेत सर्वोत्तम कामगिरी करत तिने वर्ल्ड आर्चरी असोसिएशनच्या अंतर्गत तैवानमध्ये होणाऱ्या एशिया कप स्पर्धेसाठी आपली योग्यता सिद्ध केली भारतीय संघामध्ये रिकवर गटांमध्ये गुरमेर गरेवाल ( चंदीगड ) सृष्टी जोगदंड ( महाराष्ट्र ) आदिती जयस्वाल ( कलकत्ता ) तनिषा वर्मा ( चंदिगड ) मुले पार्थ साळुंखे ( महाराष्ट्र ) राहुल दिल्ली , रामपाल चौधरी ( जयपूर ) जुगल सरकार ( कलकत्ता ) तर कंपाऊंड प्रकारात प्रगती दिल्ली, प्रणित कर चंदिगड, ऐश्वर्या शर्मा गाझियाबाद, साक्षी चौधरी गाजियाबाद, कंपाउंड मुले प्रथमेश जावकर ( महाराष्ट्र प्रियांश ( गाझियाबाद ) पवन घाट ( जयपुर ) व्यंकट आदरी कुंडू ( विजयवाडा ) यांची निवड झाली तर प्रशिक्षक म्हणून राम अवधेश, अनुराग कमल , विकास अजित यांची तर प्रमुख व्यवस्थापक म्हणून संजीवा कुमार सिंग फिजिओथेरपीस्ट डॉ . साधना गौतम, सायकॉलॉजिस्ट डॉ. सोनी जॉन हे संघासमवेत असणार आहेत . दिल्लीतून रवाना झालेल्या या संघाचे अभिनंदन करीत भारतीय धनुर्वीधा संघाचे महासचिव प्रमोद चांदुरकर, ऑलिंपिक प्रशिक्षक रविशंकर सर, ब्रिजेश कुमार, प्रशिक्षिका वृषाली पाटील जोगदंड प्रशिक्षिका पिंकी राणी माजी मुख्यमंत्री अशोकरावजी चव्हाण, नागपूर जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर, स्टेडियम व्यवस्थापक रमेश चौरे शिवछत्रपती पुरस्कार विजेते प्रवीण बोरसे, डॉ . अविनाश बारगजे, मिलींद पठारे, मास्टर विजय कांबळे, अशोक दुधारे प्राचार्य एनसी अनुराधा, क्रीडा उपसंचालक विजय संतान महाराष्ट्र धनुर्विद्या संघटनेचे अध्यक्ष ॲड. प्रशांत देशपांडे, सोनल बुंदिले, प्राचार्य मनोहर सूर्यवंशी, गणाचार्य मठाचे मठाधिपती. डॉ विरुपाक्ष महाराज, जनार्दन गोपीले डॉक्टर हंसराज वैद्य,बाबू गंधपवाड



आंतरराष्ट्रीय सर्प तज्ज्ञ डॉ. दिलीप पुंडे ,फत्तेसिंह पाटील ( भापोसे ) प्रलोभ कुलकर्णी, विक्रांत खेडकर जिल्हा क्रीडा अधिकारी राजेश्वर मारावार, शिवकांत देशमुख, संतोष कंकावार माजी जिल्हा क्रीडा अधिकारी आनंद बोबडे, गंगालाल यादव, राजेश जांभळे, ज्ञानोबा नागरगोजे, जिल्हा धनुविद्या संघटनेचे कोषाध्यक्ष सुरेश तमलुरकर नांदेड तालुका आर्चरी संघटनेचे अध्यक्ष श्रीनिवास भुसेवार, संजय चव्हाण, अभिजीत मुन्ना कदम डॉ . राहुल वाघमारे प्राध्यापक संजीव डोईबोळे, अभिजीत दळवी नारायण गिरगावकर, राष्ट्रपाल नरवाडे सरदार अवतार सिंग रामगडीया, अनिल बंदेल गजानन फुलारी, बाबुराव खंदारे, प्रशांत आसमाने, मालू कांबळे , राजेंद्र सुगावकर उद्धव जगताप, किशोर पाठक, सुशील दीक्षित शिवाजी पुजरवाड, नंदकिशोर घोगरे, ज्ञानोबा जोगदंड, जगदीश जोगदंड, संजय चव्हाण, सुभाष नावंदे, मुरलीधर रेड्डी नेताजी जाधव, गुरुनाथ काळे गफार पठाण, ॲड. अरुण फाजगे यांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या आहेत.



# पठाण वस्ती मोहिते घराण्याशी पिढ्यान् पिढ्या एकनिष्ठ : विजयसिंह पाटील

आधुनिक केसरी न्यूज

**पिलीव :** माळशिरस तालुक्यातील दुष्काळी भाग म्हणून गावाची ओळख असलेल्या पठाण वस्ती या गावातील भाजप पुरस्कृत मोहिते-पाटील या गटाने ग्रामपंचायतमध्ये जोरदार मुसंडी मारून विरोधकांना चितपट करून नऊ पैकी नऊ नेंबर बहुमताने विजय करून लोकनियुक्त सरपंच ही निवडून आणला असल्याने काल रविवार दिनांक 12 मार्च रोजी सायंकाळी 6:00 वाजता पठाण वस्तीच्या सर्व ग्रामस्थांनी मिळून नवनियुक्त सरपंच व सदस्यांच्या भव्य अशा सत्कार समारंभाचे आयोजन व गाव जेवणाचे आयोजन केले होते. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून महाराष्ट्र राज्याचे माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते-पाटील व अकलुज कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती मदनसिंह-मोहिते पाटील यांची उपस्थिती होती.सदरच्या कार्यक्रमा प्रसंगी विजयसिंह मोहिते-पाटील आपले अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना सांगत होते की पठाण वस्ती गावात जास्त मुस्लिम समाज असला तरी तो पिढ्यान् पिढ्या मोहिते-पाटील घराण्याशी एकनिष्ठ राहिला आहे व येथून पुढेही एकनिष्ठच राहील याची मला खात्री आहे. त्यामुळे पठाण वस्ती गावातील लोकांना कसल्याही प्रकारची अडचण आली तरी त्यांना अकलूज येथील शिवरत्नची दारी 24 तास खुली आहेत व पठाण वस्ती गावच्या विकासासाठी मी कसलाही निधी पडून निधी कमी पडू देणार नाही.यावेळी मदनसिंह मोहिते-पाटील यांनी माझ्याकडून जेवढी काही मदत लागेल तेवढी मदत करण्यासाठी मी तत्पर असल्याचे गावकऱ्यांना आश्वासन दिले. या कार्यक्रमास पिलीव गटाचे जि.प. सदस्य गणेश पाटील,बोरगाव गटाचे अरुण तोडकर, शुकूरखान पठाण,पठाणवस्तीचे लोकनियुक्त सरपंच एजाज पठाण, पठाणवस्ती-चांदापुरी सोसायटीचे चेअरमन तनवीर पठाण, फारुखान पठाण, शब्बीर पठाण,मोहनखान पठाण, मुबारक सय्यद, मुसेखान पठाण, इन्तियाज पठाण, महादेव शेटे, सदाशिव कनप,सतिश सरतापे, तिसमारखान पठाण, हसीम बक्शी, बक्सारखान पठाण, मल्हारी मगर, सर्व ग्रामपंचायत सदस्य, युवक वर्ग व पिलीव, सुळेवाडी, चांदपुरी, निमगाव यांसह आजूबाजूच्या इतर गावातील आजी-माजी पदाधिकारी व ग्रामस्थ उपस्थित होते.

# आ. हरिभाऊ बागडे यांच्या हस्ते विविध विकास कामाचे भूमिपूजन

आधुनिक केसरी न्यूज

**वडोद बाजार :** वडोद बाजार येथे विविध विकास कामाचे भूमिपूजन व ग्रामपंचायत कडून साहित्य वाटप करण्यात आले. माजी विधानसभा अध्यक्ष तथा आमदार हरिभाऊ बागडे यांच्या हस्ते शेवता बुद्रुक बोरगाव अर्ज जळगाव मेटे शेलगाव खुर्द रस्ता मधील पूल मोरे सर सुधारणा करणे वडोद बाजार ते पिरबावडा रस्ता रुंदीकरण वडोद बाजार ते फरशी या रस्त्याचे लोकार्पण खामगाव बोधेगाव रस्ता फुल पूल या विविध विकास कामाचे भूमिपूजन व लोकार्पण करण्यात आले तर वडोद बाजार येथील नागरिकांना 3000 डसबीन वाटप करण्यात आले. ग्रामपंचायत तर्फे पाचशे वयोवृद्धांना स्टील काठीचे वाटप करण्यात आले. अंगणवाडी व आशा वर्कर यांना कपाट वाटप करण्यात आले शाळेतील नऊशे विद्यार्थ्यांना शूज तर 350 शालेय विद्यार्थ्यांना ड्रेस वाटप करण्यात आले. ग्रामपंचायत तर्फे वडोद बाजार वडोद खुर्द वडद वस्ती भालगाव या चार जिल्हा परिषद शाळेला एलईडी व सीसीटीव्ही वाटप करण्यात आले या विविध विकास कामाचा व साहित्य वाटप सोहळा रविवारी दहा वाजता संपन्न झाला या कार्यक्रमासाठी उद्घाटक म्हणून माजी विधानसभा अध्यक्ष आमदार हरिभाऊ बागडे यांच्या ते झाला. कार्यक्रमाला तालुकाध्यक्ष सुहास शिरसाठ सर्जेराव मेटे उपसभापती संजय त्रिभुवन, शिवाजी पात्रीकर, इंदुबाई वाघ, सरपंच पाकीजा पठाण, गोपाळ वाघ काकाजी कोलते शुभम गंगावणे शेख राजीक डॉ सुहास वायकोस बाबुराव मंदाडे शिला बाई शिनगारे ,स्वाती वायकोस आसाराम कोलते सोसायटी चेअरमन कडूबा मस्के, शेख फारूक ग्रामविकास अधिकारी पाथरे, आशिष गोविंद वाघ, साहेबराव खाक्ररे, गोविंद पांडे जी अजिनाथ वाघ, कृष्णा सहाने, अशोक शिंगरे ,अरुण वायकोस, साबेर पठाण,शेख सद्दाम शेख शकील बाळू वाघ ,संजय मंदडे, गणेश दणके दगडु कोलते , सुमित्रा दणके , पत्रकार रऊफ शेख नवनाथ इधाटे रमेश दणके आदी हजर होते.



# पालकमंत्र्यांच्या उपस्थितीत कार्यकर्त्यांचा प्रवेश सोहळा

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** तालुक्यातील सीतानाईक तांडा येथे राष्ट्रवादी पक्षाचे जिल्ह्याउपाध्यक्ष सरपंच केशव राठोड यांच्यासह अनेक पदाधिकारी, ग्रामपंचायत सरपंच, सदस्यासह शेकडो कार्यकर्त्यांचा शिवसेना पक्षप्रवेश सोहळा पालकमंत्री तथा कॅबीनेट मंत्री संदिपान भुमरे, जिल्हाप्रमुख भरतसिंग राजपुत, जिल्हा प्रमुख, तालुका प्रमुख केतन काजे डॉ. मनोज राठोड, दिलीप गोसावी, लखन चव्हाण यांच्या उपस्थितीत संपन्न झाला.

यावेळी शिवसेनेत प्रवेश करणाऱ्या प्रत्येक नेत्यांसह कार्यकर्त्यांचा योग्य तो सन्मान केला जाईल. सितानाईक तांड्यासह तालुक्यातील तांडावर निधी कमी पडु देणार नाही अशी ग्वाही संदीपान भुमरे यांनी बोलता वेळी दिली. यावेळी शेख बिलाल, अप्पासाहेब भोजणे, उपसरपंच पि.के.राठोड, खेमा मधे, छबुसिंग राठोड, शंकर राठोड, प्रतापराव सुर्यवंशी, चुनीलाल जाधव, डिगांबर जाधव, सबूसिंग राठोड, शंकर दुधा, बाबासाहेब बहीरव, कैलास जाधव,सुभाष रिंढे, अप्पासाहब पवार, बबन पवार, नितीन राठोड, आमरसिंग सुका, नामदेव मांगू आदीसह हजारो नागरिक मोठ्या संख्येने उपस्थितीत होते.



# कूलर वापरताना विद्युत सुरक्षेची काळजी घ्या; महावितरणचे आवाहन

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** तापमान वाढल्याने कुलरचा वापर मोठ्या प्रमाणावर सुरू झाला आहे. मात्र खबरदारी न घेतल्याने अपघाताची शक्यता असते. त्यासाठी नागरिकांनी कुलर वापरताना विद्युत सुरक्षेची खबरदारी घ्यावी, असे आवाहन महावितरणने केले आहे. कुलरसाठी नेहमी थ्री-पिन प्लगचा वापर करावा. कुलरमध्ये पाणी भरण्यापूर्वी कुलरचा वीजपुरवठा बंद करून प्लग काढून ठेवावा म्हणजे कुलरचा विजेशी काहीही संबंध राहणार नाही. पाणी भरताना ते टाकीच्या खाली सांडून बाजूला जमिनीवर पसरणार नाही, याची खबरदारी घ्यावी. पाणी भरल्यानंतर प्लग पिन लावून स्विच चालू करावे. त्यानंतर कुलरच्या कुठल्याही भागाला स्पर्श करू नये. कुलरचे कनेक्शन व वायरिंग अधिकृत कारागिराकडून तपासून घ्यावे. अर्थिंगची तपासणी करून घ्यावी. अर्थिंग व्यवस्थित असल्यास लिकेज करंट येत नाही. कुलरच्या आतील वायर पाण्यामध्ये बुडणार नाही याची काळजी घ्यावी. पंपातून पाणी येत असल्यास वीजपुरवठा बंद करून नंतरच कुलरला हात लावावा. ओल्या हातांनी कुलरला कधीही स्पर्श करू नये. लहान मुलांना नेहमी कुलरपासून सुरक्षित अंतरावर ठेवावे आणि ती कुलरजवळ खेळणार नाहीत, याबाबत दक्षता घ्यावी. कुलरच्या लोखंडी बाह्यभागात वीजप्रवाह उतरू नये यासाठी कुलरचा थेट जमिनीशी संपर्क येईल, अशी व्यवस्था करावी; जेणेकरून कुलरच्या लोखंडी बाह्यभागात वीजप्रवाह उतरल्यास त्याचा धक्का बसणार नाही. कुलरमधील पाण्याचा पंप ५ मिनिटे सुरू आणि १० मिनिटे बंद ठेवणाऱ्या इलेक्ट्रिक सर्किटचा वापर करावा. यामुळे विजेचीही मोठ्या प्रमाणावर बचत शक्य आहे. कुलरबाबत माहिती नसल्यास कनेक्शन बदल करू नये. कुलरची दुरुस्ती चालू अवस्थेत न करता प्लग काढून नंतरच काम करावे. कुलरच्या प्लगला जोडलेली वायर खंडित वा जीर्ण झालेली असल्यास बदलून दुसरी लावण्यात यावी. अनेकदा पाण्याची पातळी खोल गेल्याने पंप सुरू करूनही पाणी खेचले जात नाही व तो पंप एअर लॉक होतो. अशावेळी प्रायमिंग करणे आवश्यक असते. मात्र चालू पंपाचे प्रायमिंग करणे टाळावे. कुलर हलवताना प्लग पिन काढून नंतरच त्याची हालचाल करावी. कुलर पंप अधूनमधून बंद करावा. दैनंदिन व्यापातून थोडासा वेळ या उपाययोजनांसाठी दिला तर कुलरमुळे होणारे विद्युत अपघात टळू शकतात.

# पतीने केली पत्नीची गळा दाबून हत्या; घटनेचे कारण गुलदस्त्यात



आधुनिक केसरी न्यूज

**जिंतूर :** शहरातील जालना रोड परिसरातील रमाबाई नगर परिसरातील एका महिलेच्या पतीने गळ्याला पट्ट्याने बांधून तिची हत्या केल्याची दुर्दैवी घटना सोमवारी दिनांक 13 मार्च सकाळच्या सुमारास उघडकीस आली असून शहरात खळबळ उडाली आहे. याबाबत अधिक माहिती अशी की शहरातील जालना रोड वरील रमाबाई नगर येथील रहिवाशी राजू अवचर हे मागील काही दिवसांपासून मनोरुग्ण असल्यामुळे औरंगाबाद येथे उपचार घेत होता घटनेचा काही दिवस अगोदर माहेराला असलेल्या पत्नीला घेऊन आला होता दरम्यान तो मनोरुग्ण असल्यामुळे मयताचे नातेवाईकांनी पाठवण्यास नकार दिला होता परंतु घरात लग्न असल्याचे सांगून आपल्या पत्नीला सासरी आणले होते दरम्यान दि.12 मार्च रात्री अडीचच्या सुमारास पत्नी सुनीता अवचर वय 24 वर्ष हि झोपेत असताना पत्नीच्या गळ्यात कमरेचा पट्टा बांधून पत्नीच्या हत्येचा प्रयत्न केल्याची घटनेची माहिती नातेवाईकांना मिळताच पोलिसांना माहिती देण्यात आली यावेळी घटनास्थळी पो.नि. कुदनकुमार वाघमारे, पो.उप.नि.चौरे, सपोनी विकास कोकाटे, पो.का.जोगदड, कांबळे, चव्हाण, बंदुके आदींच्या पथकाने धाव घेत घटनास्थळावरून बेशुद्ध अवस्थेत विवाहित महिलेस नातेवाईकांच्या मदतीने ग्रामीण रुग्णालयात दाखल केले यावेळी डॉ. देवीदास गरड यांनी तपासून मृत घोषित केले मृत विवाहित महिलेस एक तीन वर्षांचा मुलगा आहे यावेळी ग्रामीण रुग्णालयात मृताच्या नातेवाईकांनी एकच हंबरडा फोडल्यामुळे परिसरात हळहळ व्यक्त करण्यात येत होती दरम्यान आरोपी राजू अवचार यास पोलिसांनी ताब्यात घेतले आहे बातमी देईपर्यंत जिंतूर पोलिसात घटनेची नोंद करण्याची प्रक्रिया सुरू होती.

# जुन्या पेन्शनसाठी कर्मचारी संपावर

आधुनिक केसरी न्यूज

**परतूर :** दि.१ नोव्हेंबर २००५ नंतर नियुक्त कर्मचाऱ्यांना जुनी पेंशन लागू करावी या प्रमुख मागणीकरिता दि.१४ मार्च पासून तालुक्यातील हजारो कर्मचारी बेमुदत संपावर जात आहेत. यामध्ये शिक्षक, प्राध्यापक, ग्रामसेवक, तलाठी, आरोग्य कर्मचारी, महसूल कर्मचारी, पाणीपुरवठा विभाग आदी सर्व शासकीय निमशासकीय कर्मचाऱ्यांचा समावेश आहे.

त्यामुळे परतूर तालुक्यातील शाळा, महाविद्यालये, ग्रामपंचायत कार्यालये, तलाठी सज्जा, सरकारी दवाखाने, तहसील कार्यालय आदी सर्व कार्यालये बंद राहणार आहेत. यामुळे रोजच्या महत्वाच्या कामावर याचा मोठा परिणाम होणार आहे. आम्हाला जोपर्यंत जुनी पेन्शन योजना लागू होत नाही तोपर्यंत संप मागे घेतला जाणार नाही अशी ठाम भूमिका संपकर्यांची आहे. तसेच शासनाच्या उदासीन प्रवृत्तीमुळे आणि वेळोवेळी केलेल्या आंदोलनाला प्रतिसाद न दिल्यामुळे आम्हाला नाईलाजाने संपाचे हत्यार वापरावे लागत आहे. आणि म्हणूनच यामुळे होणाऱ्या नुकसानाची सर्वस्वी जबाबदारी ही शासनाची असेल असे संपकर्यांचे म्हणणे आहे. राज्य मध्यवर्ती संघटनेने पुकारलेल्या या संपामध्ये जुनी पेन्शन हक्क संघटना, शिक्षक भारती, अखिल महाराष्ट्र शिक्षक संघ, शिक्षक परिषद, प्रहार शिक्षक संघटना, ग्रामसेवक संघटना, आरोग्य संघटना, महसूल विभाग कर्मचारी संघटना आदी संघटना सक्रिय सहभाग होत आहेत. शासनाने लवकरात लवकर जुनी पेन्शन योजना लागू न केल्यास एकुण सर्वच शासकीय यंजणा ठप्प होण्याचे चित्र निर्माण झाले आहे.

# काम बंद आंदोलनामध्ये सर्व कर्मचारी संपावर

आधुनिक केसरी न्यूज



**पंढरपूर :** महाराष्ट्र राज्य नगरपंचायत नगर परिषद कर्मचारी व संवर्ग कर्मचारी संघर्ष समितीच्या व फेडरेशन च्या वतीने आज संपूर्ण महाराष्ट्रातील शासकीय कर्मचारी महानगरपालिका नगरपालिका कर्मचारी राज्यव्यापी काम बंद मध्ये सहभागी झाले आहेत त्यामध्ये पंढरपूर नगर परिषदेचे सर्व कर्मचारी संपात सामील झाले असल्याची माहिती राज्याचे जनरल सेक्रेटरी ॲड.सुनील वाळूजकर यांनी दिली. यावेळी बोलताना ॲड. सुनील वाळूजकर यांनी सांगितले की, महाराष्ट्रातील महानगरपालिका नगरपालिका नगरपंचायत कर्मचारी व राज्य शासकीय कर्मचारी संघटना यांच्या वतीने जुनी पेन्शन योजना लागू करावी, कंत्राटी हंगामी कर्मचारी यांना सेवेत कायम करावे, उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार समान कामाला समान वेतन द्यावे व तोपर्यंत किमान वेतन देण्याची कारवाई करावी, सन २०१५ पासून नवीन स्थापन झालेल्या नगरपंचायत मधील उद्घोघोषणे पूर्वीचे व उद्घोघोषणे नंतरचे सर्व कर्मचारी व सफाई कर्मचारी यांचे विनाशर्त विना अट समावेशन करावे. नवीन नगरपंचायतीमधील सफाई कर्मचाऱ्यांचा आकृतीबंध मंजूर करावा, नगरपरिषद नगरपंचायत कर्मचारी यांना दहा वीस तीस ची आश्वासित प्रगती योजना लागू करावी, अनुकंपाची भरती त्वरित करावी व इतर मागण्यासाठी राज्य शासकीय कर्मचारी व महानगरपालिका, नगरपालिका. नगरपंचायत कर्मचाऱ्यांच्या विविध मागण्यासाठी आज दिनांक १४ मार्च २०२३ पासून राज्यव्यापी बेमुदत काम बंद आंदोलन करण्यात येत आहे यामध्ये सोलापूर जिल्ह्यासह राज्यातील १८ लाख कर्मचारी या संपात सामील झाले आहेत तसेच सोलापूर जिल्ह्यातील १७ नगरपंचायत व नगरपरिषदेमधील सर्व कर्मचारी संपात सहभागी झाले आहेत. शासनाने वेळीच मागण्या मान्य केल्यास वेळ पडल्यास अत्यावश्यक सेवा सुद्धा बंद करण्याचा निर्णय घेण्यात येईल असे ॲड. सुनील वाळूजकर यांनी सांगितले हे आंदोलन यशस्वी करण्यासाठी पंढरपूर नगरपरिषद कामगार संघटनेचे कार्याध्यक्ष नानासाहेब वाघमारे सहकार्याध्यक्ष शरद वाघमारे अखिल भारतीय मजदूर सफाई काँग्रेस संघटनेचे अध्यक्ष गुरू दोडिया, नागनाथ तोडकर उपाध्यक्ष संतोष सर्वगोड, किशोर खिलारे जयंत पवार, अनिल गोयल, प्रीतम येळे, तनुजा सीताफ, दत्तात्रय चंदनशिवे, संजय माने, सुनील सोनार, महावीर कांबळे, दशरथ यादव, दर्शन वेळापुरे, पराग डोंगरे, नवनाथ पवार, अनिल अभंगराव, नगररचनाकार स्वप्नील डोके, सोमेश धट, अग्निशमन अधिकारी संभाजी कारले सर्व सफाई कर्मचारी व कार्यालयीन कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# संभाजीनगर महाराज स्मारक, भीम पार्कचा सत्तार यांच्या हस्ते शुभारंभ

आधुनिक केसरी न्यूज

**फर्दापूर :** येथील छत्रपती शिवाजी महाराज स्मारक व भीम पार्क येथे संरक्षण भिंत बांधकामाचा शुभारंभ कृषिमंत्री ना. अब्दुल सत्तार यांच्याहस्ते रविवार दि.१२/३/२३ रोजी संपन्न झाला. मंत्री अब्दुल सत्तार यांच्या पुढाकाराने छत्रपती शिवाजी महाराज स्मारक येथे संरक्षण भिंत बांधकामासाठी 4 कोटी 99 लाख तर भीमपार्क येथील संरक्षण भिंत बांधकामासाठी 4 कोटी 96 लाख रुपयांच्या निधीला शासनाने मान्यता दिली. या कामाला तातडीने सुरुवात करण्याच्या सूचना मंत्री अब्दुल सत्तार यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या.

यावेळी जिल्हा बँकेचे उपाध्यक्ष अर्जुन पा. गाढे, शिवसेना तालुकाप्रमुख प्रभाकर काळे, माजी जि.प.सदस्य गोपीचंद जाधव, नॅशनल सुत गिरणीचे संचालक राजेंद्र ठोंबरे, सतीष ताठे, तहसीलदार रमेश जसवंत, गटविकास अधिकारी प्रदिप नाईक, पपींद्रसिंग वायटी, सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपविभागीय अभियंता अजय टाकसाळे, शाखा अभियंता नितीन राठोड, उस्मान पठाण, हिरा चव्हाण, शेख जाकेर, रविंद्र बावस्कर, भिमा बोराडे, विजय तायडे, शेख मुक्तार, सुपडू दिंडे, राधेश्याम जाधव, श्रावण जाधव, प्रताप जाधव, अख्तरखा पठाण, अरीफ पठाण, शफीक पठाण आदींची उपस्थिती होती. अशी माहिती सोयगाव पंचायत समितीचे माजी सभापती धरमसिंग चव्हाण यांनी बोलताना सांगितले.



शहरातील विश्वसनीय बिग सुपर मार्केट
महावीर
घर संसार

किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | ॲल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही
सुमित 7620111118 राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118
www.mahavirbestprice.com sumitparakh73@gmail.com
S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर

गुप्तरोगाबाबत काहीही लपवू नका

(रविवारी मोफत तपासणी)

डॉ. शेख ए.एच.
या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.
नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी
सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in



# सोयगाव तालुक्यातील कवली येथे पौष्टिक तृणधान्याविषयी मार्गदर्शन

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील मौजे कवली येथे सोयगांव तालुका कृषी विभागाच्या वतीने तालुका कृषी अधिकारी एस.जी.वाघ यांच्या मार्गदर्शनाखाली आंतरराष्ट्रीय पौष्टिक तृणधान्य 2023अंतर्गत मानवी आहारात पौष्टिक तृणधान्याचे महत्त्व व प्रचार मोहीम राबवण्यात आली. दररोजच्या आहारात पौष्टिक तृणधान्य घेतल्यामुळे मानवी शरीरास होणारे फायदे व पुढील काळात तृणधान्य पिकांचे पेरणी क्षेत्र कसे वाढवता येईल याविषयी कृषी सहाय्यक सचिन पाटील यांनी मार्गदर्शनकेले. या कार्यक्रमास सरपंच, ग्रामपंचायत सदस्य तसेच शेतकरी बांधव उपस्थित होते.

# पिंपळनेर येथील पटेलवाडीत बिबट्याचा धुमाकूळ

आधुनिक केसरी न्यूज



**धुळे :** पिंपळनेर येथील पटेलवाडी परिसरात एका गरीब शेतकऱ्याच्या दहा बकऱ्या बिबट्याने फस्त केले आहेत. तर या घटनेमुळे एकच खळबळ उडाली असून परिसरात दहशतीचे वातावरण निर्माण झाले आहे. अनिल पवार असे पशुधन असलेल्या शेतकऱ्याच नाव आहे. या घटनेमुळे सदर त्यांचे अश्रू अनावर झाले आहे. या शेतकऱ्याच्या गोठ्यात रात्री दीड वाजेच्या सुमारास बिबट्याने प्रवेश करत 10 बकऱ्या फस्त केले आहेत. सदर घटना कळताच वन्यजीव संरक्षण संस्थेचे प्रमोद गायकवाड व दानिश पटेल यांच्या माध्यमातून पिंपळनेर वन अधिकारी कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी येऊन पंचनामा केला आहे. तर या शेतकऱ्याचं पशुधनाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झालं असून तात्काळ भरपाई देण्यात यावी अशी मागणी हे ह्या गोरगरीब शेतकऱ्यांने केली आहे.

# डॉ. विजय चोरमारे यांना 'दुःखी' राज्य पुरस्कार घोषित

## 'कवितेचा पाडवा'मध्ये नागराज मंजुळेंच्या हस्ते होणार वितरण

आधुनिक केसरी न्यूज

**जालना :** येथील स्व. नंदकिशोर साहनी चॅरिटेबल ट्रस्ट आणि अनुभव प्रतिष्ठानच्या संयुक्त विद्यमाने सुप्रसिद्ध उर्दू शायर कै. राय हरिश्चंद्र साहनी यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ दिला जाणारा 'दुःखी' राज्य काव्य पुरस्कार कोल्हापूर येथील कवी, लेखक, संपादक, चरित्रकार, डॉ. विजय चोरमारे यांना जाहीर झाला. पुरस्काराचे हे रौप्य महोत्सवी वर्ष आहे. 25 हजार रुपये रोख, स्मृतिचिन्ह असे पुरस्काराचे स्वरूप असून येत्या गुढीपाडव्यास बुधवारी (ता.22 मार्च) रोजी सायंकाळी 6.30 वाजता जे. ई. एस. महाविद्यालयाच्या प्रांगणात 'कवितेचा पाडवा' या कार्यक्रमात सिने-दिग्दर्शक नागराज मंजुळे यांच्या हस्ते व ज्येष्ठ लेखक, विचारवंत डॉ. प्रल्हाद लुलेकर यांच्या प्रमुख उपस्थितीत वितरित केला जाईल. मंगळवारी (ता. 14) पत्रकार परिषदेत संयोजक अभय साहनी, विनीत साहनी, लेखिका, कवयित्री डॉ. संजीवनी तडेगावकर, अनुभव प्रतिष्ठानचे सचिव पंडितराव तडेगावकर यांनी पुरस्काराची घोषणा केली. पुरस्कार वितरणानंतर नागराज मंजुळे व डॉ. विजय चोरमारे यांची मुलाखत डॉ. संजय चौधरी (करमाळा) आणि डॉ. संजीवनी तडेगावकर घेणार आहेत. या वेळी दोन्ही मान्यवरांची सुरेल काव्यमैफल तसेच कार्यक्रम स्थळी प्रसिद्ध चित्रकार राजू बावीस्कर (जळगाव) यांच्या चित्रांचे प्रदर्शन आयोजित केले आहे.

तरी रसिकांनी मोठ्या संख्येने या गौरवशाली साहित्यिक उपक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित राहून लाभ घ्यावा असे आवाहन संयोजकातर्फे करण्यात आले आहे.





**डॉ. विजय चोरमारे यांची साहित्य संपदा...!**

"पापण्यांच्या प्रदेशात, शहर मातीच्या शोधात, आत बाहेर सर्वत्र आणि स्तंभसूक्त" हे चार काव्यसंग्रह प्रकाशित असून दोन कवितासंग्रहांना यापूर्वी महाराष्ट्र शासनाच्या पुरस्कारासह महत्त्वाच्या संस्थांचे अनेक पुरस्कार मिळाले आहेत. पाच आत्मचरित्र, 'स्त्री सत्तेची पहाट– पंचायत राज मधील महिलांच्या कामाचा अभ्यास' हे संशोधन, तसेच 'कर्तृत्ववान मराठा स्त्रिया, महाराष्ट्राचे राजकारण– नवे संदर्भ, स्वातंत्र्योत्तर महाराष्ट्रातील परिवर्तन, शरद पवार आणि महाराष्ट्र (खंड 1) ही संपादने डॉ. विजय चोरमारे यांनी केली आहेत.

# गॅसच्या भडक्यात मृत्यू

आधुनिक केसरी न्यूज



**महालगाव :** तालुक्यातील महालगाव येथे गॅस लिक होऊन आग लागल्याने एका व्यक्तीचा होरपळून दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना मंगळवार रोजी पहाटेच्या सुमारास घडली आहे. किसन रामभाऊ सपकाळ असे या दुर्घटनेत मृत पावलेल्या व्यक्तीचे नाव आहे. याबाबत पोलिसांकडून मिळालेल्या अधिक माहिती नुसार महालगाव येथील रहिवासी असलेले किसन सपकाळ हे आपल्या घरी एकटे असताना त्यांच्या घरातील गॅस सिलेंडर लिक झाला व या घटनेत लीक झालेला गॅस ज्वलनशील पदार्थाच्या संपर्कात आल्याने घरात मोठा भडका झाला व या घटनेत किसन सपकाळ यांचा होरपळून मृत्यु झाल्याची दुर्दैवी घटना घडली आहे.या दुर्घटनेत सर्व संसार उपयोगी साधने देखील जळून खाक झाली आहे.

आग लागल्यावर गावातील नागरिकांनी आग विझविण्याचा प्रयत्न केला यासोबतच गस्ती वर असलेल्या वीरगाव पोलिसांनी देखील आग आटोक्यात आणण्यासाठी प्रयत्न केले. किसन सपकाळ यांना वैजापूर येथिल उपजिल्हा रुग्णालयात उत्तरीय तपासणीसाठी नेण्यात आले होते. तपासणीकरुन डॉक्टरांनी मृत घोषित केले. किसन सपकाळ यांच्या पश्चात पत्नी, भाऊ व भावजाई असा परिवार आहे.या प्रकरणी वीरगाव पोलिसांत अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली असून अधिक तपास बीट जमादार गुणवंत थोरात करीत आहे.

# जिंतूर- सेलूसह जिल्ह्यात हरभऱ्यासाठी नाफेडची हमी भाव खरेदी केंद्र सुरु

आधुनिक केसरी न्यूज

**जिंतूर :** केंद्र शासनाच्या आधारभूत किंमत खरेदी योजनेंतर्गंत नाफेडच्या वतीने रब्बी हंगामातील हरभरा हमीभावाने खरेदी करण्यासाठीजिंतूर- सेलु सह जिल्ह्यात मंगळवारपासून (दि. 14) आठ ठिकाणी हमीभाव खरेदी केंद्र सुरु करण्यात येत आहेत. त्यामुळे हरभरा उत्पादक शेतकऱ्यांनी याचा लाभ घेण्याचे आवाहन जिल्हा पणन अधिकारी कुंडलिक शेवाळे यांनी केले आहे. हरभरा उत्पादक शेतकऱ्यांनी हमीभाव खरेदी केंद्र सुरु करण्याची मागणी केली होती. त्यानुसार शेतकऱ्यांना खरेदी केंद्राच्या ठिकाणी २७ फेब्रुवारीपासून नोंदणी सुरु करण्यात आली. परभणी येथील माणिक निलवर्ण (9960093796) यांच्या परभणी तालुका खरेदी विक्री संघ, एमआयडीसी परिसर, व्यंकटेश मंगल कार्यालयासमोर परभणी, जिंतूर येथील नंदकुमार महाजन (9405473999) यांच्या जिंतूर तालुका जिनींग प्रेसींग सह. सोसायटी मर्यादित, जिंतूर, पुर्णा येथील संदीप घाटोळ (9359333413) यांच्या पुर्णा तालुका सह. खरेदी विक्री संघ, मोंढा पुर्णा, पाथरी येथील अनंत गोलाईत (9960570042) यांच्या स्वतीक सुशिक्षित बेरोजगार सेवासह. संस्था परभणी, मार्केट यार्ड पाथरी, सोनपेठ येथील श्रीनिवास राठोड (9096699697) यांच्या स्वप्नभूमी सुशिक्षित बेरोजगार सेवा सह. संस्था परभणी सोनाहारी वेअरहाऊस शेळगाव रोड, सोनपेठ, बोरी येथील संतोष गलांडे यांच्या (9370441035) तुळजाभवानी कृषि विकास सेवा सह. संस्था मर्या. बोरी बोर्डीकर कॉम्प्लेक्स, सेलू येथील विठ्ठल शिंदे (9860986854) यांच्या तुळजाभवानी कृषि विकास सेवा सह. संस्था मर्या. बोरी, मार्केट यार्ड सेलू आणि मानवत येथील माणिक भिसे (9860654159) यांच्या मानवत तालुका सहकारी खरेदी विक्री संघ मानवत मार्केट यार्ड मानवत येथे ही खरेदी केंद्र सुरु राहणार आहेत. ही खरेदी केंद्र मंगळवारी सुरु होत असून, ११ जूनपर्यंत या खरेदी केंद्रांवर हरभरा खरेदी केला जाणार असल्याचे जिल्हा पणन अधिकारी कुंडलिक शेवाळे यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे कळविले आहे.

**नोंदणीसाठी ही कागदपत्रे सोबत ठेवणे आवश्यक**

तरी शेतकरी बांधवांनी त्यांच्या तालुक्यातील केंद्राच्या ठिकाणी संपर्क करून नोंदणी करावी नोंदणीसाठी रब्बी हंगाम 2022-23 मधील पीकपेरा नोंद असलेला ऑनलाईन 7/12, आधार कार्ड झेरॉक्स, बँक पासबुक झेरॉक्स सोबत ठेवावे. बँक पासबुकवर शेतकऱ्याचे नाव, खाते क्रमांक, आयएफएससी कोड स्पष्ट असावा. (खातेधारक शेतकऱ्याने जनधन बँक खाते किंवा पतसंस्थेतील खाते क्रमांक देऊ नये) संबंधित तालुक्यातील केंद्राच्या ठिकाणी हरभरा हमीभावाने खरेदी करण्यासाठी शेतकऱ्यांनी नोंदणी करण्याचे आवाहन श्री. शेवाळे यांनी केले आहे.



# बेमुदत संपात कर्मचाऱ्यांची वज्रमूठ

आधुनिक केसरी न्यूज

**गोंडपिपरी :** जुनी पेंशन योजना लागू करण्यात यावी या मुख्य मागणीसह इतरही सतरा मागणीसाठी राज्यव्यापी संप पुकारण्यात आला.त्यात कंत्राटी कर्मचाऱ्यांना सेवेत नियमित करावे, रिक्त पदे भरण्यात यावी, नवीन शैक्षणिक धोरण रद्द करण्यात यावे, निवृत्तीचे वय ६० वर्ष करावे इत्यादी अनेक मागण्यासाठी अभूतपूर्व संप करण्यात यशस्वी झाले. राज्य सरकारी मध्यवर्ती संघटनेच्या नेतृत्वाखाली बेमुदत संप आयोजित करण्यात आला असून यात गोंडपिपरी तालुक्यातील १०० टक्के कर्मचाऱ्यांनी संपात सक्रिय सहभाग होऊन संप यशस्वी करण्यास हातभार लावला. या संपात आरोग्य, महसूल, बांधकाम, कोषागार, महसूल, वनविभाग, महिला बालकल्याण विभाग, पशुसंवर्धन विभाग, शिक्षण विभाग व इतर विभागातील कर्मचाऱ्यांनी संपात सहभागी झाले असून तालुक्यातील संपूर्ण शाळा, महाविद्यालय, कार्यालये ठप्प दिसून आली म्हणून शासनाने या मुख्य मागणीचा विचार न केल्यास जुनी पेंशन मिळेपर्यंत कर्मचारी संप मागे घेणार नाही. मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांनी राज्यव्यापी संप टाळून बैठकीला बोलाविले होते पण मागील चार वर्षांपासून जुनी पेंशनवर समिती गठीत करण्याचे आश्वासन दिले पण राज्य मध्यवर्ती संघटनेचे विश्वास काटकर यांनी लेखी आश्वासन देण्याचे संबोधित केले अन्यथा संप अविरत राहण्याचे आवाहन सर्व कर्मचाऱ्यांना दिले त्यामुळे गोंडपिपरी तालुक्यातील सर्व कर्मचारी समन्वय संघटनांचे कर्मचारी उपस्थित राहून मनोगत व्यक्त करण्यात आले. राज्यव्यापी संघटनेत जुनी पेंशन का महत्वाची आहे आणि त्याची संपूर्ण पार्श्वभूमी दुशांत निमकर यांनी स्पष्ट केली तसेच ग्रामसेवक संघटनेकडून जितेंद्र खोब्रागडे, राऊत सर, कृषी विभागातून ऋषीदेव निकोडे, महसूल विभागातून अजय देवतळे, उपकोषागार कार्यालयातून गुरनूले सर, आरोग्य विभागातून युवराज सोयाम, मोतीराम निमगडे, पंचायत विभागातून सावसागडे साहेब, शिक्षण विभागातून पत्रुजी डोके, चकिनाला सर, प्रेम खोब्रागडे, दिनेश निमकर, आकाश झाडे, विक्रम ताळे, सिध्दार्थ रंगारी, रामेश्वर पातसे, रत्नाकर चौधरी, प्रमोद दुर्गे, मनीषा मडावी, किशोर गेडाम, पी डी उके, सुनील सातपुते, डोमाजी मोरे, वृषाली जोशी, मंगला वासेकर, सुवर्णमाला भगत, सचिन बावणे इत्यादी व्यक्तींनी आपापल्या संघटनेचा सक्रिय सहभाग दर्शवून संपाला यशस्वी करण्यासाठी मार्गदर्शन केले. राज्यव्यापी बेमुदत संपादरम्यान प्रास्ताविक अरुण गावतुरे यांनी केले.खूप लढलो बेकीने, आता लढू एकीने या उद्देशाने या संपाचे सूत्रसंचालन महेश आलेट्टीवार यांनी केले तर आभार प्रदर्शन तानाजी अल्लीवार यांनी केले यात गोंडपिपरी तालुक्यातील सर्व कर्मचारी यांनी एकत्र येत संप यशस्वी करण्यात मोलाची भूमिका वठविली आणि संप यशस्वी करण्यास राजेश्वर अम्मावार, भानुदास केदार, मनोज साबळे, मिलिंद मडावी, देवानंद रामगिरकर, रमेश कोकरे, विठ्ठल गोंडे, निलेश मडावी, राजेंद्र कोवे, संतोष कुमार उईके, गणेश आसेकर, महेंद्र मुद्दमवार, पुरमशेट्टीवार, पदमा मदनकर, मांढरे सिस्टर, महादेव सिडाम तसेच उपस्थित सर्व कर्मचाऱ्यांनी संप यशस्वी करण्यास मोलाचा हातभार लावला.

# बसची दुचाकीला धडक; तीन युवकांचा मृत्यू

आधुनिक केसरी न्यूज

**जळगाव :** भरधाव बसने दुचाकीला दिलेल्या धडकेत तीन युवकांचा जागीच मृत्यू झाला. सोमवारी दुपारी हा अपघात झाला. याबाबत वरणगाव येथील पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. भुसावळ येथील आगाराच्या बसने दुचाकीला जोरदार धडक दिली. दुचाकीवरील तीन युवकांचा जागीच मृत्यू झाला. सचिन शेळके, भागवत शेळके व जितेंद्र चावरे यांचा अपघातात मृत्यू झाला. ही घटना भुसावळ तालुक्यातील पिंपळगाव फाट्यानजीक नागेश्वर मंदिर यादरम्यान घडली. हे तिन्ही युवक बोदवड तालुक्यातील मनूर गावातील आहेत. अपघाताची माहिती मिळताच परिसरातील ग्रामस्थांनी घटनास्थळी धाव घेतली. अपघाताची माहिती मिळताच परिसरातील ग्रामस्थांनी घटनास्थळी धाव घेतली. प्रभारी पोलीस निरीक्षक आशिष आडसूळ, हवालदार पराग दुसाने यांच्यासह कर्मचाऱ्यांनी पंचनामा केला. युवकांचे मृतदेह वरणगाव येथील ग्रामीण रुग्णालयात रवाना केले.

# जुनी पेन्शन योजना- कर्मचारी महासंघाचा राज्यव्यापी संप



सुनील शिरपुरे
संपर्क क्र. ७०५७१८५४७९

आधुनिक केसरी

**जुनी पेन्शन योजना राज्य सरकारने लागू करावी. या मागणीकरीता १४ मार्च पासून कर्मचारी महासंघाने राज्यव्यापी बेमुदत संप पुकारला आहे. त्यामुळे राज्यभरातील शासकीय कार्यालयातील कारभार ठप्प होण्याची शक्यता आहे. भारतीय संविधानाने प्रत्येक भारतीय नागरीकाला सामाजिक, राजकिय व आर्थिक न्याय देण्याचे आश्वासित केलेले आहे. तसेच समाजातील प्रत्येक दुर्बल घटकाला सन्मानाने जगता यावे, अशी परिस्थिती निर्माण करण्याचे नागरीकांना विविध तरतुदींद्वारे वचन दिलेले आहे. कामगार जगतातील प्रत्येकाचा सेवानिवृत्ती नंतरच्या जगण्याचा हक्क या संविधानिक मूल्यांमध्ये सामावलेला आहे.**

सर्वतोपरि असलेल्या संविधानिक मूल्यांना आणि समाजाप्रति असलेल्या संविधानिक आश्वासनांना बाजूला सारून तत्कालीन सरकारांनी असंविधानिक निर्णय घेऊन केंद्र व राज्यांतील कामगार, कर्मचाऱ्यांना मिळत असलेले सेवानिवृत्ती वेतन काढून घेऊन त्यांना सेवानिवृत्ती नंतरच्या जगण्याच्या हक्कांपासून वंचित केले आहे. कामगार वर्गाची त्यांच्या सेवानिवृत्ती नंतरच्या आयुष्याची जगण्याची सोय म्हणून सेवानिवृत्ती योजनेचा अविष्कार झाला, जे संविधानिक आश्वासन आहे. ज्यापासून शासन व सत्ता आता जबाबदारी झटकून पळ काढत आहेत.

राज्य सरकारी, महापालिका, नगरपालिका यातील सर्व कामगार, कर्मचारी, अधिकाऱ्यांना जूनी पेन्शन योजना लागू करण्याची सर्व संघटनांकडून मागणी केली जात आहे. त्यामुळे सरकारने जुनी पेन्शन योजना लागू करावी. या मागणीसाठी करण्यात येणा-या संपाला संघटनांचा पाठिंबा आहे.

जुनी पेन्शन योजनेला ओपीएस म्हणजे ओल्ड पेन्शन स्किम म्हटल्या जातं आणि नव्या पेन्शन योजनेला एनपीएस म्हणजे न्यू पेन्शन स्किम म्हटल्या जातं. महाराष्ट्रात २००५ पासून जुनी पेन्शन स्किम बंद झाली. तर पंजाब, राजस्थान, छत्तीसगड या राज्यांमध्ये जुनी पेन्शन पुन्हा लागू करण्यात आली. समजा जुन्या पेन्शनमध्ये तुमचा पगार ३० हजार होता, तर तुम्हाला निवृत्तीनंतर १५ हजार पेन्शन बसायची. तर नव्या पेन्शन स्किममध्ये ३० हजार पगाराला फक्त २७०० रुपये पेन्शन बसते. जुन्या पेन्शनमध्ये तुमच्या पगारातून रक्कम कपात होत नव्हती. नव्या पेन्शनमध्ये तुमच्या पगारातूनच दरमहा १० टक्के आणि सरकार १४ टक्के रक्कम पेन्शन म्हणून जमा करते.

जुन्या पेन्शन योजनेवरून तब्बल १७ लाख सरकारी कर्मचा-यांनी बेमुदत संपाचा इशारा दिला आणि जुन्या पेन्शनचा मुद्दा सभागृहात चर्चेत आला. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी याबद्दल राज्याचं हित महत्वाचं असल्याचं सांगतानाच, इतर पर्यायांसाठी कर्मचाऱ्यांशी चर्चेस तयार असल्याचं म्हटलं. जुनी पेन्शनबद्दल सरकारची काय भूमिका आहे आणि काय शक्यता आहेत? याबाबत जाणून घेणं महत्त्वाचं आहे. जुनी पेन्शन योजना लागू करण्यास सरकार नकारात्मक नाही, असं म्हणताना देवेंद्र फडणवीसांनी जुनी पेन्शनमुळे पडणा-या आर्थिक बोजाचे परिणाम २०३० नंतर दिसतील. त्यामुळे राज्यकर्ते म्हणून भविष्याचा विचार व्हायला हवा, असं सांगत त्यांनी कर्चमाऱ्यांना संप न करण्याचं आवाहन केलं. जवळपास सर्वच राज्यात जुनी पेन्शन योजनेसाठी आंदोलनं होत आहेत. महाराष्ट्रातील कर्मचा-यांनी १४ मार्चपासून बेमुदत संपाचा इशारा दिला होता. अनेक ठिकाणी नो पेन्शन, नो वोटअशा मोहिमा सुरु झाल्यामुळे हा मुद्दा निवडणुकांच्या दृष्टीनेही तापू लागला. पण हा मुद्दा निवडणुकांऐवजी दूरदृष्टीनं बघायला हवा, असं देवेंद्र फडणवीसांनी म्हटलं. जुन्या पेन्शनमध्ये ग्रॅज्युटी, जीपीएफ, महागाई भत्ता, मृत्यूनंतर वारसदारालाही पेन्शन मिळत होती. नव्या पेन्शनमध्ये अशी कोणतीही सवलत नाही. जुन्या पेन्शनमध्ये पैसा हा सरकारी योजना किंवा वित्तीय संस्थांमध्ये लावलेला असायचा, त्यामुळे त्याची हमी होती. नव्या पेन्शनमध्ये अप्रत्यक्षपणे कर्मचा-यांच्या पगारातून कपात होणारा पैसा शेअर बाजारात लावला जातो. यात हमीची शक्यता नसल्याचा कर्मचा-यांचा आरोप आहे. विरोधकांची टीका आणि फडणवीसांनी राज्याचं भविष्य आणि दूरदष्टीचं मुद्दा उपस्थित केला असला, तरी भविष्यात जुनी पेन्शनचा मुद्दा निवडणुकांमध्ये मोठा बनण्याची शक्यता आहे. त्याच पार्श्वभूमीवर कर्नाटकसारख्या भाजपशासित राज्यांत जुन्या पेन्शनचा अभ्यासही सुरु झाला. मात्र शिक्षक मतदारसंघाच्या निवडणुकांवेळी पेन्शन आम्हीच देऊ शकतो असं फडणवीस म्हणाले होते. आता त्यांनी त्याला नकार दिला नसला तरी आकडेवारीचं जे उदाहरण दिलं, त्यावरून विरोधकांनी टीका केली. महाराष्ट्रामध्ये जुनी पेन्शनचा लाभ दिल्यास सरकारवर आर्थिक भार पडेल. त्यामुळे संपूर्ण अर्थव्यवस्था ही अडचणीत येऊ शकते. मात्र याबाबतचा तोडगा काढण्यासाठी चर्चा सुरु करू असे सुतोवाच उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधान परिषदेत केले.

राज्य कर्मचारी संघटनांनी राज्य सरकारी कर्मचा-यांच्या विविध प्रलंबित मागण्यांसंदर्भात दिनांक १४ मार्च २०२३ पासून राज्यव्यापी बेमुदत संप संदर्भाबाबत शासनास नोटीस दिली होती. मग, संप सुरु होण्यापूर्वीच त्यावर चर्चात्मक तोडगा का काढल्या जात नाही? संप सुरु झाल्यानंतरच यांना चर्चेचं सुचतं का? मान्य आहे की, कर्मचा-यांच्या अशा मागण्याने सरकारवर आर्थिक भार पडतं. मग केवळ ५ वर्ष पद भुषवणा-या आमदार, खासदार आणि मंत्र्यांना भरमसाठ वेतन व इतर सोईसुविधा पुरवितांना सरकारच्या आर्थिक भाराचे गणित जातं कुठं? सरकारला आपल्या स्वहिताच्या प्रश्नांविषयी केवळ २ मिनिटांत निर्णय घेता येतं. मग कर्मचा-यांचे प्रश्न पुढे येताच विविध कारणे बरे मिळतात.

## अंजनाई गो-शाळेचा ना.अब्दुल सत्तार यांच्या हस्ते शुभारंभ

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** घटोत्कच-रावेरी रस्त्यावर आमखेडा येथील क्रांती जनहित बहुउद्देशिय विकास संस्थेच्या अंजनाई गो शाळेचे उदघाटन रविवारी कृषिमंत्री अब्दुल सत्तार यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी अंजनाई गो शाळेच्या उदघाटन प्रसंगी कृषिमंत्री अब्दूल सत्तार म्हणाले की गायीची सेवा ही देशाची संस्कृती आहे. त्यामुळे या गो शाळेसाठी सर्वांनी मदत करावी गो शाळेच्या अनुदाना साठी प्रस्ताव पाठवा शासन पातळीवरून या गो शाळेसाठी सर्वोतोपरी मदत करू तसेच या ठिकाणी गायींना पाण्यासाठी माझ्याकडून मी पाण्याचा खर्च उचलत आहे, अशी घोषणा त्यांनी उदघाटन प्रसंगी केली महिन्याच्या प्रत्येक आठवड्यात या गो शाळेत गाईच्या वैद्यकीय तपासणी साठी पशुवैद्यकीय अधिकारी पाठवावा असे निर्देश गटविकास अधिकारी व तहसीलदार यांना देण्यात आले यावेळी व्यासपीठावर तालुका प्रमुख प्रभाकर काळे माजी पंचायत समिती सदस्य संजीवन सोनवणे ठाकरे गटाचे तालुकाप्रमुख दिलीप मचे, आमखेडा सरपंच गजानन ढगे, मनसेचे रामा एलिस ॲड योगेश पाटील गटविकास अधिकारी प्रकाश नाईक तहसीलदार रमेश जसवंत एकात्मिक कृषी प्रकल्प च्या मीनाक्षी बिराजदार आदींची उपस्थिती होती.

क्रांती जनहित बहुउद्देशिय संस्थेचे अध्यक्ष संदीप इंगळे यांनी मान्यवरांचा सत्कार केला. यावेळी हभप कल्पेश महाराज, हभप शांताराम महाराज, हभप भागवत महाराज गाडेकर,भगवान गाडेकर, अशोक ढगे, कडूबा गाडेकर, राजू गाडेकर, दीपक सोनवणे, योगेश इंगळे, राहुल ढगे, सुनीता गाडेकर, योगिता पाटील, कमलाबाई पाटील, श्रीमती छाया पवार आदी प्रमुख उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वीतेसाठी संस्थेचे अध्यक्ष संदीप इंगळे, उपाध्यक्ष ईश्वर इंगळे, सचिव दिलीप शिंदे, अनिल लोखंडे, ज्ञानेश्वर गाडेकर, उर्मिला इंगळे, सौ रुपाली लोखंडे, सौ. पद्मा शिंदे व सौ मीना गाडेकर आदींनी परिश्रम घेतले सुत्रसंचालन दत्ता गाडेकर तर आभार संदीप इंगळे यांनी मानले.



## संत गाडगेबाबा स्मारक सभामंडपाचे भूमिपूजन

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** आज किनगाव येथे आ. सतिश चव्हाण यांच्या स्थानिक विकास निधीतून बांधण्यात येणाऱ्या सभामंडपाचे भुमिपुजन करण्यात आले सुमारे पाच लाख रुपये निधी या कामासाठी मजूर झाला असून सभामंडपाचे भुमिपुजन जेष्ठ नागरिक तेजराव चव्हाण व रामराव पाटील यांच्या हस्ते करण्यात आले असून या प्रसंगी उपसरपंच किशोर चव्हाण अनिल चव्हाण विजय सोनवणे अमोल सोनवणे संताराम चव्हाण माजी सैनिक सुरेश सोनवणे किशोर सोनवणे गणेश चव्हाण विक्रम नजन शिवाजी चव्हाण भिकन चव्हाण सुदाम त्रिभुवन सुनील राजपूत अवि चव्हाण अमोल चव्हाण भाऊसाहेब सोनवणे विजय चव्हाण आदी उपस्थित होते या कार्यक्रमाचे आयोजन बाळासाहेब शिंदे अध्यक्ष संत गाडगेबाबा स्मारक किनगाव यांनी केले होते.



## पूर्णेतील पूर्णेश्वर शिवमंदिरात भागवत कथा ज्ञानयज्ञ श्री ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळा व यात्रा महोत्सव!

आधुनिक केसरी न्यूज

**पुर्णा :** पुर्णा नदीपात्रावरील अत्यंत जागृत देवस्थान असलेल्या श्री.पुर्णेश्वर शिवमंदिर संस्थान येथे प्रतिवर्षा प्रमाणे याही वर्षी अंमली बारशी निमित्त पुर्णा नदीलगत असलेल्या कोल्हापुरी बंधाऱ्याजवळ निसर्गरम्य वातावरणात सोमवार दि.२७ मार्च २०२३ ते सोमवार दि.०३ एप्रिल २०२३ या सप्ताहात हभप. सटवा महाराज भोसले (सुहागणकर) यांच्या सुश्राव्य वाणीतून श्री.भागवत कथा ज्ञानयज्ञासह श्री.ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायन सोहळा व यात्रा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. श्री पुर्णेश्वर शिवमंदिर संस्थान परिसरात आठवडाभर चालणाऱ्या या धार्मिक सोहळ्यास दि.२७ मार्च २०२३ पासून प्रारंभ होणार असून भागवत कथेची वेळ सकाळी ११-०० ते ०५-०० असून श्री.ज्ञानेश्वरी पारायनाची वेळ सकाळी ०६-०० ते १०-०० अशी राहणार आहे तर सोमवार दि.०३ एप्रिल २०२३ रोजी सकाळी ११-०० ते ०१-०० वाजे दरम्यान हभप.श्री.दशरथ महाराज अंबोरे (चारठाणकर) यांचे काल्याचे किर्तन होणार असून या भव्य भागवत कथा ज्ञानयज्ञ श्री ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायन सोहळा व यात्रा महोत्सवात भागवताचार्य हभप.श्री.सटवा महाराज भोसले (सुहागणकर),श्री.ज्ञानेश्वरी पारायनकार श्रीरंग सखाराम पवार,शंकर नारायनराव डाबळे,दिपाजी नारायनराव शेळके तर सिंथवादक नागोराव भोसले,तबलावादक माऊली बुचाले (आव्हईकर),गायक दौलतराव बुचाले (आव्हईकर) यांचे विशेष योगदान राहणार असून दि.०३ एप्रिल २०२३ रोजी यात्रा महोत्सवानिमित्त पुर्णेश्वर शिवमंदिर संस्थान येथे १ ते ५ वाजेपर्यंत श्रींच्या महाप्रसाद कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून या भागवत कथा ज्ञानयज्ञ श्री ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायन सोहळा व यात्रा महोत्सवात जास्तीतजास्त संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन समस्त पुर्णा गावकरी मंडळी व ओम नमःशिवाय मंडळ पुर्णाच्या वतीने करण्यात आले असून या धार्मिक उत्सवात दान करणाऱ्या भाविकभक्त दात्यांनी वैभव कुऱ्हे मो.क्र.९७६५९१६७६८,चंद्रकांत लोखंडे मो.क्र.८५५२८०७६७७,सुधाकर कुऱ्हे मो.क्र.७३९१८२३४०३ यांच्याशी संपर्क साधावा.

## पंढरपूर कॉरिडॉर प्रश्नावर तोडगा काढण्यासाठी १६ मार्च रोजी बैठक घ्या : डॉ. नीलम गोऱ्हे

आधुनिक केसरी न्यूज

**ज्योती खिलारे**

**पंढरपूर :** कॉरिडॉर आणि देवस्थान परिसरातील प्रश्नांबाबत अधिवेशन काळात येत्या १६ मार्च रोजी बैठक घेण्याचे निर्देश उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी आज विधानपरिषदेत दिले. लक्षवेधी प्रश्नावेळी आमदार मा. डॉ. मनीषा कायंदे यांनी राज्य सरकारच्या पंढरपूर देवस्थान परिसरातील कॉरिडोरला स्थानिक नागरिकांचा आणि वारकऱ्यांचा विरोध असल्याचे सांगितले मात्र याकडे शासनाच्या अक्षम्य दुर्लक्षामुळे स्थानिकांमध्ये असंतोष पसरलेला आहे. याबाबत शासनाने स्थानिकांच्या भावना लक्षात घेऊन सकारात्मक कार्यवाही करण्याची मागणी केली.

यासंदर्भात उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी मंत्री महोदयांना निर्देश देताना सांगितले की, 'पंढरपूर येथील पालखी मार्गाचे प्रश्न आणि स्थानिक प्रश्न या संदर्भात एकत्रित बैठक होत नसल्याने अनेक प्रश्न उपस्थित होत आहेत. यामुळे या कामाच्या पूर्ण विकासापर्यंत अद्याप पोहोचता आलेले नाही. त्यामुळे त्याच्या आणखीन खोलात न जाता या अधिवेशनामध्ये येत्या गुरुवारी १६ तारखेला पालकमंत्री, संबंधित खात्याचे मंत्री, लोकप्रतिनिधी, वारकरी संप्रदायाचे प्रतिनिधी या सर्वांची या आठवड्यात बैठक घेऊन मार्ग काढावा.' तसेच यावेळी बोलताना उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी, 'पंढरपूर येथील भक्त निवासाकरिता २००५ - ०६ मध्ये अनेक लोकप्रतिनिधींनी निधी दिला आहे. मात्र आजही भक्त निवासाचे बांधकाम अर्धवट अवस्थेत आहे. यावर पालकमंत्र्यांनी लक्ष घालावे ७३ कोटीच्या निधीचा वापर कसा करणार आहात याबाबत आणि इतर हरकतींबाबत पालकमंत्र्यांनी भूमिका स्पष्ट करावी,' असे उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी सांगितले. तसेच तीर्थक्षेत्र बचाव समिती, संतभूमी बचाव समिती यांनी दिलेले आराखडे आणि सरकारकडील आराखड्यात काय फरक आहे. हे पण सर्वांना सांगितले पाहिजे, असेही नमूद केले.

यावर मंत्री महोदय मा. उदय सामंत यांनी, आपल्याच दालनात बैठक घेऊन आपण दिलेल्या निर्देशानुसारच काम केले जाईल, असे सांगितले. पंढरपूर कॉरिडॉर प्रकल्पात कोणावरही अन्याय केला जाणार नसल्याचेही मंत्रिमहोदय म्हणाले.

## सोयगाव शिवारात बिबट्याचा थरार

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** शेत शिवारात शेत वस्तीत जंगली प्राणी बिबट्याचा चांगलाच वावर वाढला असुन गोठ्यात बांधून ठेवलेल्या जिवंत वासराचा गळा फाडून रक्तरंतीत करून वनविभाचे पथक घटनास्थळी पोहचण्यापूर्वीच बिबट्याने माणसंही फस्त केल्याची घटना शनिवारी (ता. १९) सकाळी उघडकीस आली आहे. शेतकरी मोतीराम पंडीत यांचे सोयगाव शिवारात गट नंबर १९० शेती असून शुक्रवारी सायंकाळी गोड्यात गुरांना चारा पाणी करून घरी परतले असता, या परिसरात वावर असलेल्या बिबटयाने शनिवारी ता. ११ अंदाजे ३.३० च्या सुमारास पत्राच्या शेड जे की ४ फुट उंच उडी मारुन सहा महीण्याच्या वासरावर हल्ला करून नरडे फोडत अगोदर रक्त पिले व निघून गेला, सकाळी पंडीत यांच्या ही घटना लक्षात येताच त्यांनी वनपरिक्षेत्र अधिकारी कार्यालय गाठुन माहीती देण्यासाठी गेले असता उर्वरित वासराचे मांस ही बिबट्याने फस्त करन टाकले, घटनास्थळी पंचनामा करण्यासाठी वनरक्षक शरद चेके, कर्मचारी कृष्णा पाटील रवींद्र मोरे, पशु वैद्यकीय अधिकारी डॉ. चव्हाण पथकासह दाखल झाले तेव्हा फक्त वासराचा सांगाडाच शिल्लक मिळून आला. पथकाकरवी पंचनामा करण्यात आली असून बाजार समिती अहवाल, पशु वैद्यकीय साधने याचे प्रमाणपत्र आलेवर शासनाच्या नियमानुसार पुढील कारवाई करण्यात येणार आहे. गट नं. १९० शेती शिवारात शरद पाटील, मोती काळे, दत्तु देसले, ईश्वर माजाटे, शेख, अजित आदी शंभरावर शेतकरी आपली शेती करतात शेत उपयोगी जनावरे शेतातील गोठ्यात बांधतात भक्षक बिबट्यामुळे एकच खळबळ उडाली.